# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ, नागपूर

## चर्चासत्र सहावे - २०१०

























हिस्लॉप महाविद्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

दिनांक ७ व ८ जानेवारी

Scanned by CamScanner

## स्मरणिका

# नागपूर चर्चा सत्र - २०१०
## दिनांक ७ व ८ जानेवारी.

## स्थळ

## हिस्लॉप महाविद्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.


स्मरणिका संपादक

**डॉ.दत्तात्रय सोनेगांवकर,**

व्ही,एम.व्ही.महाविद्यालय, नागपूर

कार्यकारी सचिव

**डॉ.प्रदीप नवघरे,**

हिस्लॉप महाविद्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.


Scanned by CamScanner




प्रा.रमेश हिंमते
चर्चासत्राध्यक्ष
सी.पी.ॲण्ड बेरार महाविद्यालय,
तुळशिबाग, नागपूर.


# ''भारतीय अर्थव्यवस्थेतील क्षेत्र निहाय परिवर्तन व बदलत्या जागतीक आर्थिक धोरणांची मिमांसा''

(अध्यक्षीय भाषण)

विश्वाच्या मागील अनेक वर्षाचा इतिहासावरुन आता स्पष्ट होत आहे की, समाजात वावरणारा मनुष्य व त्याच्या भोवतालचा परिसर ही विकासाची केंद्र बिंदू म्हणून ओळखले जात आहे. निसर्गनिर्मित उपलब्ध संसाधनाचा उपयोग मनुष्य व समाज यांच्या गरजा भागविण्याकरिता होत असतो. मनुष्यबळातील दिवसेंदिवस होणारे परिवर्तन यातूनच जगाचा एकूण लोकसंख्या विषयक व रचनात्मक बदल व भविष्यातील त्याचे परिणाम व प्रभाव याची दखल विकसनशील राष्ट्रे व विकसीत राष्ट्रे यांना घ्यावी लागेल. नैसर्गिक संसाधनाच्या तुलनेत मनुष्य संसाधनाचा ऱ्हास अधिक गतीने होतो आहे हे डाव्होस येथे २००४ साली भरलेल्या जागतील लोकसंख्याच्या परिषदेतून स्पष्ट होते. जगातील भांडवलशाही राष्ट्रे व साम्यवादी राष्ट्रे. अमेरिका व रशीया यांना लोकसंख्या कमी होण्याचे परिणाम दिर्घकालावधीत अधिक जाणवेल व त्याचा सरळ प्रभाव बाजार या संस्थेवर झाल्याशिवाय राहणार नाही. अर्थातच मी माझ्या भाषणातून वरीलमुद्दा स्पष्ट करण्याचा प्रयत्न प्रथमतः केला आहे याचे कारण अर्थशास्त्रीय विषयातील अभ्यास केवळ, मनुष्य हाच विकासाकरीता केंद्रबिंदू म्हणून मान्यता देतो याशिवाय डॉ.मार्शलचे अर्थशास्त्र, सामान्य माणसांचा (**Ordinary People**) अभ्यास करणारे शास्त्र म्हणून ओळखले जाते.

आज भारताला स्वातंत्र्य होऊन ६३ वर्षे संपली आहे. या कालावधी देशाने व देशातील लोकांनी विविध स्वरुपातील अनेक चढउतार अनुभवले व त्यातून विकासाची गती कायम करण्याकरिता विविध धोरणाचा सकारात्मक प्रभाव शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याकरिता शासन व समाज कटीबध्द आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील संरचनात्मक बदल कसे घडून आले व त्याचा अनुकूल प्रतिकूलप्रभाव जनसामान्यावर कसा होत गेला याशिवाय भारतीय अर्थव्यवस्था जागतीकीकरणाचा एक घटक बनल्यानंतर त्यांचे दोन दशकातील बदल या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. ब्रिटीश पूर्व कालावधीत भारत हा खंड देश होता तरी या खंड प्राय देशाची एकूण आर्थिक व सामाजिक स्थिती अत्यंत सुदृढ होती या कालावधीत देशातील ५६१ संस्थानीकानी अर्थकारणाची दिशा संतूलीत ठेवण्याचा प्रयत्न केलेत आणि म्हणूनच १६ व्या शतकाच्या पूर्वार्ध कालावधीत आजच्या भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा २५ टक्के पेक्षा जास्त होता. आज हेच प्रमाण २.५ टक्केचा पूढे नेण्यासाठी मागील अनेक वर्षाच्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून आयात निर्यात संरचनेत सतत परिवर्तन करुन प्राप्त करण्याकरिता केंद्रस्तरावर निरंतर प्रयत्न केले जात. परंतु आजही आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय उत्पादनाची मागणी अन्य विकसीत देशातील उत्पादनाच्या मागणीला छेद देण्यात पूर्णपणे कार्यक्षम ठरलेली दिसत नाही. अन्यथा भारताचा स्वातंत्र्यानंतरचा व्यापार शेष एखाद्या तरी वर्षात अनुकूल झाला असता पण तसे स्वातंत्र्यानंतरच्या इतिहासातून दिसून येत नाही. इस्ट इंडिया कंपनीच्या आगमनानंतर तर भारत स्वातंत्र्य होईपर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर जवळपास शुन्य होता. समृध्द भारताला गरीब करण्याचे कार्य ब्रिटीशांनी केले (दादाभाई नौरोजी) संपूर्ण आर्थिक संरचना विस्कळीत झाली. ब्रिटीशांनी ३०० वर्षाच्या प्रदिर्घ काळात भारतातून त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची निर्यात केली. त्यांचा जास्त लाभ ब्रिटीशांना प्राप्त झाला. विकासाची धोरणे उपलब्ध नसल्यामुळे स्वातत्र्यप्राप्ती पर्यंत भारतात सर्वच क्षेत्रात विकासाचा अभाव होता. आणि म्हणूनच स्वातंत्र्यानंतर विकासाचे प्रारुप निश्चित करीत असतांना विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधेतील वाढ व क्षेत्रनिहाय विकास यासारख्या कार्यक्रमांना प्राधान्य देण्याचे योजना आयोगाने निश्चित केले म्हणून भारताचा सर्वांगिण विकास साधण्याकरिता व मूलभूत संसाधनाचा विकास घडून आणण्याकरीता प्रयत्न करण्यात येत आहे. देशात विजेची मागणी भविष्यकाळात घरातील वापराकरिता शेती करिता व उद्योगाकरिता मोठया प्रमाणात होणार आहे. ती

Scanned by CamScanner

पूर्ण करण्याकरिता भारताने अमेरिकेसोबत नुकताच अनूउर्जा करार केला आहे. देशातील डावे व उजवे दोन्ही पक्ष टिका करतात मात्र भविष्यात यातील प्रतीफल अर्थव्यवस्थेला निश्चितच प्राप्त होईल. आर्थिक प्रयत्नांच्या वाटचालीत आर्थिक नितीचे अधिष्ठान महत्वाचे मानले जाते. समाजाला लागू करण्याच्या नितीचे निर्धारण, नितीनुसार कार्यक्रमांची आखणी व कार्यवाही करणे गरजेचे ठरते. ती शासनाद्वारे पूर्ण करणे गरजेचे ठरते. स्वातंत्र्यानंतर भारताने ही सामाजीक कल्याण आणि न्यायासह विकासाचे उद्दिष्टे ठरवून नियोजन बध्द विकासाचा मार्ग निवडला. विकासाचे नियोजन प्रोत्साहन, सहकार्य, नियत्रंण आणि सहभाग या सर्व प्रकारे शासनाचे विकासातील योगदान विशेष महत्वाचे आहे. टिंबर्जनच्या मते व्यापक अर्थाने आर्थिक निती, आर्थिक सिध्दांताची संपूर्ण विषयवस्तू अंतर्भूत करते. संकुचीत अर्थाने ती संघटीत समाजाच्या सामूहीक उपयोगीता फलनाच्या उत्पनाच्या महत्तमी करणाचे उद्दिष्ट ठेवते. मात्र आर्थिक नितीची, तिच्या सर्वात विशेष आणि सुसंबध्द अर्थाने शासनाला संदर्भीत करते. आर्थिक नितीच्या निर्धारणाकरीता सार्वजनीक आणि मान्य उद्दिष्टांचे आकलन आवश्यक आहे. आर्थिक नितीचा आखणी आणि कार्यवाही यात व्यक्ती तसेच समाजाचे प्रतिनिधत्व करणारे शासन कार्य करीत असते. सामाजीक उद्दिष्टे आणि समाज कल्याणाचा विचार सामाजीक नितीत अपेक्षीत असतो. असे असले तरी उद्दिष्टे आणि सामाजीक आर्थिक व्यवस्था मानवी स्वभावाशी सुसंगत असल्याशिवाय तीला शाश्वत स्वरुप प्राप्त होत नाही. कारण मनुष्य सर्व आर्थिक प्रयत्नांचे साध्य आणि एकमेव सक्रीय साधन आहे. मानवी प्रवृत्ती व स्वभाव वैशिष्टये मानवी प्रयत्नाची दिशा स्वरुप व निष्पतीची निर्धारक असते. मनुष्य स्वभावात स्वहीत तत्परतेबरोबरच सहानुभूती आणि बंधुत्व भावनां असणे हे नैसर्गीक बाब होय असे स्मिथ ने देखील मान्य केले आहे. स्पर्धेच्या प्रवृत्ती प्रमाणेच आर्थिक विकासाचा ध्यास आणि आयुष्यावर प्रेम करण्याच्या मनुष्य स्वभावाची दखल मार्शल यांनी घेतली. स्वतंत्र भारताने समानतेवर आधारीत समाज रचना आणि न्यायासह विकासाची कल्पना स्विकारली गेली. समाजातील भिन्न क्षेत्र, प्रदेश, व्यक्ती समुह यांच्या विकासाचा विचार होताना कोणावरही अन्याय होवू नये सुविधा आणि संधीचे अन्याय व वाटप विषम नसावे, विकासाची संधी सर्वांना उपलब्ध असावी असे उद्दिष्टे नियोजनबध्द विकासाद्वारे साध्य करण्याचे ठरविल्या गेले. धोरणात्मक निवड ही अर्थव्यवस्थे समोरील प्रश्नाच्या निदानावर आधारलेली असते. भारतातील पंचवार्षीक योजना, साध्या बरोबर साधनाचाही विचार करुन आखल्या गेल्या होत्या. निर्णय आणि कार्यवाहीचे परिणाम या दोन्ही दृष्टीने यश किती व कशा प्रकारचे मिळाले हा मुल्यांकनाचा प्रश्न ठरतो. प्राप्त प्रगती संबंधी प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा यातून प्रयत्न केला जातो. यातूनच नितीविषयक ध्वनितार्थ स्पष्ट होण्याला मदत होते

**सरंचनात्मक बदलचा इतिहास :**

आर्थिक विकासाचा इतिहासदृष्टया संबंध हा सरंचनात्मक बदलाशी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत दिसून येतो. आणि म्हणून अनेकदा यांचा एकत्रीत अभ्यास आर्थिक वृध्दी साठी करण्यात येतो. ज्यामध्ये विविध क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पादनातील योगदान व श्रमशक्तीचा हिस्सा होय. अनेक अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदलाची दिशा ही कृषी, उद्योग व शेवटी सेवा क्षेत्र या व्यवस्थेतूनच ती पूढे विकसीत झालेली दिसून येते. विकसनशील राष्ट्रात विकासाच्या पूर्वव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पादनात कृषीचा वाटा अधिक तर नंतरच्या विकासाबरोबर उद्योग क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पादनातील वाटा अधिक व कृषीचा एकून वाटा कमी होण्याची प्रवृत्ती व पुढील विकासाच्या व्यवस्थेत ह्या दोन्ही क्षेत्रातील योगदानापेक्षा सेवा क्षेत्राचे योगदान हे राष्ट्रीय उत्पादनात वाढत गेलेले दिसून येते हा केवळ एक इतिहासच नाही तर विविध क्षेत्रातील अर्थव्यवस्थेच्या विविध आर्थिक विकासाच्या स्तरातून हे स्पष्ट झालेले आहे. संरचनात्मक बदल क्षेत्र निहाय परिवर्तन हे राष्ट्रीय उत्पादन व आंतरराष्ट्रीय स्तरावर या दोन्ही ठिकाणी आढळून येते संरचनात्मक बदल केवळ आर्थिक विकासाच्या अभ्यासा करिताच उपयोगात आणले जात नाही तर त्यातून शाश्वत विकासाची दिशा कशी प्राप्त करता येतील याचाही कल त्यातून स्पष्ट होतो. या संदर्भात नवपरंपरागत अर्थशास्त्रज्ञानी देखील याचा पाठपूरावा केलेला दिसून येतो (सायमन कुझनेटस) औद्योगिक विकासाबरोबर एकूण राष्ट्रीय उत्पादनातील सेवा क्षेत्राचा वाटा देखील वाढतो याचे महत्वाचे म्हणजे एकतर तांत्रीक प्रगती व वित्तीय संस्थेची झालेली निर्मिती होय. तंत्रज्ञानातील बदलाचा परिणाम महामान उत्पादन, विस्तारीत बाजारपेठ, संग्रहनाच्या सोयी, व दूरसंचार व अन्य संसाधनावर होतो व पूढे ही संरचनात्मक बदलाची दिशा ही एखाद्या अर्थव्यवस्थेत कशी राहील याचे स्पष्टीकरण अजूनही परंपरागत व नवपरंपरागत अर्थशास्त्रज्ञाद्वारे झालेले दिसून येत नाही.

Scanned by CamScanner

**भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल :-**

भारतीय आर्थिक विकासाची स्थिती आर्थिक प्रारुपाच्या उपयोगानंतर आर्थिक स्तरातील परिवर्तन इतर विकासीत देशाच्या विकासाच्या इतिहासातील भिन्नतेनपेक्षा वेगळे नाही. स्वातंत्र्यानंतरचा बदल तपासून पाहिल्यास हे स्पष्ट होते. अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदलाची स्थिती अधिक गतिशील आहे. अशाच प्रकारचे संरचनात्मक बदल हे विकसीत राष्ट्रात विकासाचा व्यवस्थेकडे जात असताना घडून आलेले दिसतात १९५० मध्ये भारतीय सकल घरेलु उत्पादनात कृषीचा वाटा ६० टक्के तर उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा क्रमशः १३ टक्के व २७ टक्के इतका होता. तूलनात्मक दृष्टया १८ व्या शतकात ग्रेट ब्रिटनचा वाटा, १९ व्या शतकाच्या सुरुवातीला जर्मनीचा वाटा १९ व्या शतकाच्या मध्यातीलअमेरीका व इटलीचा वाटा व १९ व्या शतकातीलआरंभीच्या काळातीलजपानचा वाटा सारखा होता. विविध क्षेत्रातील १९५० च्या दशकातील श्रम व शक्तीचा हिस्सा तपासून पाहिल्यास असे आढळून येते की, कृषीवर काम करण्याकरीता ३/४ पेक्षा जास्त श्रमाचा पुरवठा होता तर उद्योगातीलश्रमाचा पुरवठा ११ इतका तर सेवा क्षेत्रातील पूरवठा १४ इतका होता. हेच प्रमाण १८४१ मध्ये यु.एस.ए.मध्ये ७२ इतके होते तर उद्योगात १२ व सेवा क्षेत्रात १६ इतके होते. जपानमध्ये विविध क्षेत्रात हे प्रमाण १८८० मध्ये क्रमशा ६५, १५ व २० इतके आढळते. विकसीत देशात जे संरचनात्मक बदल दिसून येतात व जो विकासाचा दर त्यांनी प्राप्त केला तसाच बदलव आर्थिक वृध्दीचा दर भारतीय अर्थव्यवस्था मागील ६३ वर्षात अनुभवत आहे. वर्तमान काळात भारतातील कृषी उत्पादनाचा / सकल घरेलु उत्पादनातीलवाटा ६० टक्के वरुन २००९-१० मध्ये तो १७.५ टक्के पेक्षा कमी झालेला दिसून येतो. उद्योग क्षेत्राचा वाटा १३ टक्के वरुन २७ टक्के पर्यत वाढला तर जागतीकीकरणानंतरच्या दोन दशकात सेवा क्षेत्राचा वाटा ५५ टक्के इतका झाला. अशा प्रकारचे स्थियतंर मागील अनेक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेत दृष्टीक्षेपास येत आहे. सकल घरेलू उत्पादनात कृषीचा वाटा कमी झाला. १९९०-९१ नंतर सकलघरेलु उत्पादनात उद्योग क्षेत्रातील वाटा विशेष वाढलेला दिसून येत नाही. एकूणच औद्योगिक विकासाच्या दरात कुठेही अवस्था आलेली दिसून येते. याउलट स्थिती चिंनची आहे. चिनमध्ये औद्योगिक क्षेत्राचा सकल घरेलु उत्पादनातील वाटा जवळपास ५० टक्के पेक्षाही जास्त आहे. या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची कामगिरी व राष्ट्रीय उत्पादनातील वाटा अधिक द्रुतगतीने विकसीत झालेला दिसून येतो. विकासाच्या पूर्वाध उद्योग व निर्माण क्षेत्राचे योगदान हे वाढत जाते परंतु या क्षेत्राची प्रगती ज्या गतीने होणे गरजेचे होते त्यागतीने त्यात वाढ घडून आलेली नाही. या संदर्भात मागीलदशकात भारतीय अर्थव्यवस्थेची क्षेत्र निहाय बदल पूढील प्रमाणे प्रस्तुत केले आहे.

**कृषी :-**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. देशात एकूण लगवडी खालीलअसलेले १९० मिलीयन हेक्टर एकूण क्षेत्रफळाच्या ६२ टक्के क्षेत्र आहे. राज्य वार जमिनीच्या प्रतीमध्ये भिन्नता आहे. स्वातंत्र्यानंतर कृषीचा विकास जलद गतीने घडून यावा याकरिता योजनेच्या निर्मीतीपासूनच केंद्रशासनने कृषीला प्राधान्य देवून पहिली पंचवार्षिक योजना ही कृषी पंचवार्षिक योजना म्हणून राबविली. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वतंत्रपूर्ण व्हावा म्हणून कृषीकरिता सिचंनाच्या सोयी, विद्युत व्यवस्था, सरकारी व सहकारी क्षेत्रातून पतपुरवठा बि बियाण्याच्या सवलती, तंत्रज्ञान व अवजड साधन सामग्री खरेदी करण्यात अल्प व्याजदरावर पतपूरवठा अशा आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी कृषीला प्राप्त करुन देण्याकरिता सर्वोतोपरी प्रयत्न केल्या गेले. जमीनीची पोत आणि कस वाढावी याकरिताच विशेष प्रयत्न केल्या गेले परंतु भारतीय कृषीतील एकूण उत्पादन प्रति वर्ष ज्या गतीने त्यात बदल होणे संभवनीय होते तो बदल मात्र मागील स्वातंत्र्यानंतरच्या कोणत्याही वर्षात झालेला दिसून येत नाही. १९५०-५१ साली भारतातील एकूण अन्नधान्याची निर्मीती ६०.६ मिलीयन टन इतकी होती तर २००६-०७ मध्ये २१७.२८ मिलीयन टन २००७-०८ मध्ये २३०.७८ मिलीयन टन, २००८-०९ मध्ये २३४.४७ मिलीयन टन व २००९-१० मध्ये २१८.१९ मिलीयन टन एवढे कृषी उत्पादन झाले. यावरुन स्पष्ट होते की भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राची कामगीरी विशेष समाधानकारक नाही. विकासाचा नकारात्मक दर कृषी क्षेत्रात आढळून येतो. अर्थव्यवस्थेत प्राथमीक क्षेत्राचा विकास घडून येणे अनिवार्य ठरते. कृषी विकास हाच देशाचा आधारभूत विकास ठरतो कारण याच विकासाच्या आधारावर उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास अवलंबून असतो, परंतु क्षेत्रनिहाय संरचनेमध्ये कृषीचे उत्पादन हे भारतासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या देशात घटणारे असेलतर भविष्यकाळात अन्नधान्याची समस्या



Scanned by CamScanner

निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही याशिवाय अन्नधान्याच्या वितरणात एकवाक्यता नसल्यामुळे व संग्रहणाच्या सोयी अपूऱ्या असल्यामुळे प्रतिवर्ष ३५००० टन अन्नधान्य उपयोगाशिवाय वाया जाते. आजही भारतातील २० लाख पेक्षा अधिक जनता रात्रीच्या भोजना शिवाय उपाशी राहते.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषीतील खर्चाचा एकूण खर्चातील वाटयापैकी ५१ टक्के इतका होता तो अकराव्या पंचवार्षिक योजनेत १८ टक्के इतका कमी झाला. एकूण खर्चात वाढदिसत असली तरी कृषीखर्चाच्या टक्केवारीत घट झालेली आढळून येते. लोकसंख्येने अतिरिक्त असलेल्या भारतासारख्या देशात कृषी खर्चातील घट ही भविष्यकाळात अन्नधान्याच्या एकूण उत्पादनावर परिणाम करणारी ठरेल व आशियाखंडात व जगात दुसरी महत्वाची म्हणून ओळखली जाणारी भारतीय अर्थव्यवस्थेल अन्नधान्याच्या समस्येस सामोरे जावे लागेल. १९९० च्या नंतरच्या दशकात असाच अनुभव प्रगत व विकसीत राष्ट्र रशियाच्या संदर्भात आढळून येतो. भारतातील काही प्रगत राज्याचा कृषीतील दहाव्या पंचवार्षिक योजनेत गुजरात राज्याचा वाटा १०.६ प्रति वर्ष इतका होता तोच आठव्या पंचवार्षिक योजनेत १२.४ तर नव्या पंचवार्षिक योजनेत केवळ ४ इतका होता. विशेषतः नव्या पंचवार्षिक योजनेत गुंतवणूकीवर विशेष भर देण्यात आला होता तरी परंतू या योजनेत प्रत्येक राज्याचा कृषीतीलवाटा कमी झाला. आठव्या पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्राचा वाटा ८.९ प्रति वर्ष होता. तो नव्या व दहाव्या पंचवार्षिक योजनेत अनुक्रमे ४ व ४.७ प्रतिवर्ष इतका होता. कृषी क्षेत्रातील १९८०-८१ या कालावधीतील सार्वजनीक क्षेत्रातील गुंतवणूक १९८०-८१ च्या किमतीनुसार ३५ टक्के इतकी होती तर खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक ६५ टक्के इतकी होती तर २००३-०४ मध्ये खाजगी क्षेत्रातील गुंतवणूकीत ८१ टक्के इतकी वाढ झाली तर सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण १९ टक्के इतके कमी झाले. कृषी क्षेत्राचे सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीत वाढ घडून आणणे अतिशय महत्वाचे आहे. कारण कृषी उत्पादनातील घट ही प्रमुख समस्या विकासास बाधा निर्माण करणारी ठरेल. भारतीय कृषी आजही मान्सूनवर अवलंबून आहे. २०००-२००१ मध्ये एकूण लागवडीचे क्षेत्र १२२७.८ लाख हेक्टर इतके उपलब्ध होते. एकूण लागवडीच्या क्षेत्रात प्रति दहा वर्षात वाढ झाली. १९५०-५१ मध्ये एकूण सिंचनाखालील असलेले क्षेत्रफळ २३ मिलीयन हेक्टर इतके होते. २००३-०४ पर्यंत एकूण सिंचनाखालील कृषी क्षेत्राफळाचे प्रमाण ७१ मिलीयन हेक्टर इतके होते. तर अन्नधान्याच्या उत्पादनाकरिता उद्योगात आणलेल्या कृषी क्षेत्रफळाचे प्रमाण १९१ मिलीयन हेक्टर इतके होते. १९५०-५१ मध्ये सिंचनाचे एकूण कृषि लागवडीशी असलेले प्रमाण १७ टक्क्यावरुन २००३-०४ मध्ये ३७ टक्के वाढलेले दिसून येते. भारतातील सर्वच राज्यात सिंचनाच्या सोयीत वाढघडून आणणे हे उत्पादनाच्या वाढीकरिता अतिशय महत्वाचे व गरजेचे आहे. कृषीची उत्पादकीय क्षमता सिंचनावर अवलंबून असते. विदर्भात सिंचनाचे क्षेत्र विकसीत न झाल्यामुळे रोख पिक घेणे शक्य होत नाही व विदर्भात परंपरागत पिकांचे उत्पादन अधिक होत असल्यामुळे शासन निर्धारीत मुल्य व बाजारमूल्य यातील अंतराचा अधिक लाभ विदर्भातील शेतकऱ्यांना कधीच प्राप्त करता आला नाही. याशिवाय विदर्भातील एकही शेतकरी राबविल्या जाणाऱ्या कोणत्याही व्यावसायीक उपक्रमातील भागधारक नसल्यामुळे त्याला संस्थागत लाभ कधीच प्राप्त करता आले नाही. याचा परिणाम त्याच्या ऋणग्रस्तेत वाढव कर्जाचा भार प्रतिवर्ष वाढत गेला व झालेल्या कर्जाची परतफेड वेळेच्या आत करु न शकल्यामुळे शेतकऱ्यासमोर आत्महत्या करण्याशिवाय दूसरा पर्याय शेष राहला नाही अर्थातच आत्महत्या करणे हा त्यावरील उपाय नव्हे. विदर्भातील शेतकऱ्यांनी कृषी उत्पादन कमी व्ययात अधिक चांगले व अधिकमात्रेत प्राप्त करण्याकरिता कृषीशी संबंधीत असलेल्या सर्व माहितीची ज्ञानाची व प्रात्यक्षिके इत्यादी संसाधनाचा उपयोग करुन घेणे गरजेचे आहे. वैज्ञानीक पध्दतीने कृषीचे व्यवस्थापन करणे. विजेचे व पाण्याचे व्यवस्थापन करुन बाजार आवश्यक उत्पादनाची लागवड केल्यास कृषी उत्पादनाला रास्त किंमत प्राप्त होवून किमतीचे व्ययावरील अधिक प्राप्त करणे शक्य होतील व यातूनच शेंतकऱ्यांच्या आर्थिक सधनतेत हळूहळू पण संथपणे वाढ होईल. कृषी उत्पादन अधिक व्हावे याकरिता सर्व स्तरातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्य उत्पादनाचा तूलनेत व अन्य क्षेत्रातील गुंतवणूकीच्या तुलनेत कृषी क्षेत्रातील उत्पादन व गुंतवणूक या दोन्ही घटकाकडे विशेष लक्ष देणे ही आजच्या काळाची गरज असेल अन्यथा २०४० पर्यंत भारताची लोकसंख्या १४० कोटीपर्यंत वाढलेली असेल व वाढलेल्या लोकसंख्येला त्याच्या प्राथमीक गरजा भागविता याव्या हे सर्वच क्षेत्रातील होणाऱ्या विकासाबरोबर अधिक अनिवार्य व महत्वाचे आहे असेच म्हणावे लागेल.

Scanned by CamScanner

औद्योगिक संरचना :-

कृषी विकासाबरोबर देशाचा औद्योगिक विकास घडून आणणे हे देखीलकार्य अतिशय महत्वाचे होय म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्ती नंतर विविध क्षेत्रातील औद्योगिक संरचना अधिक मजबुत व कार्यक्षम व्हावी याकरिता भारत सरकारने वेळोवेळी आवश्यकतेनुसार औद्योगिक धोरण जाहीर केले. समाजवादी अर्थव्यवस्थेची सरंचना स्विकारल्यामुळे औद्योगिक व्यवस्थेत खाजगी व सरकारी उपक्रम यांचे क्षेत्र निश्चित करून अधिक कल्याणकारी व अवजड अशा उद्योग समुहाची मालकी शासनाकडे म्हणजे सार्वजनिक क्षेत्राच्या अंतर्गत निश्चित केली. याचाच अर्थ देशातीलउद्योगाचे व्यवस्थापन व व्यवसायातील कार्यपध्दती या क्षेत्र वेगवेगळया कक्षेतीलव भिन्न नियंत्रणातील उपक्रम राबविले जातील असे वेगवेगळया जाहीर झालेल्या औद्योगिक धोरणातून स्पष्ट झाले. सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक सरकारने (केंद्र सरकार व राज्य सरकार) कडून जनतेचे कल्याण वितरणातील विषमतेवर नियंत्रण ठेवून विषमता कमी करण्याकरिता विशेष व प्रभावी प्रयत्न केल्या गेले. तरीही सामाजीक व आर्थिक विषमता अर्थव्यवस्थेतील विकास कार्यात अडसर ठरत आहे. जागतिक करणाने त्याच्या दोन दशकात समाजाची विभागणी दोन व्यवस्थेत झालेली दिसून येते.

अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्राचा वाटा सन १९५०-५१ मध्ये ९३-९४ च्या किमतीनुसार १८,६७० करोड रुपये व सकल राष्ट्रीय उत्पादनातीलवाटा १३.३ टक्के इतका होता. तो २००१-०२ मध्ये ३,३८,११५ करोड रुपये व सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा २६.७ टक्के इतका झाला. २००६ मध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास दर ९.१ टक्के इतका होता. जागतिक मंदीमुळे २००९-१० औद्योगिक विकासाचा दर घटून तो ६ टक्के पर्यंत खाली घसरला हे प्रमाण २८ टक्के इतके होते. अर्थव्यवस्थेतील औद्योगिकरण अति जलद गतीने व्हावे व त्याचा विकास पूरेशा प्रमाणात व्हावा याकरिता सरकारने प्रथम योजनेच्या सुरुवाती बरोबरच सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक अधिक सुदृढ व्हावी या दृष्टिने तर रोजगारच्या क्षेत्रात वाढ करण्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न केले १९५१ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील कार्यरत उद्योगाची संख्या केवळ ५ इतकी होती तर त्यामधील गुंतवणूक २९ करोड रुपये इतकी होती. २००७ पर्यंत उद्योगाच्या संख्येत २४७ इतकी वाढ झाली तर गुंतवणूक ही ४ लक्ष करोड पेक्षाही जास्त केलेली दिसून येते. भारतात औद्योगिक क्षेत्रातील वाढ ही सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांच्यातून विकसीत होते. औद्योगिकरणातूनच देशाच्या प्राथमिक क्षेत्राचा विकास व सेवा क्षेत्राचा विकास घडून येतो व रोजगाराच्या संरचनेत व्यापक बदल घडून आणता येतो परंतु पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आरंभापासून तर अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या दोन वर्षाच्या कालावधीतील औद्योगिकरणाचा दर व सकल राष्ट्रीय उत्पादनातील त्याचा वाटा अन्य देशाप्रमाणे उदा दक्षिण आशिया खंडातील चिन किंवा दक्षिण कोरिया यांच्या तुलनेत ५० टक्के पेक्षाही कमी आहे. १९८१-८२ ते १९९०-९१ या कालावधीत निर्माणीचा दर ७.८ टक्के इतके होता तो १९९३-९४-९५ ते २००४-०५ या कालावधीत ६.७ टक्के इतका कमी झाला. अन्य औद्योगिक उत्पादनातील दरातही घट झाली. देशाच्या अर्थव्यवस्थेतील रोजगाराचे सैध्दांतिक विश्लेषण करीत असताना औद्योगिकीकरणाचा परिणाम हा अधिक प्रभावशाली ठरलेला दिसून येतो. परंपरागत अर्थशास्त्रज्ञाच्या मते अर्थव्यवस्था हि नेहमी संतूलीत असते (पूर्णस्पर्धा) परंतु १९२९ च्या जागतीक मंदीनंतर हे स्पष्ट झाले की अर्थव्यवस्थेतील संतूलन केवळ मागणी पूरवठा या तत्वावरुनच अर्थव्यवस्था संतुलीत होते असे नाही. संतूलन निर्माण करण्याकरिता जेव्हा प्रभावी मागणी कमी होते तेव्हा सरकारी हस्तक्षेप महत्वाचा ठरतो (किन्स). म्हणजेच रोजगार वाढ ही सरकारी क्षेत्रातील गुंतवणूकीवर अवलंबून असते. भारताने समाजवादी समाज रचनेचे धोरण स्विकारल्यावर सार्वजनिक क्षेत्रातील मालकी सरकारकडे निश्चित केले व सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच सार्वजनिक क्षेत्रातून रोजगार अधिक प्रमाणात निर्माण व्हावा याकरिता विविध प्रयत्न केले. या दृष्टिने खाजगी क्षेत्राच्या तूलनेत सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार तूलनात्मक दृष्टया १९७१ मध्ये सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमीकांची संख्या ११ लाख इतकी होती तर भांडवली स्थापणेचा दर **(Capital Formation)** हा सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ५.८ टक्के इतका होता. एकूण गुंतवणूकीतून निर्माण होणारा रोजगार न्यून होता. याच कालावधीत खाजगी क्षेत्रातील कार्य करणाऱ्या श्रमीकांची संख्या ६७ लाख इतकी होती. २००५ मध्ये सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या २१४ लाख इतकी झाली तर भांडवली स्थापनेचा दर हा सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या केवळ ७ टक्के इतका होता.

Scanned by CamScanner

स्वातंत्र्यानंतर खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार वाढविण्याकरिता योजनेच्या माध्यमातून पर्याप्त गुंतवणूक करुन प्रयत्न केल्या गेले. उदा. सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत अधिकोषातून प्राप्त होणारा रोजगार हा सर्वात जास्त आहे तर एकूनच संघटीत क्षेत्रातील रोजगार निर्मिती क्षमता ६९ टक्के पेक्षाही जास्त असलेली दिसून येते. मिश्र अर्थव्यवस्थेतील आर्थिक संरचना स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीत संघटीत क्षेत्र व असंघटीत क्षेत्र यांच्यातील उत्पादन व रोजगार वाढविण्याकडे सरकारने वेळोवेळी जाहीर केलेलया औद्योगिक धोरणाच्या प्रभावाने अधिक कार्यक्षम व गतिक्षम करण्यात यश आले असले तरी औद्योगिक क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा अन्य आशियाई देशापेक्षा कमी आहे. औद्योगिक उत्पादनाचा वार्षिक वृध्दी दर जो पर्यन्त वाढणार नाही तो पर्यंत अर्थव्यवस्थेतील प्राथमीक व सहाय्यक क्षेत्र व सेवा क्षेत्राचा निव्वळ घरेलू पातळी वरील विकास शक्य होणार नाही. भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात खंताची व खेदाची बाब म्हणजे आजही औद्योगिक उत्पादनातील बदल व त्याचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान स्वातंत्र्यानंतरच्या अनेक वर्षात ३० टक्के पेक्षा अधिक होऊ शकले नाही. जागतिक मंदीच्या तडाख्यात भारतीय उद्योगही प्रभावित झाले म्हणून वार्षिक वृध्दी दरातील बदल मंदीच्या कालावधीत नकारात्मक झाले. ऑक्टोबर २०१० च्या आंतरराष्ट्रीय नाणे निधिच्या अहवालानुसार भारतातील औद्योगिक विकासाचा वार्षिक वृध्दी दर १२ टक्के पेक्षाही जास्त राहील तर सर्वसामान्य आर्थिक विकासाचा दर ९.१ टक्के इतक २०१० करिता भाकीत केला गेला आहे. २०११ मध्ये हाच विकासाचा दर ८.५ टक्के इतका वर्तविण्यात आला आहे. चिनचा आर्थिक विकासाचा दर २०११ मध्ये भारतीय विकास दरापेक्षा कमी अंदाजीत केला आहे. एकूणच जगाचा आर्थिक विकास दर सन २०११ मध्ये ४ टक्के इतका वर्तविण्यात आला. या सर्व आर्थिक चढ उतार किंवा व्यापारातील क्षेत्रीय बदल व त्याचा मागणीवरील परीणाम प्रतिकुल दिशेने अर्थव्यवस्थेला भविष्यकाळात प्रभावित करेल.

औद्योगिक उत्पादनाला देशी व विदेशी या मागणी संरचनेत सकारात्मक विशेष परिवर्तन घडून आणणे महत्वाचे आहे. निर्यात आधारीत उत्पादनाकरिता कार्यक्षम निर्माणीची उभारणी करणे व आंतरराष्ट्रीय दर्जाचे गुणवत्ताधारक उत्पादन केल्याशिवाय विदेश बाजारातील औद्योगिक वस्तूंची मागणी किंवा आंतरराष्ट्रीय कृषी बाजारात इस्त्रायल, तायवान, ब्राझील, चिन या सारख्या राष्ट्रानी विकसीत राष्ट्रातील कृषी आधारीत वस्तूची बाजारपेठ खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणानंतर पूर्णतः काबीज केलेली आहे. औद्योगिक उत्पादनाच्या बाबतीत मात्र भारताचे निर्यातधिक्य कमी आहे. सॉफ्टवेअर बाजारातील आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणीतील बदल २००५ नंतर प्रतिकुल झाली. भारताचे अर्थव्यवस्थेतील कृषी आधारीत उत्पादनव्यवस्था किंवा उद्योग प्रधान वस्तूंची निर्यात वाढविण्यासाठीचे आवश्यक ते सर्व प्रयत्न सकलराष्ट्रीय उत्पादनात औद्योगिक क्षेत्राचा वाटा वाढविण्याकरिता करणे अत्यंत गरजेचे आहे. भारतातील खणिज आधारीत उद्योग, कृषी आधारीत उद्योग, नैसर्गीक वायू निर्मिती उद्योग, विजेचे उत्पादन, लोह पोलाद सिमेंट कापड व इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाची पायाभरणी अजूनही विकसीत राष्ट्राच्या तूलनेत पर्याप्त गुंतवणूकीच्या अभावी मागासलेली आहे. दक्षिण कोरिया सारख्या लहान देशांनी लोहपोलादाच्या उद्योगातील आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज केली. नैसर्गीक संसाधनाचा पर्याप्त साठा उपलब्ध असल्यावरही पर्याप्त संशोधनाच्या व नवप्रवर्तनाच्या अभावी भारताने उद्योगाची कामगिरी स्वातंत्र्यानंतर अन्य विकसनशील राष्ट्राचा तूलनेत अविकसीतच आहे. असेच म्हणावे लागेल. अर्थव्यवस्था रोजगारास व आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्याकरिता कृषी क्षेत्रातील आदानातील गुणात्मक परिवर्तन औद्योगिक क्षेत्रात संरचनात्मक बदल घडून आणण्यास सहकार्य करेल असे झाले तरच भारतातील परंपरागत व वर्षेनुवर्षे प्रलंबित असलेली बेरोजगारीची व गरिबीची समस्या सोडविणे शक्य होईल. कृषी उत्पादनाचा सकलराष्ट्रीय उत्पादनातील वाटा कमी झाला परंतु ६५ टक्के ग्रामीण रोजगार आजही कृषीवरच अवलंबून आहे. परिणामतः ग्रामिण सुप्त बेकारीच्या वाढीमुळे ग्रामीण विभागात बेरोजगारी ही वाढत जाते शिवाय उद्योगातील उभारणीच्या अभावी व कुटीर उद्योगाच्या विकासातील अडचणीमुळे भारतीय ग्रामीण क्षेत्र दिवसेंदिवस ओस पडत आहे. यातूनच रोजगार प्राप्त करण्याकरिता कृषी श्रमीक शहराकडे स्थलांतरीत होवून औद्योगिक श्रमीक होण्याकरिता नागरीक्षेत्रात श्रम बाजारपेठेत स्पर्धा वाढवित आहे यातूनच नागरी क्षेत्रात वसाहती पासून तर आरोग्य व शैक्षणिक व्यवस्थापनांचे प्रश्न दिवसे दिवस गुंतगुंतीचे होत आहे. नागरी विभागातील जटीलता व ग्रामीण क्षेत्रातील उदासीनता हे कृषी उत्पादनातील व उद्योग क्षेत्रातील उत्पादन वाढीला आव्हान ठरत आहे याच कारणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील दोन्ही क्षेत्र

Scanned by CamScanner

अन्य विकसीत व विकसनशील राष्ट्रापेक्षा भक्कम असल्यावरही योग्य व उपक्रमीय दृष्टीच्या अभावी पर्याप्त प्रमाणात विकसीत झाले नाही.

**सेवाक्षेत्राची कामगीरी :-**

अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे तिसऱ्या स्थानावर मूल्यमापन केले जाते. जागतीक करणानंतर अनेक विकसनशील राष्ट्राची सेवा क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनिय असलेली दिसून येते. १९५०-५१ या कालावधीत सेवा क्षेत्राचा वृध्दीदर ४.६ टक्के इतका होता तो २००५-०६ मध्ये ८.७ टक्के इतका झाला सेवा क्षेत्राच्या अंतर्गत खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र याची कामगिरी उल्लेखनिय समजली जाते. सकल राष्ट्रीय उत्पादनातील सेवा क्षेत्राचा वाटा १९५०-५१ मध्ये १९९३-९४ च्या किंमतीनूसार २८ टक्के इतका होता तर १९८०-८१ मध्ये त्यात वाढ होवून सेवा क्षेत्राचा वाटा ३६ टक्के इतका झाला. २००४-०५ मध्ये याचे प्रमाण ४७.२ टक्के इतके झाले. २००९ मध्ये सेवाक्षेत्राची कामगिरी अतिशय उल्लेखनिय व सकल राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचे योगदान ५६ टक्के पेक्षाही अधिक झाले. चिनच्या अर्थव्यवस्थेतेतील हे प्रमाण ३० टक्के पेक्षा जास्त नाही. चिनच्या आर्थिक विकासाचा वृध्दीदर भारतीय अर्थव्यवस्थापेक्षा जास्त आहे व आज अमेरिका, चिन आंतरराष्ट्रीय व्यापार सेवा क्षेत्रातील तुलनात्मक फरकाने चिनला अधिक लाभदायी ठरत आहे. म्हणजेच चिन अंतर्गत सेवा क्षेत्राचा विस्तार होवूनही त्याचा वाटा नियंत्रित ठेवण्यात चिनला यश प्राप्त झाले आहे. सेवा क्षेत्रातील परिवर्तन व सकल राष्ट्रीय उत्पादनातील त्याचा वाढत जाणारा वाटा देशाच्या आर्थिक प्रगतीचे जनक म्हणून ओळखले जात असले तरी त्यातील वाढ ही वास्तविक दर्जाची असणे गरजेचे होय. अन्यथा सेवा क्षेत्रातील कामगिरी चा आधार केवळ मौद्रीक परिव्ययातील आधाराने प्रभावीत होत असेल तर अर्थव्यवस्थेवर त्याचे दीर्घकालीन विपरीत परिणाम होईल. याचा अनेकदा अनुभव भारतीय भांडवल बाजारपेठेतील चढ उतारातून स्पष्ट होते हे गुंतवणूकदारांना देखिल त्याचा अनुभव येत आहे. भारतीय भांडवली बाजारातील लाभप्रदता व विश्वसनियता अन्य आशियाई देशापेक्षा जास्त असल्यामुळे विदेशी संस्थागत गुंतवणूकीचे परिमाण हे मागील दशकात १०० टक्के इतके वाढले. यावरुन हे स्पष्ट होते की भारतीय अर्थव्यवस्थेतील लाभप्रदता ही निश्चितपणे विदेशी भांडवल आकर्षित करण्यात यश संपादन करीत आहे परंतु याच संस्थागत गुंतवणूकीतून भांडवलीय बाजारातील देशी निगमाकडे हस्तांतरीत झाल्यावर किंवा त्यांची गुंतवणूक झाल्यावर निगमातील उत्पादनाची मागणी विदेशी बाजारपेठेतील स्पर्धेचे आव्हान स्विकारुन भारताचे निर्याताधिक्य वाढविण्यात विशेषतः जागतीकी करणानंतरही यश प्राप्त करु शकले नाही. परिणामतः आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाहातील सक्रमण तूलनात्मक दृष्टया विकसनशिल राष्ट्रात दिर्घकाळात अधिक फायदेशिर ठरेल असे म्हणता येणार नाही. संस्थागत गुंतवणूकीत व थेट प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या संदर्भात चिनच्या अर्थव्यवस्थेतील आकर्षन भारतीय अर्थव्यवस्थेपेक्षा जास्त आहे. परंतु स्वातंत्र्यानंतर भारताने संस्थागत गुंतवणूक आकर्षीत करुन आंतरराष्ट्रीय बाजारातील भांडवलप्रवाह आकर्षीत केल्यामुळे एकूण गुतवणूकीतून व प्रकल्पाच्या विकासाला विशेष साहय होत आहे. याशिवाय सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक कमी केल्यामुळे निरगुंतवणूकीतून प्राप्त झालेले वित्त अन्य क्षेत्रातील गुंतवणूकीकडे वळविण्यात व राजकोषीय तुट कमी करण्यास उपयोगी ठरत आहे.

या शिवाय स्वातंत्र्यानंतर ज्या विविध सेवाचा विकास करण्याकरिता प्रयत्न करण्यात आले त्यातील विकासामुळे देशी बाजारपेठ व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मधील मागणी पूर्ण करण्याकडे उत्पादनाचा पूरवठा करुन बाजारातील मागणी पूरवठयाचे संतूलन हे विकसीत केलेल्या सेवेतून निर्माण होत आहे. स्वातंत्र्यानंतर प्रामुख्याने रस्तेबांधणी, आरोग्य, शिक्षण, विज, सिंचनाच्या सोयी, दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक्स मेल, इलेक्ट्रॉनिक्स सेवा, तंत्रज्ञानातील परिवर्तन, भ्रंमणध्वनी, संगणक इत्यादी व याहीपेक्षा आधूनीक सेवा उदा. (**Call Centre**), मागणी केंद्रे, अधिकोषाचे परस्पर इलेक्ट्रॉनिक्स द्वारा होणारे व्यवहार, अधिक गतिशिलवाहनांच्या साधनाचा विकास व इंटरनेट सारख्या सुविधा मानवी जीवनातील व्यवहाराचे अंतर कमी करीत आहे. या सर्व बाबीचा अंर्तभाव सामन्यतः सेवा क्षेत्रात केला जातो. इंटरनेटच्या शोधामुळे आज जग एकत्र येत आहे व त्याचा उपयोग करुन दूरचित्र प्रक्षेपण ऐकण्याची सुवीधा उपलब्ध झाली आहे. देशातील ग्रामीण क्षेत्रेही आता दूरसंचार व्यवस्थेने जोडली जात आहे या सर्व बदलाचा साधनाचा मानवी जीवनावर व मनावर दिर्घकालीन परिणाम होत आहे.

भारतातील विविध क्षेत्रात कार्यरत सेवा क्षेत्राचा स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीत कसा बदल होत गेला याचा



Scanned by CamScanner

थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न पूढीलप्रमाणे केला आहे. देशातील विद्यूत पूरवठा १९५१-५२ साली ५ किलोहर्ट इतका होता तो २००६-०७ मधे ११३८ किलो हर्ट इतका झाला. १९५०-५१ मध्ये सिमेंटची निर्मीती भारतात २.७ मिलीयन टन इतकी होती ती २००६-०७ मध्ये १५४ मिलियन टन इतकी झाली.

खाणीतून निर्माण होणाऱ्या कोळशाची निर्मीती १९५०-५१ मध्ये २ मिलीयन टन इतकी होती ती २००६-०७ मध्ये ४६२ मिलीयन टन इतकी झाली. लोहपोलाद चे उत्पादन २००६-०७ मध्ये ५० मिलीयन टन इतके झाले. दूरध्वनीचा पूरवठा २७२ मिलीयन्स दूरध्वनी संच २००६-०७ पर्यंत लोकांना वितरीत करण्यात आले होते. १९५०-५१ मध्ये भारतात केवळ ३ हजार खेडयात विजेचा पुरवठा केला जात होता तो २००६-०७ मध्ये ५०७ हजार ग्रामीण भागापर्यंत करता आला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतात रेल्वे व वाहतूकीच्या साधनात विकास घडून आणण्याकरिता योजनेतून विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे उदा. भारतातील रस्ते वाहतूक अधिक सक्षम व्हावे याकरिता व सर्व ग्रामीण क्षेत्र बाजारपेठेशी जोडले जावे याकरिता पंतप्रधान सडक योजना कार्यक्रम आरंभ करण्यात आला. १९५०-५१ मध्ये ४०० हजार किमी चे पक्के रस्ते अस्तित्वात होते तर २००६-०७ मध्ये २४८३ हजार किमी इतके झाले. रेल्वेच्या विकासाकरिता केंद्र सरकारने विशेष प्रयत्न केले आहे. अतिशय दूर्गम व दूर्मीळ भौगोलिक संरचनेतून रेल्वे वाहतूकीचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. नव्याने निर्माण केलेला मार्ग म्हणजे कश्मीर परिसरात रेल्वेची सेवा सामान्य जनतेला उपलब्ध करुन देण्यात आली आहे. १९५०-५१ मध्ये ५३,६०० किमी चे रेल्वे रस्ते भारतात उपलब्ध होते. तर २००५-०६ मध्ये त्यात वाढ होवून ते ६३ हजार किमी पर्यन्त वाढविल्या गेले. हवाई वाहतूक व जलवहातूकीच्या विकासाकरिता प्राधन्य देवून त्यांच्या विकासाकरिता विशेष प्रयत्न केल्या जात आहे.

शिक्षणाचा दर्जा व विस्तार यात वाढ व्हावी याकरिता स्वातंत्र्यानंतर विविध आयोग, समित्या स्थापन करुन सरकारने सातत्याने गुणात्मकतेचा उपयोजनावर भर दिली आहे. प्राथमीक व माध्यमिक शालांत शिक्षणातील गळतीचे व अनुत्तीर्ण विद्यार्थ्याचे प्रमाण थांबविण्याकरिता विदेशी व्यवस्थेवर आधारीत सर्व राज्यात दुपारचे जेवण उपलब्ध करुन दिल्या जात आहे. ज्यामुळे शाळातील धारणा शक्ती भविष्यामध्ये वाढविणे शक्य होईल. २००१-०२ मध्ये भारतात प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या वर्ग १ ते ८ मध्ये विद्यार्थ्याचे प्रमाण १५.२७ करोड इतके झाले. २००४-०५ मध्ये माध्यमीक वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नामांकन २.४३ करोड इतके होते. यात मूलीचे प्रतिशत प्रमाण ४५.२८ टक्के इतके आहे. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे नामांकन २००८-०९ मध्ये १३ लक्ष होते. शिक्षणावर होणारा खर्च हा खर्च नसून गुंतवणूक समजल्या जाते व हि गुंतवणूक शासनाने सकलराष्ट्रीय उत्पादनाच्या ६ टक्के इतकी प्रतिवर्ष करावी असा सामान्यतः निकष लावण्यात येतो. परंतु भारतात आजही ६ टक्के इतका खर्च शिक्षणावर केल्या जात नाही. १९५०-५१ मध्ये ०.६४ टक्के इतका होता तो २००४-०५ मध्ये ३.४९ इतका वाढला. १९९०-९१ हे प्रमाण ४.०७ टक्के इतके दिसून येते. उच्च शिक्षणातील नामांकन हे केवळ १३ टक्के इतके आहे. याचाच अर्थ ८७ टक्के नामांकन उच्च शिक्षणाच्या बाहेर आहे. सर्वांना शिक्षण या योजने अंतर्गत उच्च शिक्षणाचे नामांकन वाढविण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे. म्हणून अलिकडील काळात सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठण करण्यात आले होते. समितीच्या शिफारशीनुसार भारतात सर्वांना उच्च शिक्षण देण्याकरिता १५०० विश्व विद्यालयाच्या स्थापनेची शक्यता त्यांनी आपल्या अहवालातून स्पष्ट केली आहे. भविष्यकालात अर्थव्यवस्थेतील निर्माण होणारे उद्योग व त्यातून आवश्यक रोजगारीकरिता व्यावसायिक अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्यांची अधिक गरज भासणार आहे म्हणून देशात परपरंगत शिक्षणाच्या विकासाबरोबर आधूनिकेतवर आधारीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विकासाची अधिक गरज भविष्यात राहणार आहे. कारण भारतात सेवा क्षेत्राचा विकास ज्या गतीने होत आहे त्यानुसार व्यावसायभिमूख शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्यांची मागणी बाजारपेठेत अधिक राहील. भारतातील संगणक शिक्षण प्रणित तरुण आज विदेशातील रोजगार प्राप्त करुन भारतीय संगणक प्रणालींच्या विकासाकरिता प्रयत्नशील असल्यामुळेच आज भारताची सॉफ्टवेअर व हार्डवेअर च्या क्षेत्रात जगात मक्तेदारी आहे. संगणक व सुटे भाग यांच्या प्रचंड निर्यातीमुळे भारतीय विदेशी व्यापारातील आयाताधिक्य काही प्रमाणात नियंत्रीत करण्यात यश प्राप्त झाले.

Scanned by CamScanner

अर्थव्यवस्थेत वित्तीय क्षेत्राची कामगिरी ही प्रामुख्याने राष्ट्रीयकृत अधिकोष, खाजगी अधिकोष, व विदेशी अधिकोष यांच्या माध्यमातून पार पाडली जाते. यात राष्ट्रीयकृत अधिकोषाचे स्थान अत्यंत महतवाचे होय. याच बरोबर खाजगी अधिकोष सहकारी अधिकोष यांच्या कामगिरीमुळे भारतीय वित्तीय बाजार निरंतर गतिशी असलेला दिसतो. अर्थसाहय करणामध्ये राष्ट्रीयकृत अधिकोषाचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. १९६९ मध्ये अधिकोषाच्या एकून शाखा ८,२६० इतक्या होत्या. यात १८६० ग्रामीण शांखाचा अंर्तभाव होतो. १९९१ मध्ये देशातील अधिकोषाच्या एकूण शाखा ६१,६५० इतक्या होत्या यात ग्रामीण शाखांची संख्या २,७५० इतकी होती, २००० मध्ये हे प्रमाण बदलून एकूण शाखांची संख्या ७२,१७० इतकी होती तर ग्रामीण भागात कार्यरत राहाणाऱ्या ३०,५९० शाखांचा समावेश असलेला दिसून येतो. ग्रामिण क्षेत्र व नागरीक्षेत्रा अंतर्गत ऋणाचा नियमीत पूरवठा करण्यात राष्ट्रीयकृत अधिकोषाला यश प्राप्त झाले आहे. एकूणच सेवा क्षेत्रातील कामगिरी ही चांगली आहे व भविष्यात यात पून्हा वाढ करता येईल यामुळे विकासाच्या संरचनेत क्षेत्रनिहाय कामगिरीचे प्रमाण संतूलीत ठेवून त्यापासून अर्थव्यवस्थेला शाश्वत दिर्घकालीन विकास प्राप्त करणे शक्य होईल. अन्यथा अल्पकालावधीतील कामगिरीचा परिणाम अर्थव्यवस्थेवर प्रतिकुल होवू शकतो. हेच विशेषतः २००८ मध्ये युएसए मध्ये घडले, व यातूनच अधिकोषीय संस्थाचे दिवाळे निघाले व अमेरिकन सरकारला अर्थव्यवस्था संतूलीत ठेवण्याकरिता शासकीय पॅकेजची वेळोवेळी घोषणा करावी लागली.

आज जगातील सर्वात मोठी म्हणून ओळखली जाणारी अमेरीकन अर्थव्यवस्था अंतर्गत व बाहयर्गत ऋणाच्या समस्येने ग्रस्त आहे. समर लॉरेन्स सारख्या अर्थशास्त्रज्ञाने २०२० पर्यंत अमेरीकन अर्थव्यवस्था पूर्व स्थिती येणं शक्य नाही. असे स्पष्ट केले. याचा परिणाम संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. अमेरीकन धोरणाने प्रभावित राष्ट्रे यांना या परिणामांची जास्त झळ सहन करावी लागत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या निर्यात नितीवर त्याचा परिणाम होऊन सरकारला उद्योग जगत संतूलीत ठेवण्याकरीता भक्कम पॅकेजचे देणे घोषीत करावे लागले. जागतिक मंदीचा सर्वात मोठा परिणाम यूरोप खंडातील जर्मनी हे राष्ट्र वगळल्यास सर्वच राष्ट्रावर विपरीत परिणाम झालेत दिसून येतो. ग्रीक, फ्रान्स, इंग्लड, आर्यलंड, या राष्ट्रांना मंदीतून बाहेर निघण्याकरीता व अर्थव्यवस्था पूर्व स्थितीत संतूलीत करण्याकरीता अधिक काळापर्यंन्त परिश्रम या राष्ट्रांना घ्यावे लागेल. जागतीकीकरणाचा परिणाम म्हणून जगातील भांडवल बाजार मुक्त करण्यात आले याचा परिणाम विकसनशील राष्ट्राच्या गुंतवूणकीवर होत आहे. गुंतवूणक फलनातून व्याज किंवा लाभ हया दोन्ही घटना गुंतवणूकदाराला उत्पन्न प्राप्त करून देते व विकसनशील देशात भांडवलाची सिमांत लाभक्षमता अधिक असल्यामुळे गुंतवणूक दारांना त्याचा अपेक्षीत फायदा होतो. परंतू त्या गुंतवणूकीतून विकसनशील राष्ट्रात जो रोजगार निर्माण होणे अपेक्षीत असते तो रोजगार निर्माण न झाल्यामुळे प्रभावी मागणीची क्षमता विस्तारीत करणे शक्य होत नाही. असा अनुभव विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक व विदेशी संस्थागत गुतवणूक यातून दिसून येतो परिणामतः राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक व रोजगार निर्माणीचा अपेक्षीत दर 'स्व' बचतीतून विकसीत केल्यास शाश्वत व टीकाऊ विकास प्राप्त करणे शक्य होईल. म्हणून भारता सारख्या नजिकच्या काळात महासत्ता बनू पाहणाऱ्या राष्ट्राची आंतरराष्ट्रीय पत विकसित झाल्यास लाभ त्याच क्षेत्राच्या विकासाकरीता उपयोगात आणने लाभाचे होईल. ज्या ठिकाणी शासनाचा गुंतवणूक केल्यास गुंतवणूकीचा खर्च अधिक असेल अथवा दूर्मीळ परंतू महत्वाच्या क्षेत्रातील गुंतवणूकीकरीता थेट गूंतवणूक, व भांडवल बाजारातील होत असलेली गुंतवणूक देशाला लाभकारी ठरू शकेल. आज भारत आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ म्हणून विकसित होत आहे. जगातील विविध निगमे भारतीय अर्थव्यवस्थेत गुंतवणूकीकरीता आकर्षित होत आहे. देशी उद्योग व विदेशी उपक्रम यांच्याच सहकार्याने भविष्यातील अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरू असेल यात शंका नाही. अलिकडेच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचा भारतातील दौरा स्पष्ट करतो की, भविष्यात आशिया खंडात वर्चस्व कायम ठेवावयाचे असेल तर भारतासारख्या देशाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे त्यांच्या आगमणाने सिद्ध झाले आहे व त्यांनी जाता-जाता भारत एक महासत्ता देश होण्याच्या मार्गावर असण्यापेक्षा तो महासत्ता झाला आहे. हेही त्यांनी उघडपणे उकल केले आहे. जगातील प्रत्येक राष्ट्राला आज भारताच्या मदतीची गरज आहे म्हणून युनायटेड नेशन्स सेक्युरीटज कौन्सील मधील स्थायी सदस्यांचा भारताच्या मागणी करीता अनेकांनी पाठपुरावा केला आहे. यातूनच अनेक बाबी ज्या

Scanned by CamScanner

स्पष्ट होतात व भविष्यात या नुसारच भारताला आपले धोरण ठरविता आले तर जगातील महासत्ता व त्याचे केंद्रबिंदू भारत ठरू शकेल.

आर्थिक इतिहासाच्या संदर्भात स्पष्ट करावयाचे झाल्यास भारताचे स्वातंत्र्यनंतरच्या कालखंडातील सकल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली आहे. दरडोई उत्पन्नात सकारात्मक बदल दिसून येतो. रोजगार व व्यवस्थेत रचनात्मक परिवर्तन घडून येत आहे. गुंतवणूक व बचत ही निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या दिशेने प्राप्त होत आहे. परकीय गंगाजळीत प्रथमताच १०० टक्के वाढ झाली आहे. जगातील अन्य भांडवली बाजारपेठेपैकी भारतीय भांडवल बाजार भक्कम पायावर स्थिर आहे. अर्थातच भारतीय अर्थव्यवस्थेची मूलभूत संरचना मजबूत आहे. परिणामताः जगात आर्थिक आरिष्ट आल्यावरही त्याचा प्रत्यक्ष परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला नाही. परंतु अप्रत्यक्ष परिणामाने अर्थव्यवस्था प्रभावित झाली. उदा. या कालावधीत आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलांच्या किंमतीतील तफावत, डॉलरची मागणी, अमेरीकेतून होत असलेली आयात या सर्व घटकाचा परिणाम काही प्रमाणात भारतीय अर्थव्यवस्थेला प्रभावित करू शकली.

विकासाकरीता वेगवेगळे संदर्भ उपयोगात आणल्यावरही अंतिमतः हेच सिद्ध होते की अर्थशास्त्रीय सिद्धांताची रचना व त्याचा अनुभवातून होत असलेला उपयोग ही समाजातील कार्यरत असणाऱ्या मनुष्य समाजावरच अवलबूंन असते. अर्थातच सैद्धांतीक रचना यातून व्यवहाराची दिशा प्राप्त होते. मात्र त्याची अमंलबजावणी प्रत्यक्षात त्याच दिशेने होईल किंवा नाही हे स्पष्ट करणे शक्य होत नाही. उदा.सोन्याच्या किंमतीत वाढ होऊनही भारतीय बाजारपेठेतील सोन्याची मागणी पूर्वीपेक्षा २० टक्के अधिक वाढलेली दिसून येते. अश्या प्रकारे सैद्धांतीक बाबीचा प्रभाव व लाभा करीता उपयोगात आणली जाणारी संसाधने यात अंतर जेंव्हा निर्माण होते तेव्हां अनेक समस्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर जन्माला येतात. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात समग्र विचार करावयाचा झाल्यास त्याचा एकून परिणाम अनूकूल आहे हे अनेक घटकांनी स्पष्ट होते. त्याचा उल्लेख वर केलेलाच आहे. परंतू सूक्ष्म अवलोकन केल्यास अनेक धोकेही अर्थव्यवस्थेत आजही आपले स्थान पक्के करून कार्यरत आहे. विशेषताः जागतीकी करणानंतर जागतीकीरणाचे लाभ अतिशय सामान्य नागरीकाला होईल याचा भ्रमनिरास झाला या उलट आर्थिक विषमतेत वाढ होत आहे हे दिसून येते भांडवली सत्तेचा प्रभाव कायद्यातील सत्तेला प्रभावित व आकर्षीत करण्यात यश प्राप्त करीत आहे. यातूनच आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होताना दिसते. साम्यवादी ध्येय धोरणाची आशादायी व विकासान्मुख व नियंत्रित आर्थिक रचनेत छेद दिल्यावर ही बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा परिणाम सक्रमण स्थित असलेल्या अर्थव्यवस्थेला व भारतासारख्या अर्थव्यवस्थेला किती लाभदायक ठरेल हा महत्वाचा प्रश्न होय. या संदर्भात फ्रान्सचे माजी राष्ट्राध्यक्ष जॅक चिरॅक यांनीही अशीच चिंता व्यक्त केली होती. आज भारतात अनेक समस्या आहे. समस्यांचे जाळे इतके विस्तारलेले आहे की एक समस्या ही दुसऱ्या समस्येशी संबधीत आहे. पायाभूत सुविधामध्ये वाढ करणे, ग्रामीण क्षेत्राचा विकास करणे, शहरी व ग्रामीण विकासातील अंतर कमी करणे, देशातील गरीबी, बेकारी, सामाजिक विषमता, या महत्वाच्या व मूळ समस्या होय.

देशात तंत्रज्ञानाचा विकास पूरेशा प्रमाणात होत नसल्यामुळे तंत्रज्ञानांची आयात करण्यातच भारताचे अधिक भांडवल खर्च होते. याकरीता भारताने संशोधनातील गुंतवणूक व गुणवत्ता याचा दर्जा वाढविणे गरजेचे आहे. भारतीय कृषी प्रधान निर्यात ही संरक्षण साहित्य निर्यातीत परिवर्तीत होणे नितांत आवश्यक आहे व ती काळाची गरज आहे. हे जेव्हां होईल तेव्हांच भारताचे विकासाचे सर्व मार्ग खूले होतील. या शिवाय शैक्षणिक धोरणे, आरोग्य व्यवस्था, कामातील शिस्त, राष्ट्रीय कार्यप्रवाहात योगदान, विविध सांधनाचा विकास, सामाजीक न्याय, व्यक्ती विकासाला वाव नविन ज्ञानाचे संशोधन सुदृढ लोकशाहीची निर्मीती व उपयोग, कार्याच्या समान संधी, योग्य चारित्र्य, सामाजिक स्तरातील उच्च - निच कल्पनांना तिलांजली व राष्ट्रीय एकात्मतेच्या जाणीवेचा विस्तार यासारख्या अनेक घटकांचा आजही तळागाळतला व सामान्य जनतेच्या संदर्भात विशेष संबंधित आहे. याची जाणिव सर्वांना असणे अतिशय महत्वाचे आहे. अर्थातच विविध प्रश्न हे समाजातील सामान्यांशी संबधीत असते आणी म्हणूनच मार्शलने आपल्या व्याख्येत अर्थशास्त्र सामान्यांचे अध्ययन करणारे शात्र होय असे परिभाषीत केले आहे. याचा अर्थ समाजातील जनसमुहाचे कल्याण व मानवीय मुल्याचे संरक्षण, व जपवणूक व नैतकितेच्या विकासातील तत्वे हीच वेगवेगळया सैद्धांतीक रचनेचा आधार म्हणून ओळखल्या जाते हेच तत्वज्ञान विविध अर्थशास्त्रीय सिद्धातांच्या कार्यप्रणालीतून जनसामान्याच्या वर्तणूकीच्या व व्यवहाराच्या पूर्तते करीता उपयोगात आणले जाते. हाच जनसामान्याच्या व्यवहाराचा केंद्रबिंदू - आर्थिक अरिष्टाच्या काळतही महत्वाचा व उपयोगी ठरणारा असेल.

Scanned by CamScanner



MR. ALHAD Y. CHIMOTE
Faculty of Commerce
Hislop College, Nagpur

# Environment & Sustainable Development

## *Sustainable Development Concept:*

Sustainable development is defined as a pattern of social and structured economic transformations (i.e. development) which optimizes the economic and societal benefits available in the present, without jeopardizing the likely potential for similar benefits in the future. A primary goal of sustainable development is to achieve a reasonable and equitably distributed level of economic well-being that can be perpetuated continually for many human generations.

Sustainable development implies using renewable natural resources in a manner which does not eliminate or degrade them, or otherwise diminish their usefulness for future generations. It further implies using non-renewable (exhaustible) mineral resources in a manner which does not unnecessarily preclude easy access to them by future generations.

Sustainable development also requires depleting non-renewable energy resources at a slow enough rate so as to ensure the high probability of an orderly society transition to renewable energy sources.

## *Highlights of Sustainable Development in india:*

According to Union Minister of New and Renewable Energy Dr Farooq Abdullah, the government targets to set up 1,100 MW grid-connected solar plants, including 100 MW capacity plants as rooftop and smaller solar power plants for the first phase of the National Solar Mission till March 2013.

In addition, the government plans to generate 20,000 MW solar power by 2022 under the three-phase National Solar Mission, with 2000 MW capacity equivalent off-grid solar applications, including 20 million solar lights, also planned to be installed during this period.

The new and renewable energy ministry has signed power purchase agreements for solar capacity of as much as 100 MW to speed up solar power capacity addition in the country.

Seven projects from Tamil Nadu have been selected under the Jawaharlal Nehru National Solar Mission programme. Each of these seven companies is to set up a 1 MW solar photovoltaic power generation facility connected to the state grid.

Sustainable development in India now encompasses a variety of development schemes in social, cleantech (clean energy, clean water and sustainable agriculture) and human resources segments, having caught the attention of both the Central and State governments and also public and private sectors.

As per a report by UN Environment Program (UNEP), 'Global Trends in Sustainable Energy Investment 2010', released on July 2010, India was ranked eighth in the world in terms of investment in sustainable energy. The report further stated that India invested around US$ 2.7 billion in sustainable energy in 2009.

Wind energy attracted 59 per cent of financial investment in clean energy in India. India was placed fifth in the world for installed wind power during the year.

Scanned by CamScanner

trees, which was launched by the United Nations Environment Programme (UNEP) in November 2006.

The contribution of renewable energy to the power business in India has now reached 70 per cent, compared to 10 per cent in 2000, in terms of project numbers and dollar value, according to Anita George, Director, Infrastructure, International Finance Corporation (IFC).

India's first-ever 3 MW solar photovoltaic power plant, developed by the Karnataka Power Corporation Limited (KPCL), the state-owned power generating company, was dedicated to the nation at Yalesandra village in Kolar district on June 17, 2010. India is the fifth largest wind energy producer in the world, with installed capacity of nearly 10,500 MW and a target to scale up capacity to 14,000 MW by the end of 2011.

**ENVIRONMENTAL ISSUES:**

- Sustainable Development is a threat to the environment as a whole.
- Environment, which is natural is being disturbed by the man made environment.
- Pollution by the industries is hampering the environment on the name of development.
- Atomic energy plants may affect the regional agricultural productivity and overall environment of the region, for example Jaitpur's Atomic Energy plant in Konkan has invited opposition by the locals.
- Under the name of Special Economic Zones (SEZ) the poor agriculturists are exploited and forced to change their professions.
- Development in reducing the green belt and increasing the "Cement Forest".
- The overall impact in the climatic conditions has invited health problems for the human beings and there has been a drastic increase in the volume of patients for several life threatening diseases.

**SUSTAINABLE DEVELOPMENT ENVIRONMENT BALANCING (SUGGESTIONS):**

- The views of localalites should be considered before planning or sanctioning any projects in the name of development.
- Strict long term measures should be introduced and implemented for the disposal of wastes from the industries.
- The Government should be vigilant on the activities of the industries especially related to harmful items.
- The SEZs should be introduced only on the basis of genuinety.
- The Infrastructure projects should be sanctioned with special consideration to green space within.
- The Government should regulate intense safety rules before the sanctioning the industries.
- The Government should follow up the commitments by the industries in future so that long term social loyalty should be achieved.

CONCLUSION: Sustainable Development should be well balanced with the Environment to really call it as "Development"

Mill : (07135) 235054
Res : 235084
MAHAVIR
RICE MILL
CHAMROSHI, DIST. GADCHIROLI
WHOLE SALE
GRAIN
MERCHANTS
Mfg. Special Rice
CHANDANI
DAMINI
ALL DELUX
DIPAK
BRANDS
Prop. C.G.Doshi

Scanned by CamScanner



प्रा.किशोरकुमार वि.येळणे
शासकीय माध्यमिक आश्रम शाळा
तथा कनिष्ठ महाविद्यालय,
कसनसुर, एटापल्ली.

# पर्यावरण व शाश्वत विकास

निसर्गातील सर्व जैविक आणि अजैविक घटकांच्या क्रिया - प्रतिक्रिया तसेच प्रत्येक घटक एकमेकावर अवलंबून असतात. एखाद्या साखळीप्रमाणे ते ऐकमेकात गुंतलेले असतात त्यामुळे प्रत्येकाला परस्परांचे स्मरण ठेऊन निसर्ग नियमाचे पालन करणे आवश्यक असते. आर्थिक विकास करताना मानवाने निसर्गातील इतर घटकांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले त्यामुळे निसर्गाची अपरिमित हानी झाली. संशोधन आणि निसर्गातील नकारात्मक परिवर्तन ह्यामुळे भविष्यात आर्थिक आणि मानसिक अधोगती होईल हे आता सर्वांच्या लक्षात आले आहे. निसर्गात कायम स्वरुपी संतुलन साधण्याच्या दृष्टीने शाश्वत विकास ही संकल्पना आज संपूर्ण जगाने स्विकारली आहे

आपल्या सभोवताल असलेल्या सर्व जैविक आणि अजैविक घटकांचा संग्रह पर्यावरण समजला जातो यात प्रत्येक सजीव निर्माण होतो वाढतो आणि नाश पावतो. या तिन्ही नैसर्गिक प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी विशिष्ट समतोलाची गरज असते. त्यालाच पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरण हे भौतिक आणि जैविक तत्वाद्वारे निर्माण होत असते. हंया तत्वांचा परस्पर संबंध येत असतो. या अंतर्गत होणाऱ्या क्रियाप्रतिक्रियावर येथील जीवन अवलंबून असते यात अडथळा निर्माण झाल्यास जीवनावर विपरीत ऋणात्मक स्वरुपाचा परिणाम होत असतो.

**२१ व्या शतकातील पर्यावरणाची गरज :-**

एकविसाव्या शतकात पर्यावरणाचा प्रश्न हा प्रामुख्याने मानव सापेक्ष आहे. मानवाने तो आपल्या भौतिक स्वार्थाकरिता निर्माण केलेला असून आज तो सर्वव्यापी झाला आहे.

जगातील जो आर्थिक विकास होत आहे. त्यामुळे भविष्यात उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती संपुष्ठात येईल. त्यामुळे आपल्या गरजाची पूर्तता होणार नाही म्हणूनच आज पर्यावरण संतुलनाची गरज भासत आहे.

पर्यावरणात असंतुलन निर्माण होणाऱ्या बाबींचा विचार करुनच उद्योग व्यवसायाची उभारणी होण्याची गरज आहे. पर्यावरण प्रदूषण हा २१ व्या शतकातीलसर्वात महत्वाचा आणि ज्वलंत असा प्रश्न आहे. यासाठी प्रदुषण कमी करणे किंवा थांबविणे यामुळे हा प्रश्न सुटणार नाही तर तो निर्माणाच होणार नाही याची दक्षता बाळगणे अतिशय आवश्यक आहे.

आर्थिक विकास ही सातत्याने चालणारी आणि शाश्वत अशी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया पूर्णतः निसर्ग आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून आहे. त्यामुळे हया प्रक्रियेत खंड न पडू देण्यासाठी आणि निश्चितपणे पूर्ण होण्यासाठी पर्यावरणाचा ऱ्हास न होऊ देणे आवश्यक आहे. या शतकांत सामाजिक. आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकास प्रक्रीया जलद गतीने घडून येत आहे हया प्रक्रिया वेगामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. हयाचा जो विकास होत आहे तो अशाश्वत विकास आहे. अशा विकासामुळे भविष्य पूर्णतः अंधकारमय आहे. हा अंधारमय अशाश्वत विकास थांबविणे आवश्यक आहे

जैवविविधतेचे संतुलन हिमयुगाची सुरवात, इंधन आणि उर्जेचा प्रश्न. उत्पादकता आणि उत्पादन क्षमता यात वाढकरण्यासाठी (शाश्वत वाढ) पर्यावरणाची काळजी घेणे आवश्यक आहे.

**पर्यावरण समस्या**

पर्यावरणाचा ऱ्हास नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांनी होत असतो. नैसर्गिक कारणांनी झालेला पर्यावरणीय ऱ्हास कालांतराने नैसर्गिकरित्या भरुन निघतो मात्र मानवनिर्मित कारणांनी झालेला ऱ्हास मानवी उपायांनीच दूर होऊ शकतो.

पर्यावरण समस्यांचा अभ्यास करतांना पर्यावरण असंतुलन, उर्जेची मागणी आणि पुरवठा हया मधील असंतुलन, अन्नसाखळी असंतुलन, हवामानातील प्रतिकूल परिवर्तन, असंतुलित लोकसंख्या वाढ नैसर्गिक आपत्तीत सातत्याने होणारी वाढ या सर्व बाबींचा विचार करण्याची

Scanned by CamScanner

गरज आहे. पर्यावरणाच्या उपरोक्त समस्या लक्षात घेता आज मानवाला आपले रक्षण करण्यासाठी इतर प्रजातीचे रक्षण करावे लागेल. केवळ अंधाधूद अशाश्वत विकासाच्या मागे न लागता शाश्वत विकास करावे लागेल नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करावे लागेल. पर्यावरणीय समतोल राखावा लागेल सातत्याने होणारे प्रदुषण थांबवावे लागेल. आर्थिक विकास हा पर्यावरण मध्ये संतुलन साधूनच करावा लागेल. सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण करुन पर्यावरण रक्षण करावे लागेल. जैवविविधता संतुलन निर्माण करावे लागेल.

अणूऊर्जा किरणोत्सर्ग आणि कार्बनडाय आक्साईडचे वाढते प्रमाण याला आळा घालावा लागेल. इंधन आणि ऊर्जेचा वाढता प्रश्नाची सोडवणूक करावीच लागेल. उत्पादन साधनांची उत्पादकता आणि उत्पादन क्षमतेत शाश्वत वाढकरावी लागेल आंतरराष्ट्रीय स्तरावर हयादृष्टीने प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करीत आहे. पण आवश्यक त्या प्रमाणात प्रत्यत्नांना वेग प्राप्त झालेला नाही. मात्र भविष्यात निश्चित हयाला वेग येईल असे अभ्यासांती लक्षात येते.

सध्या होत असलेल्या विकास हा अल्पकालीन अशाश्वत विकास आहे. याचा वेग अति जास्त असला तरी सदां सर्वकाळ तो कायम किंवा वाढणारा राहणार नाही. भावी पिढीकरिता दिर्घकालीन शाश्वत आर्थिक विकासाच्या योजना आखून त्या कार्यान्वित करुन त्याची अंमलबजावणी करुन पर्यावरण संतुलन निर्माण करणे आवश्कय आहे.

औद्योगिक क्रांती, उपभोक्तावाद चंगळवाद आणि अति लोकसंख्या करीता यामुळे पर्यावरणामध्ये दोष निर्माण होऊन असंतुलन निर्माण झाले. याकरीता पश्यिमात्य आणि विकसित राष्ट्रांना जबाबदार धरले जाते. पण अल्पविकसीत आणि भारतानेही त्याच मार्गावर चालण्यास सुरुवात केली आहे. सुरुवातीच्या काळात शाश्वत विकासाचा मार्ग स्विकारुन देशातील (विश्वातील) पर्यावरण प्रदुषित होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे

पर्यावरण प्रदुषणात आण्विक ऊर्जा निर्मितीचा प्रमुख वाटा आहे. १९५२ मध्ये कॅनडात झालेल्या पहिल्या आण्विक अपघातातून या प्रदुषणाला सुरुवात झाली दुसरा अपघात अमेरिकेतील हरीसबग्र येथे १९७९ साली घडला. १९८६ साली रशियात चेर्नोबिल येथे सर्वात मोठा आण्विक अपघांत झाला. हया अपघांतामुळे युरोपच नव्हे तर सर्व विश्व हादरले. किरणोत्सराच्या उपद्रवामुळे तेथील खाद्यान्नांची निर्यात बंद झाली. अशाप्रकारे विश्वात आजपर्यंत ११०० आण्विक अपघात झाले.

आज अमेरिकेत १०१ चालू अणू ऊर्जा केंद्र तर जगात ३६५ अणू उर्जा केंद्र असून त्यांच्याकडे विनाशाची केंद्र म्हणून पाहिली जातात. शिवाय पाश्चिमात्य संस्कृतितील चंगळवादाच्या परिणाम स्वरुप इलेक्ट्रानिक कचऱ्याची निर्मिती मोठया प्रमाणावर होत आहे. याचा परिणाम पर्यावरणावर होऊन पूर्ण विश्वावर याचा प्रतिकूल परिणाम झालेला आहे.

**१९९१ ते २००० मध्ये जमा झालेला काम्प्युटर कचरा**

| **देश** | **कचरा प्रति टन** |
|---|---|
| इंग्लंड | २,२०,००० |
| अमेरिका | ९,००,००० |
| स्विझरलॅण्ड | ७७,००० |

पर्यावरणामध्ये हरितगृह वायुचा प्रभाव वाढत आहे. यामध्ये सी.काफ.सी. आणि हॅलेजन गॅस ९० टक्के असतो. या वायुंचे सर्वाधिक उत्सर्जन अमेरिका, रशिया, इंग्लंड इ. पाश्चिमात्य आणि विकसित राष्ट्रे करीत आहे.

पाश्चिमात्य देशामध्ये औद्योगिकरण मोठया प्रमाणात होत आहे. तेथे आम्लाचा पाऊस पडत आहे. अमेरिका, जर्मनी, कॅनडा. नार्वे हया देशात आम्लवर्षा होत आहे. भारतात २०२५ नंतर आम्लवर्षा होईल असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

आम्लवर्षा मुळे कॅनडातील ४८,००० जलाशय निर्जीव झालीत तर १९८२ मध्ये स्विडन मधील २० हजार जलाशय निर्जीव झाली. पर्यावरणातील असंतुलनाचे दुष्परिणाम किती भयानक आणि व्यापक आहे लक्षात येते. याचे दुष्परिणाम भावी पिढीला भोगावे लागतील. युरोपमध्ये १९४९ ते १९५७ हया काळात डॉअव्हिअन अपघात झाले हया अपघातामध्ये हजारो कामगार मृत्युमुखी पडले याचे कारण १९५७ मध्ये समजले.

पाश्चिमात्य आणि विकसित राष्ट्रातील औद्योगिक आणि प्रदुषणामुळे पर्यावरणातील ओझोन वायुची कमतरता निर्माण झाली. १९५७ मध्ये ओझोनचे क्षरण होत आहे असे अमेरिकन वैज्ञानिकानी सर्वप्रथम जाहिर केले. अंटार्टिक

Scanned by CamScanner

महासागरवर ओझोनचे भगदाड दिसले हे भगदाड पर्यावरणातील प्रदुषणामुळे व हरितगृह वायुच्या प्रभावामुळे झाल्याचे सिध्द झाले.

औद्योगिकरण आणि खाणकाम यामुळे पश्चिमात्य देशाने जंगलाचा ऱ्हास केला आहे. जंगलाच्या व्याप्तीमध्ये असंतुलन निर्माण झाले. मलेशियामध्ये १९९० साली इमारती लाकडाचे जगाच्या तुलनेत ११ टक्के उत्पादन करित होता तसेच थायलंड, इंन्डोनेशिया, कांगो, ब्राझील हे इमारती लाकडाचे प्रमुख उत्पादक आणि निर्यातक राष्ट्रे होती. पण सध्याच्या काळात या राष्ट्रांना इतर देशातुन (ब्रम्हदेशातुन) इमारती लाकडाची आयात करावी लागते.

प्रदुषणामुळे पर्यावरणीय असंतूलन निर्माण झाले त्यामुळे विश्वातील आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावर विपरीत परिणाम होऊन मानवी जीवनमान नष्ट होईल अशी भिती विश्वातील विकसीत आणि अविकसीत देशांना वाटत आहे. त्यामुळे सर्व राष्ट्रांनी पर्यावरण जाणीव जागृती करण्यास सुरुवात केली.

जर्मनी, कॅनडा, स्विडन या देशामध्ये पर्यावरण रक्षण हीच खरी राष्ट्रभक्ती मानली जाते. ब्राझीलमध्ये इंधनाचा पर्याय म्हणून इथेनॉल वापरला जातो. इथेनॉल उत्पादनासाठी ०.३ टक्के शेतजमीन ऊस आणि बिट उत्पादनासाठी राखील ठेवण्यात येते. ५ जुन १९७२ रोजी स्विडन येथील स्टॉकहोम येथे अंतरराष्ट्रीय स्तरावरील पहिल्या जागतीक पर्यावरण विषयक चळवळीस प्रारंभ झाला.

युनेस्कोनी १९७० साली मानव व जिवारण कार्यक्रम आखला यात पर्यावरण व मानव यांच्या आंतरक्रियामुळे होणाऱ्या समस्येचा अभ्यास व त्यावर उपाय यासाठी कार्यक्रम आखण्यात आला होता. १९७९ मध्ये पाश्चिमात्य ३३ लागरेंज ड्रांन्स बाऊंड्री एअर पोल्युशन या सारखे करार केले.

ओझोनक्षयासंबंधी १९८५ मध्ये ओझोन स्तरासंबंधी सुसूत्रीकरण समिती स्थापन करण्यात आली यात अमेरिका, रशिया यासह भारत, जपान या देशाचा समावेश आहे.

अमेरिका दरवर्षी २.५ कोटी टन सल्फरडॉय ऑक्साईड सोडतो. अमेरिका जगाच्या तुलनेत २५ टक्के कचरा निर्मिती करतो. यावरुन विकसित राष्ट्राच्या पर्यावरण विरोधी भयानक स्थितीची कल्पना लक्षात येते.

पर्यावरण असंतुलन निर्माण करण्यात विकसित राष्ट्रे आघाडीवर आहे. पण हया पर्यावरणीय असंतुलनाचे दुष्परिणाम सर्व जगाला भोगावे लागत आहे. विकसित राष्ट्रे एकीकडे पर्यावरण प्रदुषण करतात आणि दुसरीकडे पर्यावरण संतुलन निर्माण करण्याचा आव आणतात. काही विकसित राष्ट्रे तर इतर देशावर पर्यावरण रक्षणाकरिता दबाव आणतात. एकंदरीत पर्यावरण संतुलना निर्माण करण्यासाठी सर्व जगाला एकत्रीत येणे आवश्यक आहे म्हणजे शाश्वत विकास करणे आवश्यक आहे.

आर्थिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक विकासासोबतच विकसीत होणारी उपभोक्तावादी संस्कृती अत्याधिक चंगळवाद आणि दरडोई उपभोगात मोठया प्रमाणात वाढ, जीवनाच्या न्युनतम आवश्यक गरजांच्या मापदंडातील बदल, बाजारवाद आणि उपभोक्तावाद यामुळे मानव हा पर्यावरणाचा शत्रु होऊन त्याने स्वतःच्या पायावर स्वतः हाताने धोंडा पाडून घेतला आहे. एक दिवस पर्यावरणीय प्रदुषण मानवाला पराजीत करुन मानवासोबत भुतलावरील इतर जैवविविधतेचा नाश होईल. याची जाणी विश्वातील सर्व राष्ट्रांनी ठेवावी आणि शाश्वत विकास करण्याचा प्रयत्न करावा.

शाश्वत म्हणजे दिर्घकालीन निरंतर होणारा विकास होय. शाश्वत विकासाची संकल्पना सर्वप्रथम **IUCN** हया संघटनेने मांडली शाश्वत विकासाचे प्रतिमान मांडतांना त्यांनी अंडयाचे उदाहरण दिले यात. अंडयाचे दोन भाग असतात. पिवळा भाग आणि पांढरा पिवळा भाग म्हणजे गर्भ (जिव) आणि पांढरा भागातून हया गर्भास अन्न मिळते. त्यामुळे गर्भ चांगला राहतो. म्हणजे ते ऐकमेकावर पूर्णतः अवलंबून आहे हे उदाहरण आहे. मानव म्हणजे जीव आणि पर्यावरण म्हणजे मानवाच्या गरजा पूर्ण करणारे वेष्टण होय हे वेष्टण आहे म्हणून मानव आहे. हे वेष्टण संपले तर मानव संपलाच समजा.

जगामध्ये आज अशाश्वंत आर्थिक विकासामुळे पर्यावरणाचा ऱ्हास केला जात आहे. त्यामुळे मानवाने आपले जीवन आणि भविष्यकालीन जीवन अंधकारमय केले आहे याची प्रचिती येते. मानवी जीवन उजळून निघण्यासाठी आज शाश्वत विकासाची गरज आहे.

"भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याची पर्यावरणाची क्षमता कायम ठेवून पर्यावरणाचा ऱ्हास न करता वर्तमान पिढीच्या सर्व गरजा पूर्ण करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय" अशी व्याख्या जागतीक पर्यावरण व विकास आयोगानी केली आहे.

Scanned by CamScanner

पर्यावरणीय पद्‌धती सक्षम असा आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक असा सकारात्मक, पर्यावरणाचा वापर करून आपल्या गरजा पूर्ण कराव्यात. संतुलित पर्यावरण आणि आर्थिक विकास यांचा एकत्रितपणे विचार करून मानवाने प्रगती आणि विकास करावा.

पर्यावरणाचा समतोलराखून अनंत काळापर्यंत शेती आणि औद्योगिक उत्पादनात वाढकरुन नैसर्गिक साधनसंपत्तीचे आणि परिसंस्थेचे जतन करुन शाश्वत विकास करता येतो.

मानवाचा उदय आणि विकास झाल्यापासून माणसाने नैसर्गिक साधनाचा वापर करुन स्वतः च्या आर्थिक विकास केला. कालांतराने लोकसंख्या वाढ, अतिउपभोग, चंगळवाद संस्कृती वाढ, यामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि पर्यावरण विषयक समस्येचा उदय झाला. या समस्यांचा निपटारा करण्यासाठी शाश्वत विकास ही संकल्पना विकसित करण्यात आली.

शाश्वत विकासासाठी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटनानी भुमिका वठविली आहे. यात भारतामध्ये चिपको आंदोलन आंतरराष्ट्रीय जीवावरण कार्यक्रम, जागतीक पर्यावरण जनजागृती परिषद, वसुंधरा शिखर परिषद, जी-८ परिषद सामाजिक विकास परिषद यानी योग्य भुमिका वठवून शाश्वत विकासाची गरज लोकांना पटवुन देऊन त्यांची अंमजवाजावणी केली आहे. मानवाचा आर्थिक सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक विकास आणि पर्यावरण यांचा अगदी जवळचा संबंध आहे. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यास मानवाचा विकास संपूष्टात येऊन मानवजात व संपूर्ण सृष्टी संपुष्टात येईल. मानवी जीवन कायम ठेवण्यासाठी मानवाने शाश्वत विकास करावा या विकासासाठी खालील मापदंडाचा वापर करून विकास आणि पर्यावरण संतुलन निर्माण करुन मानवी जीवन सुखकर करावे.

**१. निसर्ग निगडीत विकास :-**

मानवाने विकास करतांना पर्यावरणाचा विचार करावा त्याचा वापर योग्य पध्दतीने करावा. साधन संपत्तीचा वापर हा विवेक पूर्ण पध्दतीने करावा. निसर्गात कोणताही बदलहोणार नाही असा विकास करावा व निसर्गात असंतुलन निर्माण होणार नाही. याची काळजी घ्यावी.

उदा. **Use and Thro** वापरा आणि फेका ह्यावंद संस्कृती यामुळे निसर्गात असंतुलन निर्माण होत आहे. यासाठी अशा संस्कृतीच्या नावात न पडता नैसर्गिक पध्दतीचा वापर करावा.

**२. पर्यावरण संवर्धन :-**

पर्यावरण रक्षण व संवर्धन आपली सामाजिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचे संवर्धन हे महत्वाचे मुल्य आहे. पर्यावरणाबद्दल आपला सकारात्मक दृष्टीकोन असावा तसेच अपेक्षित मुल्य ही आपल्या अंगी आणावी. उदा. वनमहोत्सव साजरा करून पूजन करावे.

**३. नैसर्गिक संतुलन**

अनेक जीवनावश्यक वस्तुची निर्मिती जलवायू चक्राची निश्चित गती प्रस्तापित करणे, जमीनीची धूप थांबविणे, हरितगृह वायुचे प्रमाण कमी करणे, तापमानात घट करणे.उदा. प्रदुषण कमी झाल्यामुळे ओझोनचे क्षरण कमी होत आहे.

**४. नैसर्गिक समृध्दी स्थिर ठेवणे**

जंगल, पर्वत, नद्या, हिमशिखर, वाळवंट, जैवविविधता ह्या नैसर्गिक समृध्दी कायम ठेवण्यास मदत करावी म्हणजे प्रदुषण झाले तरी त्याची व्यापकता कमी होईल व त्यामुळे जगाचा शाश्वत विकास होईल.

**५. जैवविविधतेचे संवर्धन**

निसर्गात असणाऱ्या वनस्पती, प्राणी, जीवजंतू व मानवात अनेक प्रकारची विविधता असते. ही निसर्गातील जैवविविधता मानवाला शाश्वत विकास करण्यासाठी टिकवून ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याचा उपयोग मानवाला जपून करावा. जैवविविधता दिवसेंदिवस नष्ट होत आहे. ही जैवविविधता अशीच नष्ट झाल्यास शाश्वत विकास होणार नाही.

**६. शाश्वत शेती किंवा जैविक शेती**

शाश्वत शेती म्हणजे पर्यावरणीय पध्दतीची शेती होय. शाश्वत शेतीमुळे जमीनीचा कस कमी होत नाही. कमी पाण्यात जास्त ओलित करणे, माती प्रदुषीत होत नाही. पिकाच्या प्रजाती नष्ट होत नाही. म्हणजे शेतीचा शाश्वत विकास होत असतो. पर्यावरण रक्षणासाठी अशा शेतीची गरज आहे.

उदा. जैविक किंवा नैसर्गिक खताचा वापर

Scanned by CamScanner

### ७. अक्षय उर्जा साधनाचा वापर :-

सौर उर्जेचा वापर करणे सूर्यप्रकाशापासून औष्णिक किंवा विद्युत उर्जा निर्माण करणे. जैविक वस्तु पासून उर्जा मिळवावी. वाहत्या पाण्यापासून विद्युत उर्जा निर्माण करावी. सागराच्या लाटामध्ये प्रचंड उर्जा असते. यापासून विजनिर्मिती करावी. उत्पादन करतांना ज्या उर्जेचा क्षय होत नाही आणि प्रदुषण होत नाही अशा उर्जेचा वापर करुन शाश्वत विकास करावा.

### ८. स्थिर तंत्रज्ञान

शाश्वत आर्थिक विकासासाठी स्थिर तंत्रज्ञानाची गरज आहे. वारंवार तंत्रज्ञानात बदल केल्यास अजुन जास्त प्रदुषण होईल स्थिर तंत्रज्ञानामुळे शाश्वत विकास होईल.

### ९. उर्जा साधनाचे संवर्धन

क्षय होणाऱ्या उर्जा साधनाचा उत्पादनासाठी व उपयोगासाठी मोठया प्रमाणात होतो. हया उर्जा साधनाचा वापर कमी करावा म्हणजे प्रदुषण कमी होऊन पृथ्वीच्या पोटातील संसाधने जशीच्या तशी राहतील आणि पर्यावरणात बदलहोणार नाही. त्यामुळे शाश्वत विकास करता येईल.

### १०. पर्यावरण व्यवस्थापन

पर्यावरण घटकाची चिकत्सात्मक रचना नैसर्गिक साधनसंपत्ती उपयुक्तता व पूर्ण दिर्घकाळ टिकणारी यंत्रणा निर्माण करुन पर्यावरणात संतुलन साधुन मानवी क्रिया - प्रतिक्रियावर नियंत्रण करणे म्हणजे पर्यावरण व्यवस्थापन होय. पर्यावरणाचे योग्य व्यवस्थापन केल्यास शाश्वत विकास होतो.

उदा. उर्जेचे योग्य व्यवस्थापन करणे.

### ११. तंत्रज्ञान व पर्यावरण योग्य समन्वय

वस्तूचे उत्पादन आणि उपभोग हे पर्यावरणीय दृष्टीने सकारात्मक असावे. तंत्रज्ञान विकसीत करतांना पर्यावरणाचा विचार करुन विकसीत करावे म्हणजे पर्यावरणात असंतुलन निर्माण होणार नाही व शाश्वत विकास होईल.

### १२. नैतिक दृष्टीकोन

पृथ्वीवर राहण्याचा हक्क हा प्रत्येक सजीवाला आहे. मात्र स्त्रोताचा अतिवापर केल्यामुळे प्राणी व वनस्पतीच्या अस्तीत्वाला धोका निर्माण झाला आहे. या अतिवापराच्या हव्यासापोटी कित्येक सजीव नष्ट झाले. त्यामुळे शाश्वत विकासाकरिता नैतिक दृष्टीकोण ठेऊन नैसर्गिक साधनाचा वापर करावा.

### १३. लोकसंख्या नियंत्रण

लोकसंख्या वाढल्यामुळे वस्तुच्या मागणीत आणि भुमीच्या मागणीत मोठया प्रमाणात वाढ झाली यामुळे जंगलाचे प्रमाण कमी होऊन शेती आणि नगराच्या संख्येत वाढ झाली. तसेच उत्पादनात वाढ केल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झाला लोकसंख्या नियंत्रणात आल्यास पर्यावरणाचे रक्षण होऊन शाश्वत विकास होऊ शकतो.

### १४. सकारात्मक आर्थि परिवर्तन

कोणतेही आर्थिक बदलकरतांना तो पर्यावरणांस अनुकूल असावा. आर्थिक बदलहोतांना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. याची काळजी घ्यावी तेव्हाच शाश्वत विकास होईल.

### १५.राजकीय विचार प्रणाली शाश्वत विकासासाठी अनुकूल असावी

प्रत्येक राजकीय प्रणालीचे तत्वे ही समाजविकास व निसर्ग कल्याणाशी निगडीत असावी. प्रत्येक राजकीय पक्षातील कार्यकर्ते सुसंस्कारात्मक मानवतावादी, निस्वार्थ पर्यावरण प्रेमी असावेत. प्रत्येक राजकीय पक्षाने आपले अस्तीत्व टिकविण्यासाठी जनतेकरीता शाश्वत विकास करावा.

### १६. सामाजिक बांधिलकी

पर्यावरणाचे रक्षण हे प्रत्येक प्राण्याचे आणि वृक्षाचे संरक्षण करुन त्याचे संवर्धन केल्याने शक्य होते.

उदा. नागपंचमी, वटपौर्णिमा यादिवशी विशेष कार्यक्रम घ्यावेत.

शाश्वत विकास करण्याची आवश्यकता सध्या जगाला भेडसावत आहे. शाश्वत विकसाची कास धरली नाही. तर मानव व त्यासोबत इतर जीवनसृष्टीचे असतीत्व नष्ट होईल.

मानवाचा आर्थिक विकास हा उत्पादनाच्या घटकांवर अवलंबून आहे. उत्पादन घटकाच्या शाश्वत विकास केल्यास मानवाचा सर्वागिण विकास होईल. आर्थिक विकास हा आजच्या काळातील सर्व विकासाचा पाया आहे. आर्थिक विकासावरच मानवी जीवन अवलंबून आहे. ज्याप्रमाणे आकाश गंगेमध्ये सर्व ग्रहाचे अस्तित्व सुर्यावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे आर्थिक विकासावर सर्व विकासाचे अस्तित्व अवलंबून आहे. आर्थिक विकास हा उत्पादन घटकावर अवलंबून आहे आणि उत्पादन घटकांची उत्पादकता पर्यावरणावर अवलंबून आहे.

Scanned by CamScanner

**मानवी जीवन आर्थिक विकास चक्र**

मानवी जीवन, आर्थिक विकास, उत्पादन घटक, उत्पादन घटकांची उत्पादकता, पर्यावरण, मानवी जीवन.

औद्योगिकरण उपभोक्तावादी प्रवृत्ती, चंगळवाद. यामुळे भुमी हया साधनाचा ऱ्हास होत आहे. इंधन संपत आहे नद्यांचे पाणी प्रदुषीत होत आहे. हवा, प्रदुषण यामुळे संपतीचे साठे कालांतराने संपुष्टात येतील केवळ श्रम, भांडवल आणि संयोजक हया तीन घटकामुळे उत्पादन प्रक्रिया पूर्ण होणार नाही. नैसर्गिक संपत्तीची तेवढीच गरज असते.

नैसर्गिक साधनांवर विपरीत परिणाम झाल्यामुळे श्रम. भांडवल आणि संयोजक हया घटकांचा प्रभाव कमी होऊन त्यांची कार्यक्षमता आणि उत्पादकता कायम ठेवण्यासाठी यांचे संतुलन आवश्यक आहे. यासाठी यांचा शाश्वत विकास करावा.

नैसर्गिक आणि मानवनिर्मित उत्पादन साधनांमध्ये संतुलन प्रस्थापित करण्यासाठी शाश्वत आर्थिक विकासाची गरज आहे. अशाश्वत आर्थिक विकासाच्या मागे लागून उत्पादनाच्या साधना मध्ये असंतुलन निर्माण होऊन उत्पादन, उत्पादकता, उपभोग इत्यादी मध्ये घट होऊन आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो.

"आर्थिक विकास मानवासाठी असून मानव हा आर्थिक विकासासाठी नाही" हे मानवाच्या लक्षात आले नाही त्यामूळे त्यांनी उपभोक्तावादी प्रवृत्ती, अत्याधिक चंगळवाद पूर्ण करण्यासाठी मोठया प्रमाणात उत्पादन आणि उत्पादकतेत वाढकरुन निसर्गाचा अविवेकीपूर्ण वापर केला. औद्योगिकरण आणि रासायनिक शेतीचा उपयोग करुन पर्यावरणात मोठया प्रमाणात, प्रदुषण घडवून पर्यावरणात असंतुलन निर्माण करुन अशाश्वत आर्थिक विकास केला. .

पर्यावरणीय असंतुलनामुळे मानवी जीवनावर आणि आर्थिक विकासावर विपरीत, नकारात्मक आणि प्रतिकुल असा ऋणात्मक स्वरुपाचा परिणाम झाला. म्हणुन मानवाने निसर्गातील प्रदुषण कमी करणे, जैवविविधतेचे रक्षण करणे, तापमान कमी करणे, इत्यादीमुळे पर्यावरणामध्ये संतुलन निर्माण करुन शाश्वत विकास करण्याचा प्रयत्न करीत आहे.

पर्यावरणीय संतुलन स्थिर ठेवून मानव स्वतः सोबतच निसर्गातील इतर घटकांचा वर्तमान आणि भविष्यात कायम विकास करण्यासाठी शाश्वत आर्थिक विकासाची आवश्यकता लक्षात घेत आहे.

शाश्वत विकासासाठी सर्व विश्वातील देश एकत्र येऊन त्यांनी निरनिराळया परिषदा, संमेलन या द्वारे पर्यावरणीय संतुलनातून आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकास करणे आवश्यक वाटत आहे. यासाठी त्यांनी विविध प्रयत्न, संकल्पना मांडून त्यांची अंमलबजावणी करुन आर्थिक विकासासोबत पर्यावरण संतुलन निर्माण होईल. विश्वात भविष्यात (अध्यापासून) शाश्वत विकास केल्या जाईल. पर्यावरणीय असंतूलन नष्ट होऊन मानव दिर्घकालीन शाश्वत आर्थिक विकास करेल असा माझा आशावाद नसून यावर माझा पूर्ण विश्वास आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) संतुलन का अर्थशास्त्र एवं आयोजन डॉ. एम. एल. झिंगन. वृंदा प्रकाशन दिल्ली

२) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र -.

३) पर्यावरण अध्ययन डॉ.रतन जोशी साहित्य भवन प्रकाशन आग्रा

४) संयुक्त राष्ट्र संघ एवं प्रमुख आंतरराष्ट्रीय संघ डॉ. कुलदिप फडिया प्रतियोगिता साहित्य आग्रा

५) पर्यावरण प्रदूषण निरंजन घाटे, मेहता प्रकाशन पुणे

६) पर्यावरण शिक्षण डॉ.के.म. भांडारकर. नित्यनुतन प्रकाशन पूणे

७) पर्यावरण शास्त्र डॉ. प्रभाकर कटमकर कॉन्टिनेन्टलप्रकाशन पुणे

८) पर्यावरण जाणीव विकास वसंतराव ठाकरे साकेत प्रकाशन औरंगाबाद

९) पर्यावरण प्रा.ए.पी. चौधरी. हिमालय प्रकाशन, मुंबई

१०) शाश्वत विकासाकडे म.हा.माध्य व उच्च माध्य शिक्षण मंडळ पुणे

११) शिक्षण संक्रमण


Scanned by CamScanner



प्रा.विजय मसराम
जनता महाविद्यालय, चंद्रपूर

# पर्यावरण व विकास

विकास या शब्दात अनेक घटकांचा अंर्तभाव होतो. सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शैक्षणिक, राजकीय या विविध क्षेत्रात सातत्याने विकास घडून येत असतो. अली कडील काळात प्रकल्पांच्या विकासाला अधिक महत्व दिल्या जात आहे. असे असले तरी सर्व क्षेत्रातील विकासाकरीता आर्थिक विकास घडून आणणे महत्वाचे ठरते. परंतू आर्थिक विकास साधत असतांना तो सर्वसामान्य जनतेच्या विकासाकरीता चिरतंन साहयातून ठरणारा असेल तर तो आर्थिक विकास अधिक सक्षम व मजबूत समजल्या जातो म्हणून टिकाऊ किंवा शाश्वत विकासाची संकल्पना अलीकडच्या काळात जास्त महत्वाची ठरत आहे. कारण जो विकास केवळ तात्पूरत्या स्वरूपात आकर्षित करणारा असेल तर त्याचा लाभही केवळ समाजातील विविध लोकांना प्राप्त होण्या ऐवजी समाजातील एका विशिष्ट गटालाच त्याचा लाभ होतो व त्यातूनच आर्थिक व सामाजिक व्यवस्थेतील दरी अधिक रूंदावत जाते. उदा.नैसर्गिक संसाधनाचा वापर करीत असताना भविष्यातील त्यांची गुंतवणूक कायम ठेवून वापर केल्यास त्याचे दूष्परिणाम जाणवणार नाही या परिभाषेने टिकाऊ विकासाची किंवा शाश्वत विकासाची संकल्पना महत्वाची ठरते.

अलीकडील विविध अनुभव जन्य अभ्यासातून पर्यावरण व विकास या दोन शब्द समूहाला जगात विशेष महत्व प्राप्त होत आहे. कारण विकास साधत असताना नैसर्गिक संसाधनाचा वापर अनिवार्य आहे. ही संसाधने वापरल्यावर त्यांची क्षतीपूर्वी होणार नसेल तर त्याच्या अभावामुळे नैसर्गिक सतूंलनाचा प्रश्न निर्माण होऊन त्याचा प्रभाव अन्य घटकावर होण्यास आरंभ होतो. विकासाच्या क्षमता प्राप्त करण्याकरीता सर्वच देशाद्वारे प्रयत्न केल्या जाते. यातूनच विकासाची गती प्राप्त होतानां अन्य उपघटकाच्या निर्मितीमुळे त्यातून धोके निर्माण होण्यास आरंभ होतो. असाच अनुभव अलिकडील काळात शास्त्रज्ञांना येत असल्यामुळे पर्यावरणाची व्यवस्था अबाधित राखण्याकरीता त्यांनी जगासमोर आव्हानच उभे केले आहे. पर्यावरण हे जगासमोर एक आव्हान आहे. याकरीता राष्ट्रीय पातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चासत्राच्या निमित्ताने एकत्रीत येऊन शाश्वत या आव्हानाला सामारे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. जगाच्या तापमानात १ सेल्सीयसनी वाढ झाली आहे. हिमालय वितळतो आहे, जगात कुठे अतिवर्षण तर कुठे अवर्षण अशी स्थिती निर्माण झाली आहे. मागील वर्षी सुदान मध्ये इतका महा प्रलय झाला त्याचा अनुभव सुदान नागरीकांनी अनुभवला मागील ४ वर्षात आस्ट्रेलियात पाऊस जेमतेम पडला यावर्षी आस्ट्रेलिया अतिवर्षणाने प्रभावीत आहे अमेरीकेत तर कॅट्रीना, रीटा यासारखी वादळे नेहमीच नागरीकांचे जीवनमान उध्वस्त करतात तर रशिया सारख्या देशात उणे २० डिग्री इतक्या तापमानात श्रमिक वर्ग कार्य करतो.

वरील सर्व स्थिती पडताळून पाहिल्यास सर्वच ठिकाणी पर्यावरणातील असंतूलन ही बाब आढळून येते. व विकासाकरीता चिंतेचा विषय ठरत आहे. युरोप मध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्यावर त्यातून भयानक तंत्रज्ञानाची निर्मिती झाली. तंत्रज्ञानाच्या वापराकरीता व ज्वलनाकरीता ज्वलनशील पदार्थाचा वापर होण्यास आरंभ झाला पूर्वी पाण्यावर चालणारे यंत्र अस्तित्वात आले नंतर कोळशावर चालणारे, नंतर पेट्रोल डिझेल, केरोसीन व आता अणूऊर्जा अशा प्रकारे यात संक्रमण होऊन या शक्तीचा वापर उत्पादने, कृषी उत्पादने, औद्योगीक उत्पादने, या सर्वच ठिकाणी होत आहे. वाहतूकीची साधने ही तर या शक्तीच्या अभावी विकसीत करणे देखील शक्य नाही. आज जगात सर्वात जास्त कार्बन बाहेर पडण्याचे प्रमाण अमेरीकेत आहे. एकटया मुंबईत रोज १०० टनापेक्षा जास्त कार्बन वातावरणात मिश्रीत होतो यातूनच ग्रीन हाऊस परिणाम तयार होतो व तो विकासात अडथळा निर्माण करतो. व यातूनच नैसर्गिक असंतूलन निर्माण होते.

देशातील नागरिकांचे राहणीमान रोज बदलत आहे. ग्रामीण आणि शहरी हा भेदभावही संपूष्टात आला आहे. राहणीमान आवश्यक असणाऱ्या ऊर्जा, इंधन आणी इतर साहित्याची मागणी सतत वाढत आहे. व याचा पूरवठा कायम

Scanned by CamScanner

स्वरूपात व्हावा या करीता जनतेची मागणी नेहमी असते. ती पूर्ण करण्याकरीता प्रयत्न केले जातात. १० व्या दशकापासून जगात जागतिकीरणाच्या प्रक्रियेतून जलद आर्थिक विकास घडून आणण्याकरीता सर्वच देश प्रयत्न करीत आहे. औद्यौगिकीकरणाने व तांत्रिक ज्ञानाने निसर्ग संसाधनाचा अधिका अधिक वापर करणे सुरू केले. व याचा प्रत्यक्ष परिणाम पर्यावरणावर होत आहे. १९९२ मध्ये रिओ दी जानरीओ ह्या ठिकाणी भरलेल्या पृथ्वी शिखर परिषदे नंतर आंतरराष्ट्रीय कार्यक्रम पत्रिकेवर पर्यावरण हा विषय सर्वप्रथम घेण्यात आला. पृथ्वीच्या तापमानात सातत्याने होणारी, वाढ आम्लयुक्त पर्जन्य, ओझोनथराला निर्माण झालेली भिती, $CO_2$ (कार्बनडॉय ऑक्साईड) चे वाढते प्रमाण, यामुळे वातावरणात बदल जाणवतो. डिसेंबर २००९ मध्ये कोपेनहेगन येथे जागतिक परिषद आयोजीत करण्यात आली होती. परतुं परिषदेत ज्या राष्ट्राचे कार्बन निर्मीतीचे प्रमाण अधिक आहे त्यानीच कोणत्याही निर्णयाला मान्यता दिली नाही.

हवामान बदलविषयची १० व्या दशकात विचार होतांना दिसत असला तरी ग्लोबल - वार्मिंग हा शब्द मात्र जूना आहे. नोबेल पुरस्कार प्राप्त स्विडन शास्त्रज्ञ यांनी १८९६ मध्ये, वातावरणातील कार्बनचे प्रमाण दुप्पट झाले आहे हे स्पष्ट केले होते. १९५० मध्येही काही शास्त्रज्ञांनी वातावरणातील कार्बनच्या थराचे व्यवस्थीत मोजपाम केले व वातावरणातील तापमान वाढीची शंका व्यक्त केली होती.

सूर्यप्रकाश व इतर अदृश्य सौर किरणे पृथ्वीच्या सभोवताली असलेल्या बातावरणातून पृथ्वीच्या उष्णभागा पर्यंत पोहचतात या सौर किरणापैकी काही मोठया प्रमाणात वातावरणात परावर्तीत होतात. व अन्य सौर किरणे पृथ्वीच्या पृष्ठभागाकडून वातावरणाच्या माध्यमातून अवकाशात प्रारणांचे स्वरूपात उष्पतेचे उत्सर्जन होते. पृथ्वीच्या पृष्ठभागावरून अवकाशात होण्यास प्रतिबंध होतो. या प्रक्रियेस हरीतगृह परिणाम (ग्रीन हाऊस) असे म्हटले जाते. परिणामतः पृथ्वीवरील असलेल्या वातावरणाच्या तापमानात वाढ घडून येते. जे वायू प्रारणे शोषून घेतात त्यांना हरीत वायू असे म्हणतात. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या सरासरी तापमानात हळूहळू पण सतत होणारी वाढ जी काही प्रमाणात वातावरणातील हरीतगृह वायूच्या एकूण प्रमाणात होणाऱ्या वाढीमुळे होते. यालाच वैश्वीक तापमानात वाढ असे म्हणतात. जागतिक हवामान व संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रम यांनी १९८८ मध्ये, आंतरशासकीय हवामान बदल मंडळाची स्थापना केली, मंडळाकडे हवामन बदल त्याचे संभाव्य परिणाम अनुकूल करण्यासाठीचे पर्याय समजून घेण्याकरीता वैज्ञानिक, तांत्रिक आर्थिक व सामाजिक माहितीचे परिक्षण करण्याचे कार्य, सोपविले आहेत.

भारतासारख्या विकसनशील देशावर हवामान बदलाचे अनेक दूरगामी परिणाम होणार आहे. हे वेगवेगळया शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे.

आंतर शासकीय हवामान बदल मंडळाच्या १९९८ मधील अहवालानुसार भारतातील सरासरी तापमान व पर्जन्य वृष्टीत वाढ होणार आहे. तापमानातील वाढ २020 च्या दशकात ३.३ सी ते ४.३सी इतकी राहील. त्याचप्रमाणे पर्जन्य निवृष्टीतील वाढ १ ते ३ टक्के राहील असा अंदाज आहे. तापमान वाढ साधारणतः संपूर्ण देशभर असेल पण पर्जन्य वृष्टीतील वाढ उत्तर पश्चिम भारतात सर्वाधिक राहिल. भारताच्या हवामान बदल संबधी पूणे येथील संस्थेमध्ये अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की, २०५० या नंतर भारतीय तापमानात २ से. पेक्षाही जास्त वाढ होईल महाराष्ट्राच्या कृषीवर हवामान बदला संबधी जागतिक बँक व भारताचे वन व पर्यावरण मंत्रालय यांनी नाशिक व नगर जिल्हयाचा अभ्यास करताना ज्वारी, बाजरी, व उस पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनात नगर जिल्हयात वाढ झाली. तर नाशिक जिल्हयात वाढ होईल. परंतू उसाच्या दर हेक्टरी उत्पादनात महत्वपूर्ण म्हणजे जवळपास ३० टक्के घट होईल असे अनुमान काढले होते. असा परिणाम तापमान वाढीचा व कार्बनच्या वाढत्या प्रमाणात उसाचा प्रतिसाद प्राप्त होईल.

अशा प्रकारे जागतिक तापमान वाढीचा जगातील सर्वच देशांना चटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारताच्या कृषी संदर्भात राष्ट्रीय पातळीवरील व जिल्हा पातळीवरील कृषीवर तापमान वाढीचा व पर्जन्य वृष्टीतील बदलाचा कसा परिणाम होऊ शकतो हे यावरून स्पष्ट होते.

**उपाय -**

१) कार्बनचे वातावरणातील प्रमाण एका विशिष्ट पातळीवर ठेवण्याकरीता प्रयत्न करणे.

२) हवामानाशी संबधीत असलेल्या तंत्रज्ञानाची आयात करणे.

३) औद्योगिक उत्पादने करीत असतांना किमान प्रदूषण



Scanned by CamScanner



**Prof. Hariom Puniyani**
Hislop College, Civil Lines,
Nagpur.

# ENVIRONMENTAL POLICY AND SUSTAINABLE DEVELOPMENT

## INTRODUCTION :

The foundation for the study of environmental economics can be traced to the work of Pigou and in particular his work on the theiry of externatlities. Systematic economic analysis of environmental problems started to appear in the 1960s. Since that time a considerable amount of research has been devoted to numerous issues that arise within the context of environmental policy making.

Human beings are both agents and victims of environmental change. While the changes to the environmental brought about by energy use currently are mostly the results of growth and consumption patterns in the developed world. Some of the greatest changes affecting the environment in recent years have taken place in developing countries and will continue to do so in to the future. Among these changes is the unprecedented growth in the world population, almost all of which is taking place in the developing world. A rapidly rising population necessarily leads to increase energy consumption. of course, but this is only one of the links between population growth and environmental damage. Rich and poor alike contribute to environmental change, but it is the poor who bear the brunt of the cost of environmental damage are mutually reinforcing. It is therefore, in the developing countries where the overwhelming majority of the poor live that the challenges to human well being from environmental degradation are Startkest, and where the most powerful examples of the links between economic development and environmental abound. However, despite the serious threat to human well being represented by environmental degradation all parts of the world. Policiies for an alternative, sustainable path exist. The challenge for the developed and developing world is to Marshal the political and financial support headed to implement necessarily.

## ENVIRONMENTAL POLICY :

The environmenta assumed a central role in India, to a large extent as a resuilt of the first major international conference on the environment, namely the United Nations Confernece on the human environmenta held in Stockholm in 1972. In preparation for this meeting, each member state was asked to prepare a report on the state of the environment. India set up a committee on the human environment under the chairmanship of Pitambar Pant, a Member of Planning Commission,. The outcomes was three reports. one on the state of environment, second on the problems of human settlement and the third on possible strategies to manage resources. Environmental goals were consequently incorporated in the Fifty five year plan onwards. :Legislations such as Wildlife Protection Act, 1972 and the Water Act, while the discursive thrust of much of environmental policy making in the late 1970s and early 1980s was on incorporating environmental principles in sectoral planning something that was matched with legislative investation, the latter part of the 1980s saw the focus shift towards sustainable development. The importance of this shift was that the lines between social and environmental concerns was more forcefully articulated. Again this was at least partly due to development internationally. The World Commission on Environment and Development (WCED) published the Brundtland Commission Report in 1987; a report that highlighted the importance of both intergenrational and

Scanned by CamScanner

intragenerational equity with regard to environmental management, Equally important was the fact that the Burndtland Commission report explicity recognized the linkages between the rights of communities and the management of the environment (Lifferty, 1998)

## SUSTAINABLE DEVELOPMENT

Within the field of environmental economic, it is now widely recognized that the goal of sustainable development is principally an equity, rather than an efficiency, issue (Howrath and Norgaard, 1993). This is not to say that economic efficiency is irrelevant to sustainable development as reducing the quantity of natural resources used up per unit of human satisfaction will clearly help reduce demands on the environment. However, as will be seen, economic efficiency is not a sufficient condition for sustainable development. Removing government policies or market failures. Which encourage inefficient use of environment, but will not guarantee it. Achieving sustainable development involves achieving equity both within generation to manage the resource base such that the average quality of life we ensure ourselves can potentially be shared by all future generation (Asheim 1991). It will be very much on equity between generations, rather than equity across a given generation. This is not to suggest that the latter is less important than the former. Indeed the influential report by the world commission on the environment and development (the Brunshand Report) in 1987; was keen to stress that these two aspects of equity were euqally important. It did the links between poverty and environmental degradation in developing countries. However, the literature on intragenerational equity is impossible for justice. The question of weather the developed nations of the world should be allowed to restrict development in poorer parts of the world on the grounds that such development is environmentally damaging and unsustainable (Dasgupta, 1988), Since the developed world attained its present state by engaging in comparable environmental degradation in the past, the industrial revolution of the eighteenth and nineteenth centuries was in many ways fed by the running down of environmental capital in the now developed world. However, identifying the appropriate trade-offs between intra- and inergenerational equity is an added issue.

## NEOCLASSICAL THEORY :

The negoclassical growth theory which incorporated natural resources constrains on economic activity (Salaw, 1974; Hartawick, 1977), implicity modeled sustainable development as non-declining consumption over time and was concerned with intergenerational efficiency rather than equity. Hartwick rule explained that individuals derive utility directly from the environmental and not just from the consumption goods that are produced partly with natural resources, non-declining consumption has been replaced by non-declining utility as a goal of policy in economic models (Pezzy, 1991). An alternative way of considering sustainable development has been to concentrate on means rather than ends. Since resources are necessary to produce utility. Some constraint on the amount of resources passed forward to future generations might or an appropriate way of achieving sustainable development.

The Hartwick Salaw approach : In 1977, John Hartwick proposed a rule of ensuing non declining consumption through time, in the case where an economy made use of a non-renewable resource (such as oil) in its economic process. Hartwick showed that so long as the stock of capital did not decline over, time, non-declining consumption was also possible. The stock of capital could be held constant by e.g. reinvesting all hotelling rents. These rents are those resulting from the itnertemperally efficient extraction programme for the non-renewable resource. The Hartwick model owing to the assumptions employed, therein; crucially that the aggregate production function for a consumption goods is a Cabb-Douglas one. This implies that as the amount remaining of the non-renewable resources goes to zero, its

Scanned by CamScanner

average products go to in fity, So that even though the natural resource is technically essential for the production of Consumption goods, it does not act as a constraint to growth. Man made and natural capital in this world is assumed to perfect substitutes for each other.

Criticisms of the Haratwick rule follow three lines; first that individuals derive utility directly from the environment and do not view it merely as an input to production. If this is the case, non-declining consumption is not equivalent to non-declining welfare over time, II Second is that the rule depends on the particular functional from chosen for the aggregate production function. Hartwick was also to restate his rule for a (constant elasticity of substitution) production function but this function had the property that the elasticity of substitutions between the natural resources and man-made capital is greater than one, so that the fixity in supply of the natural resource is actually irrelevant.

Involving People : Many of the pressing environmental questions are concerned not with natural resources themselves but with their management, which is largely an institutional and social matter. The participation of all relevant social actors in environmental management is the cornerstone on the basis of every environmental policy and program. Building on the positive links between income growth and the environment. While removing the negative connection between them requires the involvement of people in decision about how equipped to make judgements about how people value their environment.

**REFERENCES :**


1) Economic and Politcal Weekly, January 21-27, 06

2) Economic and Political weekly, February 06-12-2010

3) Environmental Economics, Madhu Raj, Ivy Publishing House, Delhi.

4) Environmental Economics, In Theory and practice. Mac Millan India Ltd.


Scanned by CamScanner



प्रा.सुमित्रा ना. मरस्कूले
कमला नेहरू महाविद्यालय,
नागपूर.

# पर्यावरण आणि शाश्वत विकास

पर्यावरण म्हणजे काय ? निरनिराळ्या तज्ज्ञांच्या व्याख्यावरून पर्यावरण म्हणजे काय हे स्पष्ट होते.

**जॅकी स्मिथ :-**

"सजीवाने अनुभवलेल्या प्राकृतिक, रासायनिक व जैवीक परिस्थितीची गोळाबेरीज म्हणजेच पर्यावरण होय".

**आर.एम.मॅकइव्हर :-**

"पृथ्वीचा पृष्ठभाग आणि तिची सर्व प्राकृतिक परिस्थिती, प्राकृतिक शक्ती साधन संपत्ती, भूमी, जल, पर्वत, मैदान, खनिज पदार्थ वनस्पती, प्राणी व संपूर्ण प्राकृतिक शक्ती पृथ्वीवर प्रगट होऊन मानवी जीवन प्रभावित करतात. व या क्रिया भौगोलिक पर्यावरणांतर्गत येतात.

**विश्व शब्दकोष -**

पर्यावरण त्या सर्व परिस्थितीत प्रणाली व प्रभावांचे एकत्रीकरण आहे. जे सजीवांच्या व त्यांच्या प्रजातिचा विकास जीवन व मृत्यूला प्रभावित करीत आहे,"

**पर्यावरणाची व्याप्ती :-**

मानवाच्या सभोवतालच्या नैसर्गिक घटकांच्या एकत्रीकरणातून आपले पर्यावरण तयार झालेले आहे. निसर्गाने मानवी जीवनाला हितकारक असे पर्यावरणाचे संतूलन साधलेले आहे. संपूर्ण मानवी जीवन पर्यावरणावर अवलंबून असल्याने पर्यावरणाचे रक्षण हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य ठरते. पर्यावरण नैसर्गिक उत्पादन साधनांचा स्त्रोत आहे. नैसर्गिक साधनांमुळेच पृथ्वीतलावर सर्व सजिवांच्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला. पर्यावरणाची व्याप्ती विस्तृत आहे.

**भूपृष्ठीय खनिजे :-**

पृथ्वीच्या जमिनीखालील थरातून काढलेल्या खनिजांच्या भुपृष्ठीय खनिजे असे म्हणतात. उदा.लोखंड, अॅल्युमिनियम, तांबे, सोने, चांदी इत्यादी मानवाच्या औद्योगिक, तांत्रिक व सांस्कृतिक विकासाकरिता ही खनिजे आवश्यक असतात.

**सागरी खनिजे :-**

समुद्राच्या पाण्यात विरघळलेल्या स्वरूपात आढळणारी खनिजे, समुद्रात विविध खोलीवर, अति खोलवर तळाशी आढळणारी खनिजे सागरी खनिजे होत. औद्यागिकदृष्टया ही खनिजे आवश्यक असतात.

**उर्जा :-**

मानवी प्रगतीकरिता उर्जा अत्यंत आवश्यक आहे. तेल, वायू, कोळसा, जलविद्युत, अणु उर्जा, जळावू लाकूड, जैविक तेल वनस्पती, सौर ऊर्जा, पवन, ऊर्जा समुद्रातील लाटांपासून निर्माण होणारी ऊर्जा शक्तीसाधन आहे.

**अन्न :-**

जगण्याकरिता मानवाला अन्न आवश्यक असते. शेती हा अन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. शेतीचे दोन भाग पडतात. १. अन्नधान्याची शेती व दुसरी प्राण्यांची शेती ज्यामध्ये जनावरांची वाढ करून त्यापासून उत्पादन घेतले जाते. जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता, तांत्रिकदृष्टी व पिक व्यवस्था यावर अन्नधान्याची उत्पादन क्षमता अवलंबून असते.

**मासळी :-**

प्रथिनयुक्त अन्न म्हणून मासळीचे स्थान अबाधीत आहे. प्रगतीशिल देशांना मत्स्यसंवर्धनामुळे उच्च दर्जाचे प्रथिनयुक्त अन्न उपलब्ध झाले आहे. त्याच बरोबर विदेशी चलन व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत आहे.

**पशुधन :-**

कोंबडी, बकरी, बदक, मेंढी, गाय, मैस, डुक्कर, उंट,

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर ६ वे चर्चासत्र २०१० ला आमच्या शुभेच्छा

Scanned by CamScanner

टक्के, ऑक्सीजन २१ टक्के, कार्बन डॉय ऑक्साइड, मिथेन व हॉयड्रोजन सहित इतर वायूचे प्रमाण १ टक्का आहे. मोठया प्रमाणात जंगल तोड झाल्याने कार्बनडॉय ऑक्साइड चे प्रमाण वाढून वातावरणातील तापमान वाढले आहे. वाढत्या तापमानामुळे ध्रुवावरील बर्फ वितळून समुद्रातील पाण्याची पातळी वाढून किनारी प्रदेशांना धोका निर्माण झाला आहे.

**जल प्रदूषण :-**

कारखान्यातील केरकचरा, दूषित पाणी, जलाशयात, नद्यांमध्ये टाकल्याने जल प्रदूषित होते. शहरातील घाणेरडे पाणी, नाले आणि नद्यांचे पाणी प्रदूषित करतात. प्रदूषित पाणी, पाण्यातील जलचरांवर प्रतिकूल प्रभाव टाकतात दूषित पाण्याने पिलीया, टायफाईड, कॉलरा, गॅस्ट्रो यासारख्या आजारांचा फैलाव होतो. समुद्रकिनाऱ्यावरील शहरांनी समुद्राला गटार बनविले आहे.

**भूमी प्रदूषण :-**

वनकचरा व रासायनिक सामुग्रीमुळे भूमीप्रदूषण वाढत आहे. अमर्याद पाणी पूरवठयामुळे शेतजमिन, शेतीयोग्य राहत नाही. वाळवंटी प्रदेशात वाऱ्यांमुळे आस-पासच्या शेतात वाळूचे ढिग जमा होतात. अशी शेती विनाकारण वाया जाते. बऱ्याच किरणोत्सर्गी पदार्थांना जमिनीमध्ये खोलवार गाडले जाते. युद्धांत वापरलेल्या अणूबॉम्बमुळे विवरे निर्माण होतात. रासायनिक खतांच्या व जंतूनाशकांच्या अतिरेकाने भूमी विषयुक्त बनते.

**ध्वनी प्रदूषण :-**

जो अनावश्यक आवाज वातावरणामध्ये पसरून आरोग्यावरर विपरीत परिणाम करतो त्यास ध्वनी प्रदूषण असे म्हणतात. विविध प्रकारचे उत्सव, समारंभ, औद्यगिकरणाची वाढ, लोकसंख्येचा स्फोट, वाहतूकीच्या साधनांची वाढती संख्या, विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट, औष्णिक विद्युत केंद्रे, घरगुती यांत्रिक उपकरणे, आठवडी बाजार, विक्रेत्यांचे ओरडणे इत्यादी बाबी ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरतात. ध्वनी प्रदूषणामुळे बहिरेपणा, मानसिक व शारिरिक त्रास, भिती, कानामध्ये आवाजाचा भ्रम त्रासाला बळी पडावे लागते.

**पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम :-**

ओझोनेचा क्षय :- ओझोनचा थर पृथ्वीचे संरक्षक कवच आहे. पृथ्वीवरील सजिवांच्या दृष्टीने फारच महत्वाचा आहे. ओझोन वायू जंबूपार (अतिनील) किरणांपासून मानवाचे संरक्षण करतो. अणवस्त्र स्फोट, सी.एफ.सी म्हणजेच क्लोरोफ्लुरोकार्बन्स यामुळे ओझोन थराचा क्षय होतो. जितक्या जास्त प्रमाणात स्तरात सी एफ सी संयुगे असतील त्याप्रमाणात ओझोन क्षयाचे प्रमाण वाढत जाते. ओझोन क्षयामुळे कॅन्सर, व शरीराची रोगप्रतिकार शक्ती कमी होऊन संसर्गजन्य रोग होतात. तापमान वाढल्याने अंटार्क्टिका, ग्रिनलंडमधील बर्फ वितळून किनारी प्रदेश पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण होतो.

**हरितगृह परिणाम :-**

पृथ्वीवर येणाऱ्या प्रारणातील ४८० तरंग लांबीची प्रारणे सर्वाधिक तीव्र असतात. ही आपल्या दृष्टीस "हिरवा रंग" म्हणून जाणवतात. ही प्रारणे भूपृष्ठावर पडतात तेव्हा भूपृष्ठ तापते आणि भूपृष्ठात साठलेली उष्णता परत अवकाशात जाते. कार्बनडॉय ऑक्साइड या लहरी शोषून घेतो. त्यामुळे तापमान वाढते. उष्णतेमुळे जमीन व हवा दोन्ही तापतात. कार्बनडॉय ऑक्साइड या लहरी शोषून घेतो. त्यामुळे तापमान वाढते. उष्णतेमुळे जमीन व हवा दोन्ही तापतात. कार्बनडॉय ऑक्साइडही तापतो. भूपृष्ठालगतच्या वातावरणाच्यास थराचे तापमान वाढू लागले की त्यातील उष्णता सागरात शोषून घेतली जाते व पाण्याची वाफ होते. ही वाफ हवेत मिसळली की उष्णता शोषणाच्या चक्रास गती मिळते. अशा तऱ्हेने उष्णता अडविणाऱ्या आवरणात गुणात्मक वाढ होऊन या आवरणाचा विस्तारही वाढत जातो. आणि जास्तीत जास्त उष्णता पृथ्वीच्या वातावरणात अडवून ठेवली जाते. यालाच इंग्रजीत 'ग्रिन हाऊस इफेक्ट' तर मराठीत 'हरितगृह परिणाम' असे म्हणतात. झपाटयाने केलेली जंगजलतोड, लाकूड, दगडी कोळसा, खनीज तेल, नैसर्गिक वायू यांच्या ज्वलनामुळे कार्बन डॉय ऑक्साइड वातावरणात मिसळलेला आढळतो.

**आम्ल पाऊस :-**

कोळसा, खनीज तेल व नैसर्गिक वायू सारखी खनीज इंधने जाळल्यामुळे सल्फर डॉय ऑक्साइड व नॉयट्रोजन ऑक्साइड यासारखे घातक रासायनिक वायू तयार होतात. हया वायूंची वातावरणातील बाष्प व इतर रासायनिक पदार्थांबरोबर अभिक्रिया होऊन होऊन गंधक आम्ल, नत्राम्ल



Scanned by CamScanner

तसेच सल्फेट्स यासारखे इतर अनेक घातक प्रदूषकारी पदार्थ तयार होतात. ही आम्ल प्रदूषके वातावरणातील हवेच्या प्रवाहाबरोबर वातारवणातील वरच्या थरात पोहोचतात व नंतर आम्लपाऊस, धुके व बर्फाच्या स्वरूपात जमिनीवर येतात. आम्ल पावसामुळे जमिनीतील पोषक घटक नष्ट होतात. वृक्षांवर विरीत परिणाम होतात. जलसाठे प्रदूषित होतात. ऐतिहासिक इमारतींना धाका पोहचतो.

**अणु अपघात व आण्विक दुर्घटना :-**

गेल्या काही दशकातील अणुउर्जेच्या अनेक दुर्घटना व अपघात घडून आले आहेत. अणूदुर्घटनेमुळे अनेक लोकांचे प्राण जातात. व दिर्घकालीन दुष्परिणाम भोगावे लागतात. १९८६ साली रशियातील चेर्नोबिल येथील अणूभट्टीत समस्या निर्माण होऊन अणूभट्टीत आग लागून स्फोट घडूमन आले. या स्फोटामुळे किरणोत्सारीत पदार्थ संपूर्ण युरोप तसेच उत्तर अमेरीकेतील वातावरणात पसरले. अनेकांना गंभीर आजाराने ग्रासले. १९४५ साली जपान मधील हिरोशिमा व नागासाकी ही शहरे अणूबॉम्बच्या स्फोटामुळे बेचिराख झाली. लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागले.

**पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी उपाय :-**

पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी १६ व्या शतकापासूनच प्रयत्न केले गेले. भारतात अलेक्झांडरा गिब्सन, एडवर्ड बोलफोर आदिंनी संरक्षणाचा विडाच उचलला होता. जर्मन जिवशास्त्राज्ञ अर्नस्ट हेकेल याने १८६६ मध्ये "प्रत्येक सजीव हा त्याच्या आसपासची परिस्थिती आणि आपला वारसा यांच्या संयुक्त प्रयत्नाने निर्माण झालेला असतो" असे महत्वाचे विधान केले. दुसऱ्या महायुद्धा नंतर विनाशलिला पाहून विकसीत देशांच्या लक्षात आले की मानवी उद्धार शांती आणि विकासात आहे. संयुक्त राष्ट्रसंघ, विश्व बँक, आंतरराष्ट्रीय मुद्राकोष या संस्थांनीह आर्थिक विकासाची गती तेज करण्यासाठी पोषक वातावरण निर्मीतीचा प्रयत्न केला.

भारत सरकारने पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने १९८६ मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा केला या कायद्यानुसार कोणत्याही उद्योजकाला उद्योग सुरू करतांना पर्यावरण व वन खात्याच्या अनुमतीचे प्रमाणपत्र आवश्यक असते.

जल प्रदूषण नियंत्रण कायदा करून त्याद्वारे घरगुती व औद्योगिक सांडपाण्याची विल्हेवाट, जल संसाधनांचा योग्य उपयोग, दूषित पाण्याचे शुद्धीकरण करून पुनर्वापर करणे, शुद्धीकरण संत्रंणांचा वापर न करणाऱ्या कारखान्यांवर कार्यवाही करणे इत्यादी बांबीवर लक्ष केंद्रित केले आहे.

कारखान्यातील यंत्र सामुग्रीचा आवाज कमी करणे, योग्य वंगन वापरून यंत्र कार्यक्षम ठेवणे, गर्दीच्या भागापेक्षा मोकळया जागमत कारखाने उभारणे, यंत्राभोवती संरक्षक भिंत उभारणे, अनावश्यक हॉर्न न वाजविने, ध्वनी शोषून घेणारे वड, पिंपळ, अशोक, कडूलिंब, चिंच यासारखे वृक्ष औद्योगिक परिसरात, दवाखान्याजवळ, शाळेजवळ लागवड करून ध्वनी प्रदूषण टाळता येते.

**प्रदूषण नियंत्रणाकरिता कार्यरत संस्था :-**

**१. राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (निरी) :-**

ही केन्द्रशासनाची एकमेव संशोधन प्रयोगशाळा नागपूर येथे आहे. या संस्थेतील वैज्ञानिकाद्वारे वायू, जल, भूमी व ध्वनी या प्रदूषाणाचा अभ्यास केला जातो.

**२. जागतिक संवर्धन संघटन -**

१९४८ मध्ये स्वित्झरलँडमधील मोर्जेस येथे स्थापना झाली. ही एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटना आहे. औद्यगिक सामुग्रीकरिता नैसर्गिक संसाधनावर कडक नियंत्रण ठेवून नैसर्गिक संसाधनांचा मानवाच्या उज्वल भवितव्याकरिता वापर करणे हे या संघटनेचे प्रमुख कार्य आहे.

**३. विश्व प्रकृती निधी :-**

विश्व प्रकृती निधीचा स्थापना १९६१ मध्ये झाली. याचे कार्यालय स्वित्झरलँडमध्ये आहे. जगातील वन्यजिवांच्या संवर्धनासाठी ही संस्था प्रयत्न करते.

**४. विश्व प्रकृती निधी (भारत) :-**

याची स्थापना १९६९ मध्ये झाली. याचे मुख्यालय मुंबई येथे आहे. पर्यावरण संवर्धन विषयक प्रकल्पांना अर्थसहाय्य करणे व प्रकल्पाविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण करून त्यांचे सहकार्य मिळविणे, शासनाच्या पर्यावरण संवर्धन प्रकल्पाकडे लक्ष देणे, प्रकल्पाकरिता अर्थसाहाय्याची जुळवाजूळव करणे ही उद्दीष्टे समोर ठेवून कार्य सूरू केले आहे.

**५. भारतीय वन्यजीव संरक्षण संस्था -**

१९५८ मध्ये डेहरादून येथे या संस्थेची स्थापना झाली. ही संस्था डब्ल्यु सी यु ची सभासद संस्था आहे.

Scanned by CamScanner

वन्यजिवांच्या संरक्षणाकरिता कार्य करते.

**६. संयुक्त राष्ट्राची वातावरण बदल परिषद :-**

बुधवार दि.८ डिसेंबर २०१० रोजी मेक्सिकोच्या कानकून येथे संयुक्त राष्ट्राच्या वातावरणात बदल परिषेदेचे आयोजन केले. पुर्नवापर करता येईल अशा ऊर्जेवर चालणाऱ्या वाहणांची दौड त्यावेळी आयोजित केली होती. या शर्यतीतील वाहने ८० दिवसाआधी जिन्हेवा येथून निघाली. ही वाहने २२ जानेवारी २०११ ला पुन्हा जिन्हेवात पोहचतील. हरित तंत्राज्ञानाने कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळवणे असाध्य नाही हे या शर्यतीने सिद्ध केले. ग्लोबल वार्मींगमुळे जगातील हिमनदयांचे वितळणे व त्यामुळे जिवीत व वित्तहानी होने यावर चिंता व्यक्त करून धोक्याचा इशारा या परिषदेत देण्यात आला.

जगातील नामवंत व्यक्तींनी सुद्धा पर्यावरणाला अबाधीत राखण्यासाठी प्रयत्न केले.

**१. सुंदरलाल बहूगुणा :-**

हिमालयातील पर्यावरणाच्या संवर्धनसाठी सुंदरलाल बहुगणांनी आपले आयुष्य खर्ची केले. ते 'चिपको' आंदोलनाचे प्रणेते आहेत. व्यावसायिक कंत्राटदाराकडून होणाऱ्या विराट वृक्ष तोडीस उत्तराखंडातील तेहरी भागातील आदिवासींनी बहुगुणांच्यास नेतृत्वात वृक्षांना मिठी मारून प्रतिबंध केला .

**२. राजेंद्र सिंग -**

राजेन्द्र सिंग यांच्या अथक प्रयत्नामुळे पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या अरवरी नदीच्या परिसरात ३००० हजार बंधाऱ्याचे गठन करण्यात आले. या प्रकल्पामुळे वर्षभर कोरडी राहणारी अरवरी नदी आता बारमाही वाहू लागली. राजेन्द्र सिंग जलसंसाधनाचे प्रवर्तक आहे.

**३. मेधा पाटकर :-** सरदार सरोवरामुळे होत असलेल्या आदिवासी विस्थापितांच्या प्रश्नावर त्यांच्या बाजूने आंदोलनात उडी घेतली. हे आंदोलन नर्मदा बचाव आंदोलन या नावाने ओळखले जाते.

**४. डॉ. एम.एस. स्वामीनाथन :-**

भारतीय हरित क्रांतीचे जनक गव्हावर संशोधन करून जास्त उत्पादन देणारी गव्हाची जात विकसीत केली. एम.एस. स्वामीनाथन रिसर्च शाश्वत हरितक्रांतीचे कार्य करतात.

**पर्यावरण आणि शाश्वत विकास यात संतुलन :-**

विश्व आयोग ॲक्ट १९८७ च्या रिपोर्ट नुसार शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भावी पिढीला आपल्या गरजांना पुर्ण करण्याच्या योग्यतेनुसार समझोता न करता वर्तमानकालीन गरजांना दुसऱ्या भागातील व्यक्ती आणि भावी पिढीला वंचित न करता सर्व व्यक्तींना आपल्या गरजा पूर्ण करण्याची परवानगी देतो. मानव आपल्या वर्तमानकालीन गरजा भागविण्यासाठी नैसर्गिक साधन सपंत्तीचा अशाप्रकारे वापर करेल की पृथ्वीच्या दुसऱ्या भागात राहणाऱ्या लोकांना, कुटुंबांना वंचीत राहावे लागणार नाही. शाश्वत विकास साधन संपन्न लोकांच्या तुलनेत साधनसहित लोकांची तसेच वर्तमान पिढीपेक्षा भविष्यकालीन पिढीची प्राथमिकता आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या मध्ये जीवनमान खऱ्या अर्थाने पोषक बनविण्यासाठी आर्थिक वृद्धी आणि समता, नैसर्गिक साधनांचे तथा पर्यावरणाचे संरक्षण आणि सामाजिक विकास या तीन बांबीवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

आर्थिक विकासाचे मुल्यमापन करतांना दोन दशकापर्यंत केवळ आर्थिक बाबी विचारात घेतल्या जात होत्या. जे देश आर्थिकदृष्टया संपन्न त्यांना प्रगत देश आणि जेथे आर्थिक विकासाचा अभाव होता ते प्रगतिशील देश ते संबोधत होते. उत्तर अमेरीका आणि युरोपातील बहुतेक देशांनी नैसर्गिक साधन सामुग्रीचा शोध घेऊन व वापर करून आपला विकास करून घेतला. आर्थिक दृष्टया अधिक सक्षम बनले. तर गरीब देश गरीब राहीले. आर्थिक मुल्यांवर आधारित विकास प्रक्रियेमुळे पर्यावरणाचा मोठयाप्रमाणात क्षय झाला.

सुमारे ७० च्या दशकात केवळ आर्थिक विकासामुळे लोकांचे जीवनमान सुधारू शकणार नाही. हे नियोजनकारांना कळून चुकले. त्यांनी पर्यावरणातील स्थिती सुधारण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले.

महात्मा गांधींनी योग्य पर्यावरण नियोजन असलेल्या खेडयांची संकल्पना मांडली होती. औद्योगिक प्रक्रियेद्वारे निर्माण होणाऱ्या वस्तू ऐवजी खेडयात निर्माण होणाऱ्या वस्तूंचा वापर करणाऱ्यावर भर दिला. त्यांनी मांडलेली पर्यावरणासंबंधी तत्वे आज दुरगामी टिकाऊ पर्यावरण योजनाचा प्रमुख घटक मानला जातो.

आज जग पर्यावरण की विकास या द्वंदात अडकले आहे. पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने मर्यादित असल्यामुळे



Scanned by CamScanner

आर्थिक दृष्ट्या सबळ घटकांद्वारे अधिक प्रमाणात वापरल्या गेलेल्या नैसर्गिक संसाधनाची भरपाई होवू शकत नाही. म्हणून पृथ्वीवरील पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी टिकाऊ जिवन शैलीचा अवलंब केला पाहिजे. आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी विकास करतांना भविष्यात येणाऱ्या पिढयाच्या गरजा भागविण्यासाठीच्या क्षमतेशी कुठल्याही प्रकारची तडजोड न करता केल्या जाणाऱ्या विकासास टिकाऊ पर्यावरण स्नेही जिवन शैली असे म्हणतात. या प्रक्रियेत देश-खंड विभिन्न वर्ग-जमाती, लिंग व वयातील विषमता दूर करून समानतेचा अवलंब करण्यासाठी प्रयत्न करण्याची तरतुद करण्यात आली आहे. जगात नैसर्गिक संसाधनाची उपलब्धता असमान आहे. त्यामुळे त्याच्या उपलब्धतेसाठी विभिन्न राष्ट्रात युद्ध सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचा मानवी जिवनावर विपरीत परिणाम होत आहे. हे परिणाम दूर होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

**शाश्वत विकासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न :-**

दुसऱ्या महायुद्धाची विनाशलिला पाहून विकसित देशांनी आप आपसातील देश आणि विरोधाचे राजकारण त्यागूण सामूहीक स्तरावर सहकार्याची कार्यपद्धती अवलंबली संयुक्त राष्ट्र संघ विश्व बँक, विश्व व्यापार संघटना, इत्यादी संस्थानी आर्थिक विकासाची गती जलद करण्यासाठी प्रयत्न केले. तर युनीसेफ डब्ल्यु. एच. ओ. यु.एन.डि.पी. यु.एन.ई.पी. यु.एन.ई.एस.सी.ओ. इत्यादी संस्थांनी जगाला दारिद्रय बेकारी भूकबळी, निरक्षरता, महामारी, नैसर्गिक, आपत्ती इत्यादी समस्या पासून वाचविण्यासाठी प्रयत्न केले.

सन १९७२ ते २००२ या तीस वर्षांच्या काळात जलवायु परिवर्तन, जलप्रदुषण, वायु प्रदुषण यावर जागतिक तसेच विभागीय स्तरावर अनेक सम्मेलने व कार्यशाळांची आयोजन केले. १९९२ च्या पृथ्वीसंम्मेलनात विकसित देशांनी आपल्या सकल राष्ट्रीय उत्पादनांचा ०.७ टक्के वाटा विकसनशील देशांना मदत म्हणून देण्याचे मान्य केले.

२००२ मध्ये जोहान्सवर्ग येते झालेल्या पृथ्वी संम्मेलनात खालील मुद्दयावर सहमिती दर्शविण्यात आली.

१. स्वच्छेत संबधी सुविधा पासून वंचित असणाऱ्या लोकांचे प्रमाण सन २०१५ पर्यंत ५० टक्के कमी करणे.
२. पर्यावरणाला हानी न पोहचविणाऱ्या सौर आणि पवनऊर्जा स्त्रोतांना प्राधान्य देणे
३. २०२० पर्यंत रसायनाचे उत्पादन तथा वापरला मानव आणि पर्यावरणासाठी सुरक्षित वनविण्याचे लक्ष निर्धारित करणे.
४. खतरनाक कचऱ्याचे योग्य रित्या प्रवधंन करण्यास प्रोत्साहन देणे.
५. विकासाचे निर्धारित लक्ष पूर्ण करण्यासाठी गरीब देशांचे आर्थिक मतदतीत वाढ करणे.
६. जागतिकीकरणाचे चांगले वाईट प्रभाव लक्षात घेवून गरीब देशापुढे निर्माण होणाऱ्या समस्याकडे लक्ष देणे.
७. श्रीमंत देशांनी व्यापर संतुलनात बिगाड निर्माण करणारी आर्थिक मदत कमी करण्याची ईच्छा व्यक्त केली.
८. पृथ्वीला वाचविण्यासाठी जवाबदारी सर्व देशांची आहे. परंतू यासाठी येणाऱ्या खर्चाचा बोझा श्रीमंत देशांनी जास्त प्रमाणात उचलला पाहिजे. असे ठरले.
९. सर्व देशांनी पृथ्वीवरील संसाधनांना भावी पिढीसाठी सुरक्षित ठेवण्याच्या रनणिती वर सहमिती दर्शविली.

माणवी विकास तसेच माणवाचे अस्तित्व पर्यावरणाशी निगडीत असल्याने पर्यावरणाकडे लक्ष देणे. नितांत गरजेचे आहे. आर्थिक विकासाच्या जडवडीत मनुष्य पर्यावणारचे अन्यायपूर्ण दोहण करतो. कोणालाही पर्यावरणाची अवहेलणा करून शाश्वत विकास साध्य करता येत नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. पर्यावरण माणव संसाधन व विकास - लेखक - योगेशकुमार शर्मा

२. पर्यावरण शास्त्र - लेखक - डॉ. विठ्ठल घारपुरे

३. वैध पर्यावरणाचा - लेखक - निरंजन घाटे

४. पर्यावरण शास्त्र - लेखक - एरक भरूचा - अनुवादक - डॉ. सिद्धीविनायक बर्वे

५. पर्यावरण अभ्यास - लेखक - किशोर भुते व इतर

६. दैनिक लोकमत - व दैनिक भास्कर वृत्तपत्र



Scanned by CamScanner



ASHOK GAWHANKAR
Raosaheb Thawre
Jr. College, Nagpur.

# GLOBAL WARMING AND CLIMATE CHANGE

Global warming has been at the centre of international environmental law and policy at least since the early 1990'. In recent years, it has quickely become one of the main environmental issues and today attracts widespread media attention. Its central role in international policy and politics has been contributed by the award of nobel peace prize in 2007 to the intergovernmental panel on climate change. Global Warming caused by anthro pagenic emissions is on of the quintessential global environmental problems that humanity faces. Its global dimension is due to the fact that from an environmental perspective the warming of the climate cannot be directly attributed to specific emissions but is caused by harmful emissions anywhere around the world. Further the harmful impact from a unit of co2 it the same regardless of its source. Yet global warming is any thing but a uniform global issue when it comes to the contributions of individual countries to global warming and the impact that global warming has and will have on individual countries. Similarly 6.8 billion people on earth make different contributions to global warming and are differently vulnerable to its impact.

The different vulnerability of people in the face of on going global warming damages and the different capacities of people to adopt to global warming raise significant issues from a human rights perspective until recently these have not been given much prominence because the legal regime was conceived largely from an environmental, economic and trade perspective. Fast increasing global warming related damages and the realisation that global warming dis proportionately harms the poor are brining human rights and vulnerability to therefore.

## Global Warming law and equity -

The U N frame work convention on climate change, ratified by nearly all states, seeks to address the problem of global warming at the international level. Its doesn't mandate specific emission reduction targets but it derives its importance from the fact that its basic principles apply to any subsequent measures taken to reduce harmful emissions. The convention is supplemented by the kyo to protocol adopted in December 1997, which sets out quantified emission limitation and reduction commitments for OECD Countries and countries under going the process of economic transition to a market economy.

## Equity in the context of flexibility mechanisms -

The relatively progressive nature of the Kyoto protocol from the point of view of emission reduction commitments in terms of equity was not achieved without some compromised one of the major concession that were in the process of negotiating the climate change convention and more particularly the Kyoto protocol was the introduction of flexibility under the juice of what are now known as Kyoto mechanism. Flexibility includes two distinct components. Its provides on escape clause for developed countries that allows them not to implement the commitments they have taken. This is novel in international lavel because countries are supposed to implement commitments they take at their level. Flexibility is novel because it gives much increased prominence to the private sector in the implementation of an international treaty. While there is no necessary congruence between the outsourcing of compliance and the private sector since the former could happen without the latter, in the context of the kyoto protocol, the two are intrinsically linked.

Scanned by CamScanner

## Rethinking Global Warming level post 2012 -

Negotiations for new measures to address global warming after 2012, are on going yet the frame work within which this is taking place is inadequate. As a result a number of elements need to either rethought or given new content. This section focuses on some of the many issues that need rethinking in the continuous search for an effective global warming regime. It also emphasizes the primary of human rights and vulnerability a necessary foundation of further measures on climate change. Further it argues that air should be recognized as a common heritage to ensure that the benefits of climate mitigation are not appropriated by private actors rather ploughed backs into renewable energy or other measures that are sustainable and primarily benefit the most vulnerable. Finally it argues that a new basis for allocating entitlements must be found to ensure that the poor and vulnerable are not indirectly disposed of something that is in essence human kinds primary survival resource.

## Vulnerability and Human Rights at the centre-

links between global warming and human rights can be identified at different levels. Yet, human rights have not been a significant dimensions of global warming policy, debates. This can be partly ascribed to the fact that while global warming is in essence an environmental problem, it requires much more significant changes in strategies of economic development than other environmental problems. Human rights concerns arise both in the context of mitigation and adoption, with regard to global warming mitigation issues arise for developing countries in taking on emission stabilization or reduction commitments. Indeed commitments are only justifiable if there consequences are completely offset for the majority of the poor. This is a direct consequences of the principle that countries can take progressive measure to relies social economic rights but they cannot back tark.

## To words new forms of entitlement on Air -

The basis for today's global warming law is on the whole, the grand fathering of existing emission patterns. In political terms this can be easily explained since any on the formula would affect existing pollutinos more than the economic actors or the countries that contribute less to global warming. Yet, this is an in effective way to address global warming. Indeed, while a baseline based on existing energy use puts the burden on developed countries and on polluting industries, it dose not provide any compensation mechanism to non industrialized countries, and to people who have not benefitted from the standards of living achieved while causing global warming. As long as existing levels of economic developments and existing pollution patterns contribute the basis for regulation, global warming Law will be little more than a reflection of real real palik considerations.

**Conclusion** - Global Warming is a threat to the where of human mind and to life on the planet. Yet human - induced global warming is a deeply inequitable environmental problem. on the one hand, it has been caused by economic growth that has only benighted to date a minority of the worlds population concentrated in a small minorities of the countries on the other hand the people who are most at risk of global warming and its negative impacts are the poorest countries and the poorest people in each country. It is in large part the rich that hold the key to solving the problems either by reducing their own emissions or by investing in alternative economic development strategies. The solution to global warming does not lie in simplistic solution such as a simple shift from GHG emitting technologies to nuclear technology as some times advocated on environmental reasons. The solution lies in reforming the rules of the game so that the poor take centre stage. This can only be achieved by putting equity and human rights at the centre of a new entailments based strategy, which recognizes that global warming is an environmental problem that can only be comprehensively addressed if its human dimension is put at the centre of the legal regime adopted.

Scanned by CamScanner




**प्रा.अशोक चेटूले**
आदीवासी शिव कनिष्ठ
महाविद्यालय, गराडा.


# पर्यावरण व शाश्वत विकास हयातील संतुलन

## प्रास्ताविक :-

ज्या जगात मानव राहतो त्याच जगात विविध पशु, पक्षी, प्राणी, वृक्ष, लता, वेली देखील निर्माण होतात, जगतात आणि कालांतराने नष्ट होतात. मानवाच्या बाबतीतही असेच घडते. हया सर्वांना सोबत घेऊनच त्याला आपला सर्व प्रकारचा विकास घडवून आणावयाचा असतो. उत्पत्ती, स्थिती आणि लय यात एक निश्चित असा क्रमबध्द निसर्गप्रवाह आहे. जोपर्यंत यात संतुलन आहे तोपर्यंत शाश्वत विकास संभवत असतो. जो दिर्घकाळ टिकणारा व फल देणारा असतो. प्रस्तुत निबंधात पर्यावरण व शाश्वत विकास यात कशाप्रकारे संतुलन असावे हे प्रामुख्याने मांडले आहे.

**पर्यावरणाचे प्रमुख घटक :-**

पर्यावरणाच्या प्रमुख घटकात पुढील बाबीचा प्रामुख्याने समावेश होतो.

१. नैसर्गिक साधन संपत्ती

२. शेती व उद्योग

३. लोकसंख्या

४. जैवविविधता ५. नैसर्गिक आरिष्टे

या सर्वांना सोबत घेवून त्यांच्या विकासाची काळजी घेत घेतच मानवाला आपला आर्थिक विकासच नव्हे तर सर्वांगिण विकास घडवून आणावयाचा असतो. यात मानवनिर्मित आरिष्टांवर नियंत्रण ठेवणे मानवाला शक्य आहे हे लक्षात घेवून ही मानव निर्मित आरिष्टे नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने शाश्वत विकास ही संकल्पना पुढे आली आहे. शाश्वत विकास होण्याकरिता सुयोग्य पर्यावरण निर्मिती आवश्यक आहे हे लक्षात घेवूनच पर्यावरण व शाश्वत विकास हयात संतुलन साधण्याचा प्रयत्न केला जातो. उपरोक्त प्रत्येक घटकाचा स्वतंत्रपणे विचार करुन त्यातील संतुलन कसे साधता येईल याचा विचार येथे करु.

**१) नैसर्गिक साधन संपत्तीच्या संदर्भात पर्यावरण व शाश्वत विकास यातील संतुलन :**

आज संपूर्ण जगात नैसर्गिक साधन संपत्ती अनियंत्रित वापर सुरु असल्याचे दिसून येते. औद्योगिकरण आणि अविवेकी आर्थिक विकास नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिवापर करण्यात आला विविध धातू, कोळसा. खनिज तेल यांची मागणी सर्वत्र मोठ्या प्रमाणावर वाढली असून ती पुरविण्याकरिता भू-गर्भ अधिकाधिक खणन करुन या संपत्तीचा पुरवठा करण्यात आहे. खाणकाम व खनिज शुध्दीकरणामुळे पर्यावरण त्याचा अनिष्ट परिणाम झाला आहे. वायू आणि जलप्रदुषण वाढ होवून पृथ्विचे तापमान वाढले आहे. खाणकामाकरिता वनांची कटाई केल्यामुळे वनक्षेत्र मोठ्या प्रमाणात घटले या सर्वाच्या परिणाम स्वरुप पर्यावरणात असंतुलन निर्माण झाले आहे. हे संतुलन साधण्याचा प्रयत्न करण्यासोबत प्रत्येक देशाला आपला आर्थिक विकासही घडवून आणावयाचा आहे. याकरिता प्रत्येक देशाने नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रदुषण निर्माण होणाऱ्या उर्जेचा आता कमी वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रदूषण निर्माण होणाऱ्या उर्जेचा आता वापर करण्याची आवश्यकता वाढली आहे. खाणकाम करताना ज्या बाबीची समाजाला खरोखरच गरज आहे व त्या बाबींचा पुरवठा करतांना प्रदूषण वाढणार नाही याची खात्री असलेल्या त्याच बाबींची निर्मिती प्रत्येक देशाने केली पाहिजे. खाणकाम करतांना वनांचे संरक्षण करुन त्यांचे क्षेत्र कमी होणार नाही हयाची काळजी घेतली पाहिजे. यामुळे पर्यावरणात निश्चितपणे संतुलन निर्माण होईल व जो विकास घडून येईल तो शाश्वत स्वरुपाचा असेल.

**२) शेती व उद्योगांच्या संदर्भात पर्यावरण व शाश्वत विकास यातील संतुलन :-**

लोकसंख्येच्या वाढीबरोबरच खाद्यान्नाची गरज सातत्याने वाढत गेली. या व्यवसायातून आर्थिक प्राप्ती निश्चितपणे होत गेली. या खाद्यांन्नाची गरज पुरविण्याकरिता

Scanned by CamScanner

मानवाने शेतीमध्ये संशोधन करून रासायनिक खते, किटकनाशके व संकरित बियाणांचा शोध लावला यातून खाद्यान्नाचे उत्पादन निश्चितपणे वाढले त्यातून आर्थिक विकासही झाला परंतु हा विकास शाश्वत स्वरुपाचा नव्हता. थोड्याच काळात या सर्वांचा शेतीवर विपरित परिणाम होवून शेती प्रदूषित झाली. जमीनीचा कस कमी झाला व पर्यावरण विषय समस्या निर्माण झाल्या. उत्पादनातही घट झाली व या क्षेत्रातील पर्यावरणात आणि विकासात असंतुलन निर्माण झाले.

याच काळात मानवाच्या वाढत्या गरजांमुळे विविध उद्योगांची झपाट्याने वाढ झाली. नैसर्गिक साधन संपत्तीचा अविरत वापर सुरु झाला. वातावरणात विषारी वायू सोडण्यात आला. नद्यांमध्ये प्रदूषित पाणी मोठया प्रमाणात सोडण्यात आले. मानवी आरोग्य अगदी धोक्याच्या टप्प्यावर येवून ठेवले. अनेकांचा मृत्यु झाला. हे परिणाम अत्यंत गंभीर स्वरुपाचे होते. नवनवीन वस्तु व उत्पादनात अतोनात वाढ यामुळे पर्यावरणाला धोका पोहचला असंतूलन निर्माण झाले. मागणीपूर्वीच उत्पादन तयार होण्याची प्रक्रिया सुरु झाली. निसर्गाला पूर्वस्थितीत आणण्याकरिता आवश्यक असलेला कालावधी उपलब्ध झाला नाही. परिणामी झालेला विकास हा अशाश्वत स्वरुपाचा राहिला.

ज्या कारणांनी हा परिणाम झाला त्या कारणांच्या मुळाशीच केलेली उपाय योजना ही प्रभावी ठरते. हे लक्षात घेता शेतीचा शाश्वत विकास साधण्यासाठी आणि पर्यावरणात संतुलन निर्माण करण्यासाठी चिरकाळ जैविक शेती करण्याची गरज निर्माण झाली आहे. शेती करिता लागणारी साधन सामग्री शेतीचा कस टिकविणारी व नैसर्गिक उत्पादन वाढ देणारी असल्यास पर्यावरणाचे संतुलन साधले जाईल व शाश्वत विकासही साधता येईल. तसाच विचार उद्योगांच्या बाबतीतही करावा लागेल. साधे ॲटोमोबाईल क्षेत्र अभ्यासले असता हे स्पष्टपणे दिसून येते की जिथे एका गाडीने काम भागले असते तिथे दहा गाडया रस्त्यावर धावत आहे. परिणामी खनिज तेलाचा वापर आवश्यकतेपेक्षा जास्त आहे आहे तो थांबवता आल्यास दिर्घकाळ या क्षेत्रातील सेवेंचा लाभ घेता येईल परंतु असे जर झाले नाही तर तेलाचा साठा संपुष्टात येताच ही सर्व वाहने निरुपयोगी होतील असे होऊ नये यासाठी तसेच या क्षेत्रामध्ये झालेले प्रदुषण रोखण्यासाठी शाश्वत विकासाचा मार्ग स्विकारण्याची गरज आहे.

**३) लोकसंख्येच्या संदर्भात पर्यावरण आणि शाश्वत विकास यातील संतुलन :-**

लोकसंख्या युक्त असल्यासच विकासाचे शाश्वत फायदे सर्वांना मिळू शकतात. अतिरिक्त लोकसंख्येमुळे अनेकविध पर्यावरण विषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. भारतातील शहरे या समस्याना प्रामुख्याने बळी पडलेली आहे. सर्वत्र अस्वच्छता. वाढता कचरा, वाढती आवश्यकता, सर्वत्र निर्माण झालेली अनावश्यक स्पर्धा विचारात सातत्याने होणारी वाढ या सारख्या बाबींनी विकासाच्या मार्गात तर अडथळे निर्माण केलेच आहे. पर्यावरणातील संतुलनही बिघडलेले आहे. लोकसंख्या विकासाला पुरक ठरते हे जेवढे सत्य आहे तेवढेच सत्य ती शाश्वत विकासाला बाधक ठरते हे ही आहे असे दिसून येते. या सर्वांवर उपाय हाच आहे की प्रत्येकाने लोकसंख्या नियंत्रित ठेवण्याचा आपापल्यापरीने विचार केल्यास पर्यावरणाच्या बहूतांश समस्या सुटू शकतात. लोकसंख्येवर नियंत्रण आले की, मानवी गरजांवर नियंत्रण येते. मानवी गरजा नियंत्रित झाल्या की पाणी, वीज, इंधन, खनीजे यांच्या वापरावर नियंत्रण येते. यांचा वापर नियंत्रित झाला की पर्यावरणातील हवा, पाणी, ध्वनी, वाफ यांच्यातील प्रदूषण कमी होते. हे प्रदुषण कमी झाले की शाश्वत विकासाचा मार्ग मोकळा होते.

**४) जैव संदर्भात पर्यावरण व शाश्वत विकास यातील संतुलन :-**

मनुष्य, प्राणी, पशू, पक्षी आणि विविध वनस्पती या सर्वांचे मिळून पृथ्वीवर एक सुंदर पर्यावरण तयार झाले आहे. "जीवो जीवस्य जीवनम" हे जरी खरे असले तरी प्रत्येकाला स्वतंत्रपणे पूर्ण आरोग्यानिशी येथे जगता आले पाहिजें. कारण नसतांना कुणाचाही नाश होणार नाही अशी व्यवस्था येथे फक्त मानवच निर्माण करु शकतो. आज मात्र हया पर्यावरणात असंतुलन निर्माण झाले आहे. विविध प्रजाती नष्ट होत आहेत. काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत काहींना मानव आपल्या विकासाचे कारण सांगुन नष्ट करीत आहेत आरोग्याकरिता विविध वनस्पती रामबाण उपाय म्हणून आजवर समाजाच्या कामी आल्या आहेत त्याही नष्ट होतांना दिसत आहे. यामुळे विकासावर त्याचा निश्चित असा परिणाम दिसून येतो. या प्रजातीचे संवर्धन करता आल्यास पर्यावरण आणि शाश्वत विकास सहज साध्य आहे. अन्नसाखळी कायम ठेवल्यास हा प्रश्न सुटू शकतो.

Scanned by CamScanner

५) नैसर्गिक आरिष्टांच्या संदर्भात पर्यावरण व शाश्वत विकास यातील संतूलन :-

तापमानात वाढ, अवेळी पाऊस, पावसाळयात ढगफुटी ऋतूचक्रात बदल, भूकंप, सागरी तुफान या सारख्या विविध नैसर्गिक आरिष्टांचा सामना मानवाने आजवर अनेकदा केला आहे. पर्यावरण संतुलन असतांना या आरिष्टांची पूर्वसूचना मिळून त्यावर संरक्षणात्मक उपाययोजना करण्यास पुरेसा कालावधी मिळत असे. प्रत्येक घटनेची निश्चितता असल्यामुळे त्याचा अंदाज घेऊनच विकासाच्या योजना आखल्या जाऊन त्याची वेळेत अंमजबजावणी करणे शक्य होते. परंतू जसजसी पर्यावरणात प्रदूषणाची वाढ होत जाते या नैसर्गिक आरिष्टांची पूर्व कल्पना नीटपणे येत नाही. आरिष्टांचे स्वरुप देखील अपेक्षेप्रमाणे राहत नाही त्यामुळे शाश्वत विकासात अडथळे निर्माण होतात हे लक्षात घेता पर्यावरण संरक्षण व पर्यावरण आणि विकास यात संतूलन साधण्याची गरज भासते. प्रदूषण होणार नाही याची काळजी घेवूनच विकासाच्या योजना कार्यान्वित व्हावयास पाहिजे.

मानवाला शाश्वत म्हणजेच दीर्घकाळ टिकणारा विकास साधावयाचा आहे. हा विकास साधण्याकरिता त्याला सुयोग्य अशा पर्यापरणाची जोड द्यावी लागेल. पर्यावरणाचे उपरोक्त घटक विकासाच्या संदर्भात महत्वाची भूमिका बजावत असतात. या सर्व घटकांचा विचार करुन शाश्वत विकासाचे प्रयत्न करावे लागतील. भूमी. श्रम, भांडवल, संघटन आणि साहस या सर्व उत्पादक घटकांचे पर्यावरणाशी संतुलन साधावे लागेल. पर्यावरण प्रदुषणाचा परिणाम भूमी व श्रम हया दोन्ही घटकांवर विशेषे करुन होत आहे. या दोन्हीचे संवर्धन करण्याची जबाबदारी आता सर्वांनी घेतली तर यापुढे शाश्वत विकासाची आशा धरता येईल.

औद्योगिकीकरण, उपभोक्तावादी प्रवृत्ती, चंगळवाद यामुळे भूमी या साधनाचा ऱ्हास होत आहे. इंधन संपत आहे. नद्यांचे पाणी प्रदुषीत होत आहे. हवा. प्रदुषण यामुळे कालांतराने हया गोष्टी संपणाऱ्या आहेत केवळ, श्रम, भांडवल व संयोजक हया तीनच घटकामुळे उत्पादन प्रक्रीया पूर्ण होऊ शकणार नाही.

नैसर्गिक साधनावर विपरीत परिणाम झाल्यामुळे श्रम, भांडवल आणि संयोजक हया घटकावर सुध्दा त्याचा प्रभाव होवून त्याची कार्यक्षमता आणि प्रतवारी घटली आहे. या घटकांची कार्यक्षमता आणि प्रतवारी कायम ठेवण्यासाठी या चारही घटकामध्ये संतुलन असणे आवश्यक आहे.

नैसर्गिक आणि मानवनिर्मित उत्पादन साधनामध्ये संतुलन प्रस्थापित करण्यासाठी शाश्वत आर्थिक विकासाची आवश्यकता आहे. जर अशाश्वत आर्थिक विकासाच्या मागे लागलो तर या उत्पादनाच्या साधनामध्ये असंतुलन निर्माण होवून उत्पादन, उत्पादकता, उपभोग इत्यादी मध्ये घट होवून आर्थिक विकासात घट होईल.

उत्पादन साधनामध्ये संतुलनाकरिता पर्यावरणीय दृष्ट्या योग्य असा आर्थिक विकास करुन संथ गतीने का होईना पण भविष्याच्या दृष्टीने शाश्वत असा विकास होईल म्हणून नैसर्गिक उत्पादन साधने आणि मानवनिर्मित उत्पादन साधने यात योग्य संतुलन आवश्यक आहे.

आर्थिक विकास मानवासाठी असून मानव हा आर्थिक विकासासाठी नाही. उपभोक्तावादी प्रवृत्ती, अत्याधिक चंगळवादाकरिता मोठया प्रमाणात उत्पादन आणि उत्पादकतेची आवश्यक होती म्हणून मानवाने निसर्गाचा अविवेकीपूर्ण वापर करुन औद्योगिकरणाचा आणि रासायनिक शेतीचा उपयोग करुन पर्यावरणात मोठया प्रमाणात प्रदूषण घडवून आणले आणि पर्यावरणामध्ये असंतुलन निर्माण केले.

पर्यावरणीय असंतुलनामुळे मानवी जीवनांवर आणि आर्थिक विकासावर विपरीत आणि नकारात्मक परिणाम होणे सुरु झाले म्हणून मानवाने निसर्गातील प्रदुषण कमी करणे, जैवविविधतेचे रक्षण करणे, तापमान कमी करणे इत्यादीमुळे पर्यावरणामध्ये संतुलन निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

पर्यावरण संतुलन स्थिर ठेवून स्वतः सोबतच निसर्गातील इतर घटकांचा वर्तमान आणि भविष्यात कायम विकास करण्यासाठी शाश्वत विकासाची आवश्यकता पटली असून शाश्वत विकासासाठी सर्व विश्वातील देश एकत्र आले त्यांनी निरनिराळया परिषदा, संमेलन याद्वारे पर्यावरणीय संतुलनातुन आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकास करणे आवश्यक आहे. यासाठी विविध प्रयत्न केले या प्रयत्नातून आर्थिक विकासाबरोबरच पर्यावरणामध्ये संतुलन निर्माण होईल करेल आणि मानव जातीसोबतच इतर घटकाचे रक्षण करेल यात काहीही शंका नाही.

**संदर्भ :-**

१) प्रा. के.व्ही. येळणे - पर्यावरण व शाश्वत विकास

२) महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे - शाश्वत विकास

Scanned by CamScanner

# पर्यावरण व शाश्वत (टिकाऊ) विकास

**शंकर विठाबोजी गोमासे,** शिक्षक,
मुकुंदराव स्वामी कनिष्ठ महाविद्यालय, नवेगाव (चिचघाट) नागपूर.

**प्रास्ताविक :-**

जागतिक स्तरावर सर्वप्रथम पर्यावरण आणि विकासास प्राधान्य आहे. पर्यावरण आणि विकास एकमेकास पुरक आहे. वास्तवात या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पर्यावरणीय दृष्ट्या भक्कम विकास संकल्पना सर्व देशाला लागु पडते. मानवाच्या पर्यावरणाचे रुपांतर करण्याच्या क्षमतेमुळे आर्थिक विकासाचे फायदे त्याला मिळू शकतात आणि जीवनमानाचे गुण संवर्धन करण्याची संधी प्राप्त होते. अन्यथा याच शक्तीचा दुरुपयोग केल्यास नैसर्गिक पर्यावरणाची अपरिमित हानी देखील होवू शकते आणि पर्यायाने मानवी जीवनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. कोणत्याही प्रकारचा उशीर न करता पर्यावरणीय समस्येची हाताळणी केली पाहिजे. नाहीतर मानव आणि त्याच्या पर्यावरणावर संकलीन आघात होईल प्रतिबंधात्मक उपायांना उशिर केल्यास अधिक समस्या उभ्या राहतील आणि अशा नुकसानीची भरपाई करणे कठीण होईल.

मानव नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणात जीवन जगत असतो. आर्थिक विकासासाठी साधन संपत्तीचा वापर अनिवार्य असतो. वाढती लोकसंख्या दारिद्रय निर्मुलन यासाठी आर्थिक विकासावर भर देणे क्रमप्राप्त ठरते. पर्यावरणाच्या नैसर्गिक व सामाजिक घटकावर औद्योगिक व तांत्रिक प्रगतीचा परिणाम (प्रभाव) पडल्याचे दिसून येते. औद्योगिक विकासामुळे पर्यावरणाची अवनती अनेक मार्गांनी होत असते. खाणकाम व्यवसायामुळे भूमीचे प्रदूषण व जलप्रदूषण होते आर्थिक विकासाची फळे वर्तमान पिढी बरोबरच भविष्य कालीन पिढयांना देखील मिळाली पाहिजे. यासाठी आर्थिक विकास व पर्यावरण यांच्याशी सामाजिक घटकामध्ये समन्वय साधने आवश्यक आहे.

**पर्यावरणाची व्याख्या :-**

"सजीवांच्या जीवन क्रमावर परिणाम करणारी भोवतालची परिस्थिती ज्यामध्ये जैविक अजैविक घटक व सर्व प्रकारची उर्जा यांचा समावेश होतो त्यालाच पर्यावरण असे म्हणतात"

पर्यावरणाशी संतुलन साधने मानवाच्या अत्यंत गरजेचे असते संतुलन न साधल्यास ते मानवी जीवनाला घातक ठरल्याशिवाय राहणार नाही. भविष्यकालीन शाश्वतेसाठी विकास आणि पर्यावरण यांच्या दरम्यान संतुलन साधन्याकरिता परिणामकारक आणि संयुक्तिक परिणामाच्या दिशेने आज म्हणजे २१ व्या शतकात वाटचाल करण्याची गरज आहे.

कोणत्याही देशाच्या अंतर्गत भागात घटनांचे नियंत्रण राखण्याच्या शक्तीस आजच्या जगात काहीच अर्थ नाही. प्रदुषण आंतरराष्ट्रीय व्यापार वित्तीय प्रवाह आणि निर्वासिता सारख्या घटना आंतरराष्ट्रीय सरहद्दी ओलांडतात या सर्व घटकांचा परिणाम पर्यावरणीय स्वरुप आंतरराष्ट्रीय करार आणि संरचनावर होतो.

पर्यावरणीय प्रदुषण मानवी जीवनाला घातक असतात. वाऱ्याचे प्रवाह पर्जन्य आणि मंदीप्रवाह यांच्या स्त्रोतापासून शेकडो नव्हे तर हजारो कि.मी. पर्यंत प्रदुषके वाहून आणली जातात व त्याचा विघातक असा परिणाम मानवी जीवनावर होत असतो.

**शाश्वत विकासाची वैशिष्टये :-**

१) शाश्वत विकासाकडे नेणाऱ्या जीवन प्रणालीला पाठिंबा देणे

२) नागरीकरण व औद्योगिकरणामुळे होणाऱ्या आव्हानांची परिपूर्ती करणे

३) शाश्वत विकास साध्य करण्यासाठी आवश्यक ती क्षमता निर्माण करणे

४) शाश्वत विकासाच्या आव्हानाचे जागतिकीकरण करणे.

सन १९८५ साली हा विकास पर्यावरण व वने या नविन मंत्रालयाचा एक भाग बनला. भारत सरकारने यासाठी स्वातंत्र मंत्रालय विभाग सुरु केला हा मंत्रालय विभाग म्हणजे

Scanned by CamScanner

पर्यावरण व वनसंपदा विषयक उपक्रम / कार्यक्रम त्यांचे नियोजन, संवर्धन इ.चा सर्वोच्च विभाग म्हणून कार्यरत झाला.

शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भविष्यकालीन पिढयांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या सामर्थ्याने तडजोडीशिवाय वर्तमानकालिन गरजांची पुर्तता करणे होय.

आर्थिक विकासासाठी साधन संपत्तीचा वापर अनिवार्य असतो परंतु साधन संपत्तीचा डोळसपणे वापर महत्वाचा असतो. शाश्वत विकास संकल्पीत देखील साधन संपत्तीचा वापरावर पूर्णपणे निर्बंध असा अर्थ अपेक्षित नाही. तर नैसर्गीक साधन संपत्तीचा हा पर्यावरणाचा वापर अधिक कार्यक्षमतेने करणे की जीचा आधार घेवून दिर्घकालीन रकम मिळवीता येईल.

नैसर्गिक साधन संपत्ती व पर्यावरणाचा वापर वर्तमानकालीन पिढीचा जीवनस्तर उंचावण्याबरोबर भविष्यकालीन पिढयांचे गुणात्मक जीवनमान खालावले जाणार नाही असे असते.

पर्यावरणाच्या अंतर्गत वर्तमान कालीन आणि भविष्य कालीन आर्थिक विकासाचा वेळ यामध्ये समन्वय साधला जातो.

नैसर्गिक व तांत्रिक प्रगतीमुळे हवापाणी, ध्वनी मृदा अन्न इ. मधीलप्रदुषण वाढले आहे. साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर होत आहे. याच पध्दतीने विकासाची प्रक्रिया सुरु राहीली तर आपणास लवकरच विनाशाच्या दिवसाला तोंड द्यावे लागेल. यासाठी सामाजिक घटकांचा विकास आणि पर्यावरण प्रक्रियाशी समन्वय साधने आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

# पर्यावरण व शाश्वत (टिकाऊ) विकास

प्रा.डी.पी.बोरकर,
ग्रामदर्शन कनिष्ठ महाविद्यालय, खडसंगी, ता.चिमूर.

जगातील प्रत्येक देश स्वतःच्या देशाच्या विकासाच्या प्रयत्नात आहेत. त्यानुसार काही देश विकसीत तर विकसनशील आहेत तर काही देश अजूनही अविकसीत आहेत. औद्योगिक क्रांतीची सुरुवात होईपर्यंत निसर्गाद्वारे मानवी विकासाची गती व दिशा ठरविली जात असते असा मानवाचा समज होता. प्रौर्वात्य तत्वज्ञानात निसर्ग हा देवाचे रुप म्हणून ओळखला गेला. त्यामुळे त्याचे रक्षण करणे हे मानसाचे अती पवित्र कर्तव्य मानले जात असे. निसर्गाचे अस्तीत्व कायम राखण्यासाठी आवश्यक ती मर्यादा ओलांडून त्यात मानवाकडून हस्तक्षेप केला जाणार नाही असा मानसाचा संबंध निसर्ग व त्याच्या घटकांशी विकसीत करण्यात आला होता. मानव जरी निसर्ग पुजक असला तरी वाढती लोकसंख्या त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या व नैसर्गीक घटकांचा वाढता वापर यामुळे मानवाच्या काही भुमिका मात्र पर्यावरणाचा विनाश करणाऱ्या ठरल्या व पर्यावरण विषयीचे संतुलन राखून ठेवण्याची गरज निर्माण झाली.

**पर्यावरणाची व्याख्या :-**

"एखाद्या जीवाच्या आसमंतात असलेले सर्व काही म्हणजे पर्यावरण"

"जीवाच्या जीवनपध्दतीवर परीणाम करणारी बाह्यकारी परिस्थिती, घटक, वस्तू, प्रक्रिया व शक्ती यांचे एकत्रीकरण म्हणजे पर्यावरण होय."

**पर्यावरण संतुलन :-**

पर्यावरण हे जैविक व अजैवीक घटकांचे बनलेले असते. पर्यावरणाच्या जैविक घटकामध्ये प्राणी व वनस्पती याचा संबंध असतो. तर अजैवीक घटकांमध्ये मृदा व हवामान तसेच भुशास्त्रीय घटकाचा अंतर्भाव होतो.

जैविक घटकातील प्रमाणावर व अजैविक घटकातील प्रमाणावर जे प्रतिकूल परिणाम करणारे घटक आहेत. अशा घटकांचे प्रतिकूल परिणाम होण्यापासून परावृत्त करण्यासाठी जे प्रयत्न केले जाऊन, त्या घटकामध्ये संतुलन राखल्या जाते. त्याला पर्यावरण संतुलन म्हटले जाते.

**पर्यावरणाची गजर :-**

२१ व्या शतकात वाढते आधूनिकीकरणाचे इतके प्रतिकूल परिणाम निर्माण झाले आहे ते म्हणजे वाढते प्रदूषण.

"प्रदूषण म्हणजे आरोग्यास घातक ठरणारी हवा, पाणी, मृदा व अन्न यातील बदल जो मानसाच्या वा इतर जीवांच्या हालचालीवर किंवा जीवंत राहण्याच्या क्षमतेवर अनिष्ठ परिणाम करतो. त्याला प्रदूषण असे म्हणतात.

प्रदुषणाचे धोके व पर्यावरणाचा असमतोलही कोणत्या एका देशाची समस्या राहिलेली नाही. हे प्रदुषणाचे धोके सर्व जगात निर्माण झाले आहेत व हयाची जाणीव प्रत्येक देशाला झाली आहे. त्यासाठी जागतीक पातळीवर प्रयत्न केले जातात. विकसीत देशात सुध्दा हया समस्या सुटलेल्या नाहीत. पर्यावरण निर्मितीसाठी पाश्चिमात्य राष्ट्रांनी पुढाकार घेतलेला आहे आशिया खंडातील अनेक राष्ट्रे प्रयत्नशील आहेत व जगात पर्यावरणाच्या संतुलनासाठी अनेक सामुदायिक दिवस पाळले जातात.

**जागतीक पानथळ जागा दिन (२ फेब्रुवारी)**

पानथळ जागेविषयी जागृती निर्माण करणे व पानथळ जागेच्या योग्य वापर व व्यवस्थापन याची गरज प्रतिपादन करणे. यासाठी हा दिवस उपयोगात आणता येईल.

**जागतीक वन दिन (२१ मार्च)**

झपाट्याने नाहिशी होणारी जंगले व त्याचे आपल्या जीवनातील महत्व. या विषयी लोकजागृती करण्यासाठी हा दिवस उपयोगात आणता येईल.

**जागतीक आरोग्य दिन (७ एप्रिल)**

पर्यावरणाशी संबंधीत आजार व त्यांचा फैलाव यांच्याशी संबंधीत विषयावर चर्चा करण्यासाठी या दिवसाचे महत्व आहे.

Scanned by CamScanner

**जागतीक वारसा दिन (१८ एप्रिल)**

स्थानीक किल्ला किंवा राष्ट्रीय स्मारकाला भेट देवून त्याचे महत्व समजावून घेणे व त्याच्या रक्षणासाठी लोकमत तयार करणे यासाठी हा दिवस वापरता येतो.

**जागतीक वसुंधरा दिन (२२ एप्रिल)**

हा दिवस प्रथम १९७० मध्ये मानवामध्ये निर्माण होणाऱ्या वाढत्या पर्यावरणीय समस्याकडे लक्ष वेधण्यासाठी अमेरीकेतील लोकांच्या गटातर्फे साजरा करण्यात आला. हा दिवस पदयात्रा, स्वच्छता, मोहिमा, व्याख्याने इत्यादीद्वारे साजरा करता येईल.

**जागतीक लोकसंख्या दिन (११ जुलै)**

वाढती लोकसंख्या व घटती नैसर्गीक साधन संपत्ती यामधीलघनिष्ठ संबंधावर प्रकाश टाकण्यासाठी या दिवसाचा उपयोग करता येईल.

**हिरोशिमा दिन (६ ऑगस्ट)**

मानवनिर्मित पर्यावरणीय दुर्घटनांची चर्चा करण्यासाठी हिरोशिमा दिनाचा उपयोग करता येईल

**जागतिक ओझोन दिन (१६ सप्टेंबर)**

संयुक्त राष्ट्रसंघाने हा दिवस आंतरराष्ट्रीय ओझोन स्तर संरक्षणासाठी "जागतिक ओझोन दिन" म्हणून घोषित केला. ओझोनच्या ऱ्हासाची विविध कारणे व धोका कमी करण्यासाठी संभाव्य उपाय याविषयी प्रदर्शन या दिवशी भरविल्या जाऊ लागले.

**हरित ग्राहक दिन (२८ सप्टेंबर)**

हरित उत्पादनाविषयी ग्राहकांच्या मनात जागृती निर्माण करण्यासाठी हा हरित ग्राहक दिन उपयोगात आणता येईल.

**वन्यजीव सप्ताह :- (१ ते ७ आक्टोबर)**

वन्य प्राणी सप्ताहात आपल्याकडील विविध प्रजातीचे व संकटात असणाऱ्या परिसंस्थाचे संवर्धन करण्या विषयीच्या चर्चासत्राचा समावेश असू शकतो. वनखात्यातर्फे या सप्ताहात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येवून लोकांना सहभागी करुन घेण्यात येते.

**जागतिक पर्यावरण दिन (५ जून)**

शाळा व महाविद्यालयामध्ये विविध पर्यावरणीय उपक्रमाचे प्रदर्शन पालकांसाठी व समाजातील इतर घटकांसाठी भरवून हे दिवस साजरे करता येतात. या सर्व जागतीकदिनी पर्यावरणाच्या असमतोलाचे धोके लोकांना पटवून देवून पर्यावरणाचे महत्व जगातील प्रत्येक नागरीकांना पटले पाहीजे. यासाठी प्रयत्न केले जायला पाहिजे.

विकास प्रतिमानाच्या आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय बाजू आहेत. उदा. प्रदूषण करणारा एखादा उद्योग पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी बंद करावा असे कोणी म्हणेल परंतु यामुळे तेथील कामगारांची रोजीरोटी काढून घेतली जाईल. लाकूड उत्पादनाच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी एखादे जंगल वनतोडीसाठी देता येईल. परंतू लाकुडतोड झाल्याने वने व त्यातील जैववैविधता नष्ट केली जाईल. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये म्हणून जाहिर झालेल्या वनविभागात तेथील मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी आवश्यक ते कायदे करण्यात आले आहेत. परंतु अशा वनामध्ये राहणारे आदिवासी पिढयानपिढया या वनावर अवलंबून आहेत.

यावरुन आपल्याला असे लक्षात येते की, विकासाचा संबंध मानवाशी आणि पर्यावरणांशी तसेच आर्थीक व सामाजीक घटकाशी जोडला आहे. आर्थिक, सामाजीक व पर्यावरणीय गरजा लक्षात घेवून बनविलेले विकासाचे एखादे परिपूर्ण प्रतिमान खालील घटकावर आधारीत असावे. दरडोई उत्पन्नातील प्रत्यक्ष वाढ समाधानकारक जीवनाच्या संधी, आहार व आरोग्य स्थीतीमध्ये सुधारणा, शैक्षणिक दर्जामध्ये सुधारणा, साधन संपत्तीचा उपयोग करण्याची संधी, संपत्तीचे समान वाटप, मुलभूत मानवी हक्काची हमी व निसर्ग व नैसर्गीक साधन संपत्तीचे संवर्धन तरच पर्यावरण विकास याचे संतूलन राखले जाईल.

**दिर्घकालीन परंतू सातत्याने होणारा बदल**

पर्यावरण संवर्धनासंबंधात दिर्घकालीन उपाययोजना करावयाच्या असल्याने विकास करित असतांना सातत्याने बदल व्हायलाच पाहिजे. परंतु तो अल्पकालीन नसावा. कारण अल्पकाळात कितीही विकास झालेला दिसला तरी टिकाऊ स्वरुपाचा नसतो आणि म्हणून विकास प्रक्रिया ही दिर्घकालीन स्वरुपाची असावी कि जेणे करुन देशाची प्रगती स्थीर राहिल आणि त्यासाठी पर्यावरण संवर्धनाची गरज आहे. कारण

Scanned by CamScanner

अल्पकालीन विकास प्रदुषणाला फाटा फोडतात म्हणून जनसमुदायांना अशा प्रयत्नात सहभागी करुन घ्यावे. जसे वने किंवा अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यांवर दिर्घकालीन उपाययोजना करता येईल. अशा समुहांच्या भौतीक, सांस्कृतीक किंवा आध्यात्मीक जीवनात त्या भागातील जैवविविधता, वन्यजीवन व इतर नैसर्गीक साधनसंपत्ती याबद्दलची माहिती करुन घ्यावी.

शाश्वत विकास

बॅटलँड आयोगाने शाश्वत विकासाची व्याख्या केली आहे. ती म्हणजे. "शाश्वत विकास म्हणजे भावी पिढ्यांची. त्यांच्या गरजा भागविण्याची क्षमता कायम ठेवून वर्तमानातील आपल्या गरजा भागविणे होय."

शाश्वत बिकासाबद्दल आपल्याला एवढे म्हणता येईल की, आपण जे काही वर्तमानकाळात विकासासाठी करतो आहोत. ते करत असतांना भविष्यात अशा घटकांचा तुटवडा निर्माण होवून त्याचे भावी पिढीला दुष्परीणाम भोगावे लागतील. असे करु नये. जेवढे आपण काढतो व वापरतो. ते भविष्यातही कसे टिकून राहिल याचे प्रयत्न वर्तमानकाळातील मानवाने करायला पाहिजे. तरच शाश्वत विकास म्हणता येईल. शाश्वत पध्दतीने जगण्यासाठी आपल्याला निसर्ग कशा तऱ्हेने कार्य करतो व स्वतःला शाश्वतपणे संतुलीत ठेवू शकतो हे समजाउन घेतले पाहिजे. या ज्ञानाचा वापर करुन आपण आपल्या कृतिची दिशा ठरविली पाहिजे.

शाश्वत विकासाची संकल्पना ही बँकेत ठेवलेल्या सुरक्षा ठेवीशी मिळती जुळती आहे. आपण जोपर्यंत या ठेवीवरचे व्याज वापरतो. तो पर्यंत मुद्दल सुरक्षीत असते. मुद्दलकाढले जाईल त्याच क्षणी सर्व काही संपेल.

स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी व वने या नैसर्गीक स्त्रोतांसह असलेली पृथ्वी ही आपली मुद्दल आहे. हे स्त्रोत शाश्वतपणे वापरले, तर पृथ्वी सुरक्षीत राहिल. मात्र या स्त्रोताचा अनिर्बंध व बारेमाप वापर केला तर आपले मुद्दल घटेल. पर्यावरण हि सर्वांमध्ये विभागुन घेण्याची बाब आहे आणि म्हणुन प्रत्येक राष्ट्रांनी सामुहिक कृतितून प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करायला पाहिजेत. सामुदायिक पातळीवर स्थानीक समस्यांची दखलघेवून त्या सोडविण्यासाठी सामुहीक कृती करावी. तर वैयक्तिक पातळीवरही त्या सोडविण्याचे प्रयत्न व्हायला पाहिजेत.

शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत जनतेचा उत्तम सक्रीय सहभाग मिळविण्यासाठी पर्यावरणीय माहिती हा महत्वाचा घटक आहे. राज्य सरकारने तयार केलेले अहवाल तसेच स्थानिक पर्यावरण अहवाल यामुळे पर्यावरणाच्या दर्जाबद्दल प्राथमिक माहिती मिळते असे अभ्यास पर्यावरणीय बदलांचा मागोवा घेण्यास उपयुक्त ठरतात.

जागरुक व्यक्ती आणि समान पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या व्यक्तीविरुध्द अनेक प्रकारची कार्यवाही करु शकतात. कुठल्याही प्रकारचा पर्यावरणीय गुन्हा कायदेभंग संबंधीत अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिला पाहिजे. सामान्य नागरीकसुध्दा उच्च सर्वोच्च न्यायालयाकडे जनहित याचीका दाखल करु शकतात.

भारतात अनेक पर्यावरणीय लढे झाले आहेत. त्यापैकी काही लढे जिंकले गेले तर काहीमध्ये हार पत्कारावी लागली. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे "सायलेंट व्हॅली धरण" (जलसिंचन प्रकल्प) सायलेंट व्हॅली ही एक अशी जंगल परिसंस्था असुन तिथे विपूल जैववैविध्य आहे. हा प्रकल्प १९७० साली थांबविण्यात आला व १९८४ साली त्याला राष्ट्रीय उद्यान म्हणुन घोषीत केले आहे. अनेक कार्यतत्पर व्यक्ती, गट व संस्थांनी एकत्र येवून या परीसंस्थाला जलसमाधी न मिळाण्यासाठी अथक परिश्रम केल्यामुळेच हे शक्य झाले आणि म्हणुनच मागरिट मिड म्हणतात. "विचारी व वचनबध्द नागरिकांचा छोटासाच गट, जग बदलू शकतो. याविषयी शंका घेवू नका, आजवर हिच गोष्ट घडत आली आहे."

**नैसर्गीक उत्पादनाची साधने व मानवी उत्पादनाची साधने यांचे संतुलन**

पुरातन काळापासून निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी हेतुपुर्वक काही चालीरिती व रुढींची परंपरा मानवाने निर्माण केली आहे. त्यानुसार का होईना नैसर्गीक साधनांचे संरक्षण होतांना आपण पाहतो. जेवढी नैसर्गीक साधने आपण वापरतो व ती नष्ट होतात. त्या नैसर्गीक साधनामुळे आपले उत्पादन होते. त्या उत्पादनाचा काही हिस्सा नैसर्गीक साधनांच्या विकासास खर्च केला जायला पाहिजे. उदा. वने लावणे, वृक्षारोपण करणे, प्राण्यांचे संरक्षण करणे. जलसंपत्तीचे स्त्रोत तयार करणे, तरच आपल्याला यामध्ये संतुलन राखल्या

Scanned by CamScanner

जावून भविष्यातील पर्यावरण असंतुलनाचे धोके टाळता येईल. अन्यथा भविष्यात खूप मोठया संकटाचा सामना करावा लागेल व आपल्या भावी पिढीला याचे फार मोठे परिणाम भोगावे लागतील.

निसर्गाने आपल्याला खुप काही दिले आहे. त्यामुळे निसर्गाला आपण कितीही देण्याचा प्रयत्न केला तरी त्या मानाने तो अपुराच ठरेल. नैसर्गीक साधनांचा आधार घेतल्याशिवाय मानवाला काहीही करता येत नाही परंतु मानव या निसर्गाचा वापर अशा पध्दतीने करु लागला की, नैसर्गीक स्त्रोतावर त्याचा परिणाम होऊ लागला. हा परिणाम कमी करण्यासाठी बदलाची गरज आहे. आणि म्हणुन विकासाचे स्वरुप असे असले पाहिजे कि सध्याच्या व भविष्यातील पिढयांना चांगल्या दर्जाचे आयुष्य जगता येईल. त्यासाठी पर्यावरणाचे महत्व लोकांना पटवून देता येईल. यासाठी [illegible] काही उपाय असतील ते उपाय करणे अतिशय महत्वाचे आहे. हयामध्ये फक्त विद्यार्थी किंवा फक्त शिक्षक म्हणजे शालेय शिक्षणातच हे मर्यादित न ठेवता शालेय माध्यमातून समाज गावागावामध्ये पर्यावरण उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला याचे महत्व कळणे आवश्यक आहे. शिक्षण मंडळाकडून वर्ग ११ वी १२ वी ला पर्यावरण विषय आणून योग्य दिशेने पाऊल उचलले आहे. परंतु याचे योग्यप्रकारे धडे, प्रोजेक्ट बनविणे, प्रॅक्टीकल स्वरुपात विद्यार्थ्यांकडून करुन घेतले व विद्यार्थ्यांनी पर्यावरणीय विषयाच्या संदर्भात आपुलकी दाखविली तर खरोखरच या भावी पिढीला पर्यावरणाचे महत्व कळले तर भविष्यकाळ सुखाचा व समृध्दीचा नक्कीच होईल.

धन्यवाद

Scanned by CamScanner




प्रा. अशोक भांडेकर
श्री शिवाजी महाविद्यालय
राजूरा, जि.चंद्रपुर
मो. ९६५७०४८१३१


# पर्यावरण व शाश्वत विकास

## प्रस्तावना :-

पृथ्वीवरील नैसर्गीक पाणी या घटकामुळे सजीवाचे अस्तीत्व निर्माण होवून त्याचा विकास झाला. सजीवामध्ये मानव हा सर्वश्रेष्ठ बुध्दीमान प्राणी असून त्यांच्याकडे वेगवेगळया भावनाच्या अविष्काराची शक्ती, कुशल, बुध्दीमता, कल्पना निर्णयक्षमता आणि संशोधन करण्या इतपत शिक्षणाच्या माध्यमातून कलागुण विकसीत केलेले आहे. भौतिक सुखाच्या आहारी जाऊन निसर्गाच्या मूळ व्यवस्थेत बदल केलेला आहे आणि नैसर्गिक घटकांचा अवीचारी आणि अमर्यादीत वापर सुरु केला व सुख, समृध्दी, विकास आणि प्रगती यासाठी प्रदुषण, बनतोड, कारखानदारी भूगर्भातील कोळसा, सिमेंट, लोखंड यासाठी करुन पर्यावरणाचा समतोल बिघडण्यात माणसाची दिशाहीन वृत्ती जबाबदार आहे हे मानायला पाहीजे. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, झोपडपट्टीची वृध्दी, कारखाने, धरणे, रस्ते व लोहमार्ग विकास यामुळे मानवापूढे अनेक समस्या उभ्या राहील्या असून हया समस्या सोडवण्याचे कार्यही मानवालाच करावे लागणार आहेत. कोणतेही अल्पकालीन फायदे पदरात पाडून घेण्यापेक्षा दिर्घकालीन फायदे महत्वाचे मानून पर्यावरणाचे रक्षण करणे ही सर्वाचीच जबाबदारी आहे.

### १) सजीव निर्जीव घटकामधील पर्यावरण संबंध :-

भुपृष्टावरील वेगवेगळया भागामध्ये उपलब्ध असणारी सर्व सजीवाच्या भोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण मूळ **ENVIRON** या फ्रेंच शब्दापासून **ENVIRONMENT** हा शब्द बनला. सभोवतालच्या परिस्थितीत सजीवाबरोबर निर्जीव घटक, तसेच निसर्ग निर्मित व मानव निर्मित घटक समाविष्ट असून या सर्व घटकाचे मिळूनच पर्यावरण बनले आहे. पर्यावरणाची माहिती व त्याचा अभ्यास व संशोधन हे स्थळ कालसापेक्ष वेगवेगळे असून पर्यावरणाची पृथ्वीवरीलस्थिती सर्वत्र सारखी आढळत नाही.

पर्यावरण हा वेगळा विषय नाही तर तो विज्ञान आणि समाजशास्त्र अशा अनेक विषयाच्या एकत्रीकरणातून तयार झालेला विषय असून या विषयाचा व्याप प्रचंड असल्याने बहुतेक ज्ञानशाखा हया विषयाशी जुळून आहेत. पृथ्वी वरील मानवाला व त्याच्या जगण्याला निसर्ग सौंदर्यामुळे अर्थ प्राप्त झाला असून निसर्गाचे सौदर्य सर्व सजीव व निर्जिव घटकाच्या एकत्रीकरणातून साकारले आहे. निसर्गाची भव्यता, सागराची शक्ती, वनाचे सौदर्य पृथ्वीगर्भातील खनीजांचा मुबलक पुरवठा प्राणी वनस्पतीच्या वैविध्यतेतून अनेक तत्वप्रणाली अस्तीत्वात आल्या असून या सौदर्यनुभूतीवरुन अनेक कलाकार, चित्रकारांनी स्फूर्ती घेवून कला निर्माण केली तर लेखक कवीनी मानवी जीवनातील सुख शांतीसाठी मानवी मनाच्या गाभाऱ्यात संगीत, कला आणि कृती पोहचविल्या आहेत. निसर्गाची संम्यक अनुभूती हा अवर्णिय रंजनात्मक अनुभवाने इको टुरीझम तसेच अडव्हेचर टुरीझम अथवा साहस पर्यटनाचा समावेश होतो. "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे पक्षी हे सुस्वरे आळवीती" तुकारामाच्या अभंगात आजपासून ३५० वर्षापूर्वी पासून निसर्गाच्या सौंदर्याचा मानवी मनावर ताबा मिळविलेला दिसतो आणि निसर्गावरचे प्रेम मानवासाठी किती आवश्यक आहे हे सांगीतले आहे. पृथ्वीच्या निर्मिती पासून मानवाने ज्या अवस्थेतून आपले जीवनक्रम चालवलेले आहे आणि ज्या परिस्थीतीत तो जगतो त्या प्राकृतीक नैसर्गीक परिस्थितीलाच पर्यावरण म्हणता येईल.

### २) नैसर्गीक साधन संपत्तीच्या वापरासाठी शास्त्रीय नियोजनाची गरज :-

पृथ्वीच्या वेगवेगळया भागात वनस्पती प्राणी जीवन हवामान यावर त्या त्या भागातील जीवन प्रणाली अवलंबून असते, त्याचबरोबर मानवी सामाजिक जीवन प्रणालीवर त्या भागातील वनस्पती, हवामान, पाऊस व भौगोलिक स्थिती इत्यादीचा परीणाम होतो. भारत हा मोसमी हवामानाच्या प्रदेशात असल्याने शेती हा व्यवसाय प्रमुख व्यवसाय बनला तर अमेरीकेतील संयुक्त संस्थानामध्ये उद्योगाची वाढ मोठया

Scanned by CamScanner

प्रमाणात झालेली आहे. एक्सीमो लोक थंडया हवामानात जगतात. विषवृतीय प्रदेशात लोकांना उष्ण दमट हवामानाची सवय झालेली दिसते. याचा परिणाम लोक संख्या वाढ झाल्याचे दिसते. आंध्र प्रदेशातील कर्नूल जिल्हयात कोकाकोला कंपनी धरणा लगतच्या भागात ६० बोअरवेल पाण्यासाठी मारल्याने, ५० किलोमीटर परिसरात पाण्याची पातळी खोली गेल्याने कृषी, पिण्याचे पाणी, यासारख्या गोष्टींना मुकावे लागलेले दिसते, तर चंद्रपूर जिल्हयात कोळश्याच्या उत्खननाने उष्णतामानात सातत्याने वाढ झालेली दिसते. शहरीकरणाच्या प्रभावाने रेतीचा उपसा होत असून समृध्द वने वृक्ष तोडीने नष्ट होतांना दिसतात. पर्जन्यमानातील अनीयमीतता अधिक वाढत आहे. वाढत्या शहरी करणामुळे सिमेंटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत असून शहरी भागात पूरसदृष्य परिस्थितीने मानवी जीवनाचे हाल गुराढोराच्या गोठ्या सारखे झाले असून अनेक कुटूंबाचे जीवन मरण संपन्न बनलेले आपणास पाहावयास मिळते.

मुख्यतः निसर्गामध्येही विषमता आहे. ही विषमता पर्यावरणाने निर्माण केली आहे. मात्र बदललेली मानवी जीवनशैली तेवढीच जबाबदार आहे. यात कुठलीही शंका नाही. मानवी लोकसंख्येच्या मुलभूत गरजा पर्यावरणातून फलदृप होतात तसे मानवाला सुख समृध्दीसाठी अनूकूल आहेतच परंतु काही विशिष्ट घटकाचा मानवाकडून अतिरिक्त उपयोग झाल्याने पर्यावरणाचे संतुलन नष्ट होत आहेत. बिघडलेल्या संतुलनाचे पर्यावरण प्रदुषनासारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याचबरोबर मानवी लोकसंख्या समस्यांच्या जाळात लटकलेली दिसते व ती वाढत्या स्वरुपाची आहे.

लोकसंख्या वाढीवर वेळीच नियंत्रण मिळवले नाही तर या वाढीस आरोग्य वंश जतनक्षमता हे जैवीक घटक तर लिंगरचना, वयोमर्यादा वैवाहीक काळ, स्त्रीयांचा आर्थिक सहभाग हे लोकसंख्येचे शास्त्रीय घटक त्याचबरोबर समाज रुढी, परंपरा, साक्षरता, वंश दिप, कुलदिप भावना, स्त्रीचा दर्जा, आरोग्य सेवा हे सामाजिक घटक तसेच शासकिय ध्येय धोरणे, हवामान मृत्युप्रमाण, कुटूंब नियोजन इत्यादी घटक जबाबदार असल्याने वरील सर्व घटकांमध्ये नियोजन होणे गरजेचे आहे. त्याशिवाय मानवी कल्यानात वाढ करणे शक्य नाही.

जगातील लोकसंख्या प्रतीवर्षी १० लक्ष एवढया प्रचंड वेगाने वाढत असून त्यापैकी ३३ टक्के वाढही प्रगतीस देशात आहे. २०१५ पर्यंत ही वाढ१० अब्ज ४५ लाख एवढी असेल.

त्यासाठी नैसर्गीक साधनाचा वापर वर्तमान सुखा एवढाच भावी पिढीच्या सुखासाठी महत्वाचा मानून विकास साध्य केल्यास सर्व मानव समुहाचे संवर्धन व साधन संपत्तीचा न्याय वाटप होईल,

**३) जीव विविधतेला असलेला धोका -**

**जगातील वन्य प्राण्यांचे धोक्यात असलेले अस्तित्व :-**

प्राचीन काळापासून मनूष्य आपल्या भौतिक सुखासाठी वनामधून सरपन, शेतीसाठी, कृषी अवजारासाठी लाकूड, घरबांधणी आणि कुटीर उद्योगातून निर्माण होणारे साहित्य वनाच्या माध्यमातून मिळवीत आलेला असून २१ साव्या शतकात घराची रचना आधुनिक सुख सोई पाहून केल्याने उपजात लाकडाची मागणी वाढली. वसाहती निर्माण झाल्या त्यामुळे जंगलाची तोड मोठ्या प्रमाणात झालेली दिसते. तसेच वनातील अनेक दुर्मीळ वृक्ष व त्याच्या प्रजाती नष्ट झाल्यात वन्य जीवाचे अस्तित्व धोक्यात आलेले असून अनेक प्रजाती पक्षाच्या नष्ट होत आहेत. जगभरात अस्तित्वात असलेल्या जीव प्रजातीनी समृध्द असलेले प्रदेश, सदा हिरवीगार वने, प्रवाळ द्विपे यांचा होत असलेला नाश जीव जिवीकेला धोका आहे.

शास्त्रज्ञांच्या मतानुसार इ.स. २०१० पर्यंत १० दशलक्ष जीव प्रजाती पृथ्वीवरुन नष्ट होतील. सद्या १.८ दशलक्ष जाती प्रजाती अस्तित्वात आहेत. मात्र प्रत्यक्षात या प्रजाती १० पट अधिक असल्याचा अंदाज वर्तवण्यास आलेला आहे. सजीव प्रजाती पैकी २५ टक्के प्राणी, वनस्पती नष्ट होण्याची संभावना आहे. यासाठी काही संस्था पर्यावरण प्रेमी पुढे येवून कार्य करतांना दिसतात. विदर्भातील चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अभयारण्य जंगल वाचविण्यासाठी अदानी ग्रुपला पळवून लावलेले आहेत. अमरावती जिल्हयातील पॉवर प्लॅन्टला लोकांनी केलेला विरोध सर्वश्रुत आहे. विकास पाहिजे परंतु पर्यावरणाचे समतोल राखून वाढत्या कारखानदारीने पर्यावरणाचे अस्तित्व धोक्यात आणले आहे. पाश्चीमात्य युरोपीय राष्ट्रामध्ये प्रदुषणाचे प्रमाण अधिक असून सद्या पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत असल्याने पर्यावरण असमतोलता निर्माण झाली आहे.

मानवाच्या बौध्दीक प्रगतीमुळे यांत्रिकीकरण व औद्योगिक विकासाला चालना मिळाली. राष्ट्रहीत व मानवी विकासामुळे पर्यावरणाकडे डोळे झाक करण्यात आले आहे. उद्योगासाठीच्या कच्चा मालाचे अतिशोषन वृक्षतोड

Scanned by CamScanner

कारखान्यातील निघणारे दुषित रासायनिक पदार्थ, कृषीसाठी वापरण्यात येणारे औषधी रासायनिक द्रव्य, कचरा, सांडपाणी, आन्विक कचरा इत्यादीच्या बेशिस्त वापराने पर्यावरण प्रदुषित होत आहे. याचे दुष्परिणाम जगालाच भोगावे लागत असल्याने जागतिक स्तरावर जनजागृती होत आहे आणि शाश्वत विकासासाठी पर्यावरण हे विचार पसरायला लागले आहे. म्हणून पर्यावरण रक्षणासाठी जनजागृती महत्वाची आहे.

**४) हवामान बदलपृथ्वीच्या तापमानात वाढ :-**

पृथ्वीवरील अनेक प्रदेशाचे तापमान वाढत असून मागीलदोन वर्षात ०.२ ते ०.६ अंशानी वाढले असून १९९० च्या दशकात सर्वाधिक तापमानाची नोंद केल्या गेली आणि १९९८ हे पृथ्वीच्या पर्यावरणीय इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष म्हणून गणले गेले. पर्यावरणातील बदलाचा अभ्यास पृथ्वीवरील वाढती लोकसंख्या आणि उर्जेचा वापर याच्या आकडेवारी वाढीवरुन केला जातो. पर्यावरण विषयक आंतर राष्ट्रीय परिषदेद्वारे (IPCC) शतकातील वातावरण बदलाचा आढावा घेतला आहे. त्याच्या निष्कर्षाप्रमाणे गेल्या काही वर्षात १.४ ते ५.८ सेंटीग्रेड एवढे उष्णतामान वाढल्याची शक्यता वर्तविलेली आहे. त्यामुळेच पूर, दुष्काळ, पाणी टंचाई या सारख्या समस्यांना सतत तोंड द्यावे लागणार आहे.

जगातील तापमान वाढीसाठी हरितगृह परिणामामुळे कार्बनडाय ऑक्साईड, पाण्याची वाफ, मिथेन नायट्रेट, ऑक्साईड, ओझेन, क्लोरोफ्ल्युरो कार्बन यांचे परिणाम सातत्याने वाढत आहे. त्याचा परिणाम तापमानात वाढ, वनस्पतीचे प्रजातीक संतुलन बिघडणे, पूराचा धोका, मानवी आरोग्य सुक्ष्म जीवाच्या संख्येत बदल, बर्फाचे पाण्यात रुपांतरण, अती उष्णतामान, पृथ्वीऐवजी समुद्रात पाऊस इत्यादी परिणाम सातत्याने होत आहेत. ओझोन वायु क्षयामुळे ५ ते २० टक्के किंवा जास्त अल्ट्राव्हायलो किरणाने ४० वर्षापर्यंत तापमान वृध्दी संभवू शकते. त्याचबरोबर वातावरणातील हायड्रोजन पेराक्साईड वाढून आम्लपर्जन्याचा धोका अधिक असणार सातत्याने रासायनिक क्रियेतील बदलाने शहरात धुर आणि धुके निर्माण होतील. कॅन्सर, क्षय, दम्याचे विकार, फुस्फुसाचे विकार, एडस रोगाचा प्रसार इत्यादी परिणामे वाढण्याची शक्यता अधिक असणार आहे.

१९४२ मध्ये जगात पहिला अणूस्फोट करण्यात आला. त्याचवेळी युरेनियमचा उपयोग स्फोटक व विद्युत निर्मितीसाठी होऊ शकतो हे जगाला माहित झाले. १ किलोग्राम युरेनियमच्या ऑक्साईट पासून जेवढी उष्णता मिळते तेवढी उष्णता १६ मेट्रीक टन कोळशापासून मिळते युरेनियम हे अणुउर्जेचे इंधन म्हणून वापरण्यात येते. परंतु ज्यावेळी अणूभट्टीत अपघात होतात तेव्हा प्रचंड उष्णतेपासून मोठया प्रमाणात हानी होत असते. कॅनडामध्ये इ.स. १९५२ मध्ये चॉफ रिव्हर प्रकल्पात अपघात झाल्याने १० लाख गॅलन पाण्याला किरणोत्सर्ग झाला. त्याचबरोबर चर्नोबिल रशिया इ.स.. १९८६ मध्ये प्रचंड अपघात घडल्याने स्विडन, नॉर्वे डेन्मार्क मध्ये हवेचे किरणोत्सर्गाने लोकांना बाधा झाली. इ.स. १९७९ मध्ये अमेरिकेतील पेनिसिल्व्हॉलिया राज्यात थ्रिमाईल्य ऑयलंड मध्ये अपघात घडले, तर जापानमध्ये १९८१ आणि १९९९ मध्ये अपघात झाला. भारतात इ.स. १९८६ मध्ये तारापूर अणुभट्टीत अपघात होवून किरणोत्सर्ग झाला. भारतामध्ये भोपाळमध्ये १९८४ मध्ये वायुदुर्घटना घडल्याने हजारो लोक मृत्यु पावलेले आहेत. किरणोत्सर्गामुळे हृदयविकार, डोळयाचे मोतीबिंदू, कातडीचे आजार होतात हे स्पष्ट आहे.

**५) टाकाऊ पदार्थ आणि त्याची उपयुक्तता :-**

औद्योगिक व कृषी क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात टाकाऊ पदार्थाची निर्मिती होत असून त्याचा योग्य वापर केल्यास आर्थिक लाभ व प्रदुषणास आळा बसू शकतो. भारतात कृषी, वने, औद्योगिक संस्था दुग्ध विकास यामध्ये बिनकामी उत्पादने तयार होतात.उदा. गुराचे शेणखत, गोबरगॅस, कडबा, तनीस, झाडाचा पालापाचोळा यांचा पिकांना उपयोग होतो व सरपणासाठी उपयोग होतो. त्याच बरोबर फळेभाज्या वनस्पती, कोळशाची राख, तांदळाचे तुस, कोंडा यांचे विविध उपयोग होत असल्याने नियोजन बध्द वापर केल्यास पर्यावरण संतुलन व आर्थिक लाभ मिळू शकतात.

**६) पर्यावरणासाठी शाश्वत विकासाची गरज :-**

शाश्वत विकासाची संकल्पना आणि या शब्दाचा वापर १९८० मध्ये (IOCED) जगातील पर्यावरण आणि विकास आयोगाने केला त्यांच्या मतानुसार भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याच्या पर्यावरणाच्या क्षमतेचा ऱ्हास न करता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय. याचा अर्थ प्रादेशिक नैसर्गीक, भौतिक परिस्थिती नैसर्गीक संसाधने, पर्यावरण लोकसंख्या या सर्व घटकांचा योग्य अभ्यास करुन पर्यावरणीय घटक व नैसर्गिक संसाधनाचा



Scanned by CamScanner

मर्यादीत वापर करणारी जीवन प्रणाली स्विकारणे होय.

स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, वने हे शाश्वत विकासासाठी कायम राहिले पाहिजेत. या स्त्रोताचा वापर योग्य प्रमाणात केल्यास आपण सुरक्षित राहू शकू हे स्त्रोत्र वाजवीपेक्षा अधिक वापरल्यास त्यांचा अस्तित्वाला धोका पोहचू शकतो. नैसर्गिक घटकांच्या पध्दतीमध्ये व्यक्तीगत वापरापासून ते वस्तू व्यापार आणि नियम या गुंतागुंतीच्या प्रणालीपर्यंत सर्वाचा समावेश आहे. भावी पिढयांच्या गरजा भागविण्याची क्षमता कायम ठेवून वर्तमान काळातील गरजा भागविण्याला शाश्वत विकास म्हणता येईल त्यामुळे वेगवेगळया कृतीचा समन्वय साधावा लागेल आणि एकमेकांत गुंतलेल्या समस्या सोडवाव्या लागतील जे जबाबदार घटक आहेत त्यांच्यामध्ये समन्वय निर्माण करुन त्यावर उपाय करण्याकरिता जगातील सर्व राष्ट्रांनी एकत्र येणे गरजेचे आहे. त्यासाठी नवी पध्दत, नवे धोरण, योग्य कायद्याची अमलबजावणी काम करण्याची पध्दत यांना स्थान मिळायला पाहिजे शाश्वत विकासासाठी सामाजिक बांधील की जपणाऱ्या सामान्य मानसाचाही सहभाग आवश्यक असायला हवा.

**पर्यावरण सवर्धनासाठी काही उपाय योजना :-**

१) वृक्ष दिंडीच्या नावाने राजकीय स्टंटबाजी, बंद करुन पर्यावरण संवर्धन हे मनापासून स्विकारले पाहिजे.

२) प्रत्येक गाव हागनदारी मुक्त करुन प्रत्येक घरी स्वच्छतागृह बांधले पाहिजे.

३) वृक्ष तोडीसाठी जबाबदार असलेले जंगलमाफीया, चोर व परप्रांतीय घूसखोर यावर नियंत्रण मिळवून देशद्रोही कार्य करणाऱ्यांना जबर शिक्षा व्हायला पाहिजे.

४) कृषी क्षेत्रासाठी पारंपारीक शेती करतांना वृक्ष तोडीवर निर्बंध घालून सरकारने शेती संसाधने स्वतःहून पुरवली पाहिजे.

५) प्रत्यक्ष गावात वृक्ष संवर्धन संस्था खनीज संपत्तीचे संवर्धन यासाठी कायद्याचे योग्य पालन होणे सक्तीचे केले पाहिजे व तशा संस्थांना प्रेरीत केले पाहिजे.

६) ग्राम पंचायत नगरपालीका, महानगरपालीका यांच्या हद्दीत पर्यावरणाला धोका पोहचवणाऱ्या कृतीबद्दल दंडात्मक कार्यवाहीसाठी विशेष अधिकार देण्यात यावे.

७) शाळा,महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे दुष्परिणाम व संवर्धन यासाठी प्रेरणा देणारे कार्यक्रम राबवून समाज जागृती करण्यात यावी.

८) सौरउर्जा, गोबरगॅस, बायोगॅस यांचा वापर समाजाच्या सर्व स्थरातून विशेषतः ग्रामीण क्षेत्रात वापर करण्यासाठी लोकांना प्रेरीत केले पाहिजे.

९) वन्य जीव व त्याची कत्तलरोखण्यासाठी जंगलपरिसरात फिरणाऱ्यांना वनखात्याची अनुमती अनिवार्य करुन वन कायद्याचे काटेकोर पणे पालन व्हायला पाहिजे.

१०) प्रदुषण टाळण्यासाठी परीसरातील स्वच्छता सांडपाण्याची योग्य विल्हेवाट धनकचरा यासाठी मोठी नियोजित जागा शहराबाहेर असावी त्यांची विल्हेवाट लावताना प्रदुषण पसरणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

११) पशुपक्षाच्या प्रजाती नष्ट करणाऱ्या रसायनांच्या व कृषी फवारणी औषधावर व त्याच्या प्रमाणशीर वापरासंबंधी लोकांना जागृती करणे गरजेचे आहे.

१२) रासायनिक दुध निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनावर पूर्णतः बंदी असावी.

१३) डोंगररांगा टेकडयावरील उत्खनन मोठया प्रमाणात होत असून त्यातील वनस्पती भावी पिढीसाठी आवश्यक असणार आहे अशा उत्खननावर बंदी यायला पाहिजे.

१४) वृक्ष तोडणारे माफीया राजकारणी, गुंड प्रवृत्ती असणारे लोक यांच्या स्वैराचारी प्रवृत्तीवर कायद्याने निर्बंध घालून पैशाच्या मोहात असणारे ठेकेदार यांना आळा घालने गरजेचे आहे.

१५) जलसंवर्धन करतांना पर्याप्त पाण्याचे साठे निर्माण करुन सुयोग्य वापर व संवर्धन यांचा समन्वय असला पाहिजे. तसेच अजैवीक घटकांचा वापर गरजे पूरता केला पाहिजे.

१६) मोठया उद्योगातील रासायनिक पदार्थे मिश्रीत दुषित पाणी शुध्द करुन नदी नाल्यात सोडण्यात यावे जेणे करुन जैवीक घटकाला हानी पोहचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

१) दैनिक लोकमत

२) पर्यावरणशास्त्र - डॉ. घाटपूरे

३) दैनिक लोकसत्ता

४) पर्यावरण आज व उद्या - परब भरुचा

Scanned by CamScanner



प्रा.नंदकिशोर एम. मेनेवार
जा.कृ.बोमनवार कनिष्ठ महा.
चामोर्शी, जि. गडचिरोली.

# जागतीक मंदी आणि भारत

प्रा. नंदकिशोर मेनेवार

## प्रस्तावना :-

जगात अर्थव्यस्थेत १९९१ नंतर परिवर्तनास आरंभ झाला १९९५ नंतर एकल व्यापार धोरणाचा परिणाम आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर व्हावयास सुरुवात झाली. विश्व व्यापार संघटनेच्या अनेक व्यापारी वैशिष्टयाने प्रभावीत होऊन. विकसीत आणि विकसनशील राष्ट्राच्या अंदाजपत्रकीय रचनेतच आयात निर्यात धोरणाचा परिणाम दिसून येण्यास सुरुवात झाली. विकसनशील राष्ट्रातील आर्थिक ध्येय धोरणाच्या संदर्भात विश्व व्यापार संघटनेच्या वैशिष्टयाचा परिणाम दिसून यायला सुरुवात झाली. प्रत्येक राष्ट्राचे आयात निर्यात शुल्क कमी होण्यास आरंभ झाला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धा भांडवली व उपयोग्य वस्तूच्या संदर्भात अधिक विकसीत होण्यास आरंभ झाला. कमी आयात शुल्काचा परिणाम देशाच्या एकूण उत्पन्नावर परिणाम करु लागला शिवाय देशी उद्योगाशी स्पर्धा वाढल्यामुळे देशी उद्योगातील रोजगार कमी होण्यास सुरुवात झाली. उदा. दक्षिण कोरियातील निर्माण झालेल्या लोह पोलदाच्या यू.एस.ए तील अधिक निर्यातीमुळे यु.एस.ए. चा लोह पोलादाचा उद्योग संकटात सापडला, लाखो कामगारांना बेकार व्हावे लागले अशा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील स्पर्धात्मक व रचनात्मक बदलचा परिणाम देशी उद्योगात होण्यास आरंभ झाल्यामुळे चालनच मागणी पूरवठयाच्या संतुलनात बिघाड निर्माण झाले. रोजगारपातळीत घट प्रभावी मागणीला उत्तेजीत करु शकत नाही व त्यातून पून्हा बेकारी निर्माण होते असाच परिणाम अमेरीका अर्थव्यवस्था व यूरोप या दोन खंडातील अनेक राष्ट्रांनी अनुभवयास सुरुवात केली.

यातूनच २००५ च्या डिसेंबरच्या अखेरीस यू.एस.ए. मध्ये वित्तीय संस्थेतील घोटाळे वर येण्यास सुरुवात झाले व लेहमन ब्रदर्स व मेरी लिंच या दोन्ही वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थाचे दिवाळे निघाले. २००८ मध्ये तर अमेरिकेत एकही वित्त संस्था उरली नाही की ज्यांचे दिवाळे निघाले नाही. अमेरिकेतील सर्व आर्थिक व्यवहार करणाऱ्या वित्त संस्था बुडाल्या. या देशातील वित्तीय संख्याचे आर्थिक दिवाळे निघाले. सर्व वित्तीय संस्थाच्या संस्थापकानी ग्राहकाना आकर्षित करुन कर्जासाठी प्रेरीत केले. परिणाम स्पर्धा वाहून व्याजदर कमी होण्यात झाला. ग्राहकाने कमी व्याजदरावर कर्ज प्राप्त होते. हे पाहून गृह ऋण मोठया प्रमाणावर घेण्यात सुरवात केली एका घरापेक्षा अधिक घर असावे अशी प्रति स्पर्धा वाढायला आरंभ झाला. परंतु घेतलेल्या कर्जातून वित्तीय संस्थांचा हप्ता भरणे थकीत होऊ लागले. वित्तीय संस्थाना कर्जातील परतावा प्राप्त न झाल्यामुळे त्याच्या भाडवलावर कितपत परिणाम होण्यास सुरुवात झाली. परिणामतः ग्राहकांनी वित्त संस्थेला घरे परत करण्याची स्थिती निर्माण झाली. यालाच (Ferrelocene) असे म्हणतात. परिणामतः वित्तीय सर्वच संस्थेची बाजारातील तरलता कमी झाली व यातूनच दिवाळखोरीचे पर्व सुरु झाले.

भारत अमेरिका व्यापार संबंध सुदृढ झाले. भारताचा सर्वात जास्त व्यापार अमेरिके बरोबर होतो. कापड उद्योगाची ३३ टक्के पेक्षा अधिक निर्यात आपण अमेरिकेत करतो. या दिवाळखोरीचा परिणाम भारताचे उद्योगावर होण्यास आरंभ झाला. अमेकितील अनेक उद्योग भारतीय बाजारपेठेतून वस्तूची निर्मीती करुन स्वदेशी बाजारपेठेत विक्रीस उपलब्ध करुन देत होते. त्याचा परिणाम संरक्षणाचे धोरण स्विकारल्यामुळे बंद झाले. याचा अल्पसा परिणाम आय.टी. क्षेत्र व सॉफ्टवेअरच्या बाजारपेठेवर क्षेत्रात झाला. जागतीत आर्थिक मंदीचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर युरोपीयन व अमेरिकन राष्ट्राच्या तूलनेत कमी होण्याचे कारण म्हणजे देशी बाजारपेठेतील असलेली सुदृढ प्रभावी मागणी होय.

तेजीनंतर मंदी मंदीनंतर तेजी कशी अस्तित्वात येते याविषयी प्रा. केन्स यांची व्यापार चक्राचे सिध्दांत बघू.

Scanned by CamScanner

**व्यापार चक्राचे सिध्दांत :-**

केन्सचा व्यापार चक्राचा सिध्दांत सामान्य सिध्दांत या ग्रंथात स्पष्ट केला आहे. त्यात पुढील चार निष्कर्ष आहेत.

१) बेरोजगारीचे निवारण करण्याचा उपाय मजूरीच्या दरात घट करणे नसून गुंतवणूकीत वाढ करणे होय.

२) उत्पन्नाच्या प्रत्येक वाढीबरोबर एकूण मागणी एकूण पुरवठ्यापेक्षा कमी राहील. अशी शक्यता असते. यामुळे अर्थव्यवस्थेत न्यून रोजगारीची परिस्थती निर्माण होते. अशा परिस्थितीत गुंतवणूकीत वाढकरण्यासाठी सरकारद्वारे प्रयत्न केले जातात.

३) भांडवलदाराची बचत व गुंतवणूकीशी व्याजदराचा काहीच संबंध नसतो. व्याजदराला केवळ मौद्रिक घटना संबोधणे योग्य ठरणार नाही.

४) गुंतवणूकीमुळे निश्चितपणे उत्पन्नात व रोजगारीत कितीतरी पटीत वाढ घडून येते. ही वाढ उपभोग प्रवृत्तीच्या गुणाकारावरील परिणामामुळे घडून येते.

**अमेरिकेतील मंदी निर्मितीची कारणे :-**

अमेरिकेत १९९८ पासून वैयक्तिक व सामुदायिक बचतीकडे दुर्लक्ष करण्याचा परिणाम अखेर २००२ पासून वाढत्या अर्थसंकल्पीय तुटीला कारणीभूत झाला. **Capital account Deficit 7000** बिलियन डॉलरवर गेले. जपान व चीनच्याच नव्हे तर अनेक राष्ट्राच्या कर्जाच्या ओझ्याखाली अमेरिका दबली गेली आहे. विकसनशील देशातून स्वस्त वस्तू आयात करतांना देशातील वाढत्या बेकारीची पर्वा केली नाही. पत नसताना अनिर्बंध उपभोगाची त्यांना चिंता वाटली नाही. क्रेडीट कार्डावर उभ्या राहिलेल्या चंगळवादाला, चैनीला खतपाणीच घातले गेले. डॉलरची पत जागतीक बाजारपेठेत घसरली विकसनीशील देश आपली उत्पादने डॉलरच्या हव्यासाने अमेरिका व अन्य विकसित देशांत निर्यात करुन परकीय चलनाची गंगाजळी वाढविण्याच्या मागे लागले. अमेरिका कर्जबाजारी झाली. या असमतोतातून जागतिक अर्थव्यवस्थेला धक्के बसू लागले. गेली आठ दहा वर्ष अमेरिकेची विनाशाकडे वाटचाल सुरु आहे. अमेरिकेच्या अर्थसंकल्पात ५० टक्के रक्कम जेष्ठ नागरिकांची पेन्शन आरोग्य विमा व बेकारी भत्ता यावर खर्च होते. अंतर्गत व बा[illegible] संरक्षणावर मोठा खर्च होतो. बेकारी निर्मुलनाचा वि[illegible] त्यांना स्पर्श करित नाही. अमेरिकेच्या चंगळवादी जी[illegible] पध्दतीचे आकर्षण असणाऱ्या सर्वांना विशेषतः युरोपि[illegible] देशानाही या संकटाने घेरले आहे. अमेरिकेत नि[illegible] करणाऱ्या आणि गुंतवणूक करण्याची स्पर्धा करणाऱ्या सर्वांनाच त्याची झळ लागणे स्वाभाविक आहे. अमेरिके[illegible] मंदीची लाटही सर्वदूर पसरली.

मंदीच्या कारणाचे उत्पादक व व्यावसायिक या[illegible] प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होतात. काही परिणाम त्व[illegible] दिसतात तर काही उशिराने. उद्योग धंदे अजस्त्र बनविण्या[illegible] कल. बँकेचे महाबँकेत रुपांतर करण्याची घाई, पगारा[illegible] भरमसाठ वाढ, चंगळवादाचा वरचश्मा ही अमेरिके[illegible] आर्थिक संकटाची कारणे.

**महागाई निमिर्ती :-**

**महागाईची झळ ज्या गरीबांना सर्वाधिक [illegible] त्यापैकी आठ कोटी लोक उपाशिपोटी झोपतात. १७ को[illegible] जनता दर माणशी १२ रु. म्हणजे दर महिना ३६० रु. [illegible] २९ कोटी जनतेचा दरडोई खर्च आहे. १५ रु. म्हण[illegible] दरमहा ४५० रु. याचा ना बाजाराशी वा निर्देशाकांशी सं[illegible] पण महागाईत तेच जास्त भरडले जातात.**

विकसित राष्ट्रात चंगळवादी प्रवृत्तीमुळे आय[illegible] उत्पादने आणि बचत याचा अर्निबंध उपयोग व बेधुंद वापर [illegible] झाला. विकसित देशांतील उत्पादक प्रकिया थंडावल[illegible] विकसित देश कर्जबाजारी होऊ लागले. १९९८ पा[illegible] अमेरिकेतील बचतीचा दर घटत चालला. २००२ पा[illegible] अमेरिकेची वित्तीय तूट वाढत चालली तेलातून प्राप्त झा[illegible] डॉलर विकसनशील देशात स्टॉक बाजारात, रिअलइस्टेट[illegible] गुंतविण्यात आले. हातात नसलेल्या किंबहुना अस्तित्व[illegible] नसलेल्या वस्तूवर वायदे बाजारात गुंतविले विकसन[illegible] देशात महागाई वाढली. विकसनशील देशांनी अंत[illegible] बाजारपेठेकडे दुर्लक्ष करून निर्यातीवर लक्ष केंद्रीत [illegible] विकसित देशांची राक्षसी भूक वाढविण्यासाठी निर्यातीसा[illegible] उद्योग. त्यासाठी तंत्रज्ञान त्यावर संशोधन. अग्रक्रम बद[illegible] स्वतःच्या गरजांचा विसर पडता निर्यातीसाठी सुपीक जमी[illegible]

Scanned by CamScanner

सेझ उभे राहिले. चंगळवादातून पूरक सवयी उत्पन्न झाल्या. त्यांच्या मागणीचे क्रम बदलले निर्यात करा नाही तर नष्ट व्हा. याचा स्वीकार करण्यात आला. विकासाच्या समाधानाच्या संकल्पना बदलू लागल्या. बाजारप्रणीत अर्थव्यवस्थेशी देशातील ८३ टक्के जनतेचा संबंध नाही. पण नवश्रीमतांना त्याची कदर नाही. पत नसताना क्रेडीट कार्ड काढून क्रेडीट कार्डातून भविष्यातील पैसा खर्च करण्याची वृत्ती बळावते. बचत कमी होते. सामाजिक नितिमत्तेची संकल्पना बदलते बाजारी अर्थव्यवस्थेला अनुकूलअशी समाजरचना येऊ पहाते. सामाजाची **Vertical Division** होवू पहात आहे. वाढत्या महागाईने समाजाच्या मोठ्या हिश्याचे जीवन कष्टप्रद होते.

२००६-२००७ या काळात डॉलरचे मूल्य रु. ४५.०५ इतके होते. २००७-०८ मध्ये ते रु.४०.०४ इतके झाले. याचा अर्थ डॉलरच्या बिलींगमध्ये रुपयाच्या मूल्यात १० टक्के घट झाली आहे.

**मंदीचा भारतावरील परिणाम :-**

अमेरिका इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, रशिया, चीन यांची आर्थिक स्थिती ढासळली.

मंदीमुळे खनिज धातू, खते सिमेंट यांचे भाव कमी झाल्याने घाउक मूल्य निर्देशांकांत घट झालेली दिसते. अन्नधान्य कडधान्य. डाळी, तेल, मांस, मासे, दूध, भाजीपाला या जीवनाश्यक वस्तूंचा निर्देशांक वाढत आहे. आर्थिक विकास हा **cyclic** मंडलकार असतो. चढउतार हे त्याचे अविभाज्य अंग आहे. तयार कपडे, सूत हिरे, दागदागिने, खनिजे, मांस, कातडी यांची मागणी कमी झाली आहे. उद्योगाला मंदीने ग्रासले आहे. लाखो कामगारांवर बेकारीची पाळी आली आहे. निर्यात कमी झाल्याने उठाव नसल्याने अनेक कारखाने, त्यावर अवलंबून असणारे लघुउद्योग अडचणीत आले आहेत. घर बांधणीने मार खाल्ला आहे. गावागावातील बारा बलुतेदार बेकार झाले आहे. लोखंड. सिमेंट, गृहोपयोगी वस्तू, खनिज, शेती यांच्या उत्पादनात घट झाली आहे. सेवा क्षेत्राला मंदीची सर्वाधिक झळ पोहोचली आहे. पर्यटनाला फटका बसला. शेतकमालातील लघुउद्योग व स्वयंरोजगार क्षीण होत आहे. नवीन उद्योग उभारणी नाही. नवीन कामगार भरती नाही. **NSSO** च्या अहवालाप्रमाणे १९९९-२००० मधील ७.३ टक्क्यावर असलेली बेकारी ती १०-११ टक्केकडे पोहचत आहे.

**भारत सरकारचे आर्थिक सहाय्य :-**

वित्तपुरवठा आणि हमीद्वारे उर्जा, निर्यात गृहनिर्माण, ऑटो, लघु व मध्यम उद्योग आणि पायाभूत सुविधा आदी क्षेत्रांना बळकटी आणणे या अंतर्गत ३५ हजार कोटी रुपये.

इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर फायनन्शियल कंपनी लिमिटेडला मार्च २००९ पर्यंत करमुक्त, कापड उद्योग, हातमाग. हस्तशिल्प, गलिचा, चार्मोद्योग, रत्न आणि दागिने, सागरी उत्पादने आणि लघु व मध्यम उद्योगासह कामगारान्मुख निर्यात कंपन्यासाठी शिपमेंटच्या आधी आणि शिपमेंट नंतर निर्यात कर्जावरील व्याजदरात ३१ मार्च २००९ पर्यंत दोन टक्के सुट याकरिता ११०० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध.

निर्यातीला प्रोत्साहन देण्याकरिता ३५० कोटी रुपयाचा निधी. सरकारने लघु व मध्यम उद्योगांनाही सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. या क्षेत्राला बँक कर्जाची परतफेड करणे शक्य व्हावे म्हणून रिझर्व्ह बँकेने ७ हजार कोटी रुपयांची पुनर्वित्त सुविधा ५० लाख रुपयावरुन वाढवून एक कोटी रुपये करण्यात आली. याशिवाय कर्जाचा लॉक इन अवधी २४ महिन्याऐवजी १८ महिन्यावर आणण्यात आला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) व्यापार चक्राचे सिध्दांत - डॉ. माहोरे
२) वर्तमानपत्र - लोकमत, लोकसत्ता



# सूरेश हरिचंद्र भांडारकर

तुकडोजी नगर, मानेवाडा
सिमेंट रोड, नागपूर.

Scanned by CamScanner




**Prof. Kiran Bhure**
Sarwangine Uchha Vidyalay,
Pindkepar, Dist. Bhandara.


# जागतिक मंदिचा भारताच्या विदेशी व्यापारावर झालेला परिणाम

## प्रास्ताविक

ऑगस्ट २००७ मध्ये मंदीरुपी जागतिक आरिष्टाची सुरवात अमेरिकेतील निकृष्ठ दर्जाच्या तारण व्यवस्थेमुळे झाली याचीच लागण प्रतिभूतींच्या बाजाराला लागली. अमेरिका आणि इतर राष्ट्रांमध्ये याचा प्रादुर्भाव झाल्याने काही महिण्यातच अनेक देशांच्या विदेशी व्यापारावर याचा मोठा परिणाम दिसू लागला. हे वित्तीय आरिष्ट उद्भवल्यानंतर जवळपास १ वर्षानी ज्यावेळी जागतिक परिस्थितीचा अंदाज घेण्यात आला त्यावेळी असे लक्षात आले की, आशियाई देशातील विशेषतः चीन आणि भारतातील अर्थव्यवस्था तुलनात्मकदृष्ट्या या आरिष्टापासून केवळ दूरच नाही तर जागतिक घसरण थोपविण्यात ही राष्ट्रे मोलाची भूमिका वटवू शकतात इतकेच नव्हे तर वैश्विक स्तरावर पुनरुस्थानाची वाट मोकळी करुन देण्यास देखील हे देश हातभार लावू शकतात.

भारताच्या विदेशी व्यापारवरही या आरिष्टाचा निश्चितच परिणाम झाला आहे. परंतु त्याला आर्थिक मंदी हे केवळ एकच कारण सांगता येणार नाही. हे जागतिक आरिष्ट उद्भवल्यापूर्वीच्या नजीकच्या काळात म्हणजेच २००७-०८ या वर्षाच्या सुरवातीच्या पहिल्या भागात भारताच्या एकूण उत्पन्नात घट होण्यास सुरवात झाली होती. हा काळ अमेरिकेच्या वित्तीय गोधळापूर्वीचा सहा महिण्याचा काळ होता. या सर्व विकसित देशामध्ये मंदीची प्रवृत्ती ऑगस्ट सप्टेंबर २००८ च्या सुमारास तीव्र व्हावयास लागली. २००७-०८ मध्ये उद्योगामधील घसरण सकल देशी उत्पन्नाच्या घसरणीपेक्षा अधिक उल्लेखनीय आणि स्पष्ट होते. उद्योग क्षेत्राचा वृध्दीदर आधीच्या वर्षापेक्षा ३.२ टक्याने घसरला होता तर सकल देशीय उत्पादनाचा वृध्दी वर ०.५ टक्क्याने कमी झाला होता. भारताच्या कृषीक्षेत्रात अपेक्षित यश मिळूनही आर्थिक मंदीची स्थिती निर्माण झाली होती. २००६-०७ साली ३.८ टक्के असलेला कृषी क्षेत्राचा वृध्दीदर २००७-०८ साली ५.१ टक्के झाला होता याउलट निर्माणी आणि सेवाक्षेत्राच्या वृध्दीदरात २००६-०७ च्या तुलनेत २००७-०८ साली घसरण झाली. १०.६ टक्के असलेला निर्माणी क्षेत्राचा वृध्दीदर ७.५ टक्क्यापर्यंत घसरला याचा परिणाम भारताच्या विदेशी व्यापारावर निश्चितपणे झालेला दिसून येतो.

**मंदीपुर्व काळातील भारताची क्षेत्रीय स्थिती वृध्दीदराच्या संदर्भात**

| वर्ष | कृषीक्षेत्र | निर्माणी | सेवाक्षेत्र | उद्योगक्षेत्र | निर्यात वृध्दीदर |
|---|---|---|---|---|---|
| ०६-०७ | ३.८ | १०.६ | ११.२ | १०.८ | १८.९. |
| ०७-०६ | ५.१ | ७.५ | ११.१ | ७.६ | ७.५ |

स्त्रोत भारतीय अर्थव्यवस्था एक सांख्यिकीय संकलन २००७-०८

भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण प्रामुख्याने भांडवल निर्मितीत झालेल्या घसरणीमुळे झालेली दिसून येते. खाजगी क्षेत्रातील भांडवल निर्मितीतील घट १९९० च्या मध्यकाळात आणि नतर २००१-०२ पर्यंत सातत्याने झाली. २००२-०३ मध्ये मात्र गुंतवणूकीमध्ये पुनश्च वाढ झाली. देशातील वृध्दीदराला चालना देण्यात खाजगी गुंतवणूकदारांनी महत्वाची भूमिका वठविली. परंतु २००६-०७ पासून पुन्हा गुंतवणूकीतील घसरण प्रामुख्याने जाणवू लागली. खाजगी गुंतवणूकी २००५-०६ पासूनच लक्षणिय रित्या कमी व्हावयास लागल्या देशाच्या विदेशी व्यापारावर याचा निश्चितच परिणाम झाला. आरिष्ट पूर्व काळात निर्यातीचा दर देखील मंदावण्यास सुरवात झाली होती. २००७-०८ मध्ये भारताच्या निर्यात वृध्दीदर ७.५ टक्के पर्यत वेगाने खाली आला. यापूर्वीच्या वर्षात हा दर १८.९ टक्के इतका होता. याचाच अर्थ जागतिक आरिष्टाची स्थिती येण्यापूर्वीच एकूण सकल उत्पादन आणि औद्योगिक उत्पादनात घट झाली होती. त्यामुळे मंदीचा भारताच्या विदेशी व्यापारावर खूप परिणाम झाला हे सिध्द होत नाही. मात्र भारतीय अर्थव्यवस्थेची जोडणी अमेरिकेतील अर्थव्यवस्थेशी काही प्रमाणात कां होईना झाल्यामुळे अमेरिकेतील मंदीचा परिणाम भारतीय उद्योगांवरही झालेला दिसून येतो., देशातील विदेशी गुंतवणूक यामुळे

Scanned by CamScanner

भारताच्या विदेशी व्यापाराचा आढावा घेतल्यास ही स्थिती आणखी स्पष्ट होते

| भारताच्या विदेशी व्यापार आढावा व्यापार | १९५०-५१ | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९९-२००० | २००७-२००[illegible] |
|---|---|---|---|---|---|---|
| आयात | १२७३ | २३५३ | २१६२ | १५८६९ | ४९६७१ | २३५९११ |
| निर्यात | १२६९ | १३४६ | २०३१ | ८४८६ | ३६८२ | १५५५१२ |
| आढावा | -४ | -१००७ | -१३१ | -७३८३ | -१२८४९ | -८०९३८ |

निश्चितपणे प्रभावित झालेली आहे व तिने आपला प्रभाव भारताच्या विदेशी व्यापारावर टाकला आहे हे खरे आहे

भारताच्या विदेशी व्यापाराचा आढावा घेतल्यास हे स्पष्टपणे दिसून येते की १९५०-५१ पासून नेहमीच देशाची आयात निर्यातीपेक्षा जास्तच राहिलेली आहे. १९७०-७१ पर्यत हा प्रतिकूल व्यापार शेष नियंत्रणात होता असे दिसून येते. नंतरच्या काळात मात्र यात खूप वाढ झाली असून २००७-०८ साली तो नियंत्रणाच्या बाहेर गेला आहे असे स्पष्टपणे जाणवते. जागतिक मंदीच्या पूर्वकाळात देशाच्या विदेशी व्यापाराची ही स्थिती निश्चितच चिंताजनक होती. मंदीमुळे निर्यातीत निश्चितपणे घट होणार व हा प्रतिकूल व्यापार शेष वाढतच जाणार आहे. तेलाच्या आंतरराष्ट्रीय किंमती या काळात वाढल्यामुळे आयातीचे मुळच वाढले व व्यापारी आढाव्याची तूट वाढू लागली हे जरी खरे असले तरी मंदीनेही याला हातभार लावला हे मान्य करावेच लागते.

भारत हा विकासाच्या वाटेवर वेगाने मार्गक्रमण करीत असलेला देश आहे. या काळात देशाचे आयातीचे प्रमाण वाढणे अपरिहार्यच आहे. या परिस्थितीत देशाचा व्यापारी आढावा प्रतिकूल होणे हे स्वाभाविक आहे. परंतु तो मर्यादेच्या बाहेर जाणार नाही याची काळजी घ्यावीच लागेल. याकरिता निर्यातीत वाढ हाच एक उपाय आहे त्यादृष्टीने प्रयत्नाची पराकाष्ठा करणे आजच्या घटकेला गरजेचे आहे. विदेशी कर्ज घेवून निर्यात वाढीचे प्रयत्नही करता येतात परंतु हा तात्पुरता मार्ग आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे त्याची सवय लागणे भयावह असते. भारतासारखे अविकसित देश सामान्यतः अन्नधान्ये आणि कच्चा मालाची निर्यात करणारेच असतात. विकासाच्या वाढत्या गती बरोबर कच्चामालाची अंतर्गत मागणीही वाढत जाते. त्यामुळे या मालाची निर्यातही मंदावत जाते. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची निर्यात कमी होते एवढेच नव्हे तर प्रसंगी आयातही करावीच लागते.

त्यामुळे भारताला नवीन वस्तुचा शोध घेवून त्या विकण्यासाठी नवीन बाजारपेठा शोधाव्या लागतील. मंदीची परिस्थिती नेहमीकरीता राहणारी नाही. आपण निर्याती करिता सज्ज रहावे लागेल हेच या मंदीचे फलित

## संदर्भ


१) भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) श्री. आ. देशपांडे, डॉ. विनायक देशपांडे

२) जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन (१९ कोल्हापूर.

३) स्मरणिका (२००३) मराठी अर्थशास्त्र परि २७ वे अखिल भारतीय अधिवेशन, पालघर जि.







Scanned by CamScanner




प्रा.डॉ.माधुरी प्रदीप लेले
श्री.बिंझानी नगर महाविद्यालय,
नागपूर


# जागतिक आर्थिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम

ऑगस्ट २००७ मध्ये अमेरिकेच्या निकृष्ट दर्जाच्या पतधोरणाचा परिणाम म्हणजे अमेरिकेत निर्माण झालेले भयावह वित्तिय परिणाम. जागतिकीकरणामुळे जगातील बहुतांश देश अमेरिकन अर्थव्यवस्थेशी जोडले गेलेले असल्याने अमेरिकेतील वित्तिय संकटाची झळ जागतिक स्वरुपाची झाली. जगातील सर्वच राष्ट्रांमध्ये कमी अधिक प्रमाणात आर्थिक मंदीचे सावट गडद होऊ लागले.

प्रस्तुत शोधनिबंध विश्लेषणाच्या दृष्टीने दोन भागात विभागला आहे. पहिल्या भागात आर्थिक मंदीचे सैध्दांतिक विवेचन आणि दूसऱ्या भागात २००७-०८ पासून अस्तित्वात असलेल्या जागतिक मंदीचा भारतावर काय परिणाम झाला याविषयीचे विश्लेषण केलेले आहे.

तेंजी व मंदी या व्यापार चक्राच्या दोन अवस्था आहेत याचाच अर्थ असा होतो की अर्थव्यवस्थेत घसरण होण्यापूर्वी आर्थिक तेजी आलेली असते. ही अवस्था भारताने १९९१ पासून २००४-०६ पर्यंत अनुभवली. आर्थिक तेजीमुळे अतिरिक्त उत्पादन करण्यासाठी भांडवलदार गुंतवणूक वाढवितात, त्यांना तेजीच्या परिस्थितीचा फायदा घेऊन अधिकाधिक नफा कमविण्याची अपेक्षा असते. परिणामी मागणीपेक्षा जास्त उत्पादन होते. मागणीची कमतरता तीव्र झाली की आर्थिक मंदी येते. मार्क्सच्या मते भांडवल दारी मधील उत्पन्न विषमता व संपत्तीचे केंद्रीकरण यामुळे उपभोग न्यूनता व अतिरिक्त उत्पादन निर्माण होते, यातूनच अर्थव्यवस्थेत आर्थिक मंदी निर्माण होते.

जे अे. हॉब्सन च्या मते अर्थव्यवस्थेतील उपभोग फलन स्थिर असतो. कारण तो लोकांच्या सवयी रुढी परंपरावर अवलंबून असतो तर दुसऱ्या बाजुला तांत्रिक प्रगती व व्यावसायिक स्पर्धेमुळे उत्पादनात वाढ होते. यामधुन अतिरिक्त उत्पादन, अतिरिक्त बचत व उपभोग न्यूनता निर्माण होवून आर्थिक संकट निर्माण होते.

व्यापारचक्रा विषयक मानसशास्त्रीय सिध्दांताची मांडणी प्रा. पिगू मार्शल, लॅव्हींगस्टन इ.नी. केली त्यांच्या मते, अर्थव्यवस्थेतील व्यावसायिक स्थिती लोकांच्या अपेक्षा व अनुमान या मानसिक घटकांवर अवलंबून असतात या सिध्दांतानुसार उद्योजक व व्यापाऱ्यांच्या मनात आशावाद व निराशावाद निर्माण झाल्यामुळे अर्थव्यवस्थेत व्यापारचक्रे उद्‌भवतात.

समाजवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त उत्पादनामुळे व्यापारचक्रे निर्माण होतात. भांडवलशाहीत अनेक उत्पादक एकसारख्या वस्तूंचे उत्पादन करतात. स्पर्धेत विक्री वाढविण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करतो आणि यातूनच मागणीपेक्षा अधिक उत्पादनाची परिस्थिती निर्माण होते. वस्तूंच्या किंमतीत घसरण आणि आर्थिक मंदी ओढवते.

अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जोसेफ शुपीटरच्या मते, भांडवलशाहीत नवप्रवर्तनामुळे नाविन्यशीलतेमुळे व्यापारचक्रे निर्माण होतात. जुन्या वस्तूची मागणी घटते यातून बेरोजगारी निर्माण होते. परिणामतः नविन वस्तूंच्या मागणीतही घट होते.

हॉट्रे व हायेक यांनी व्यापारचक्रांचा संबंध चलन विषयक घटनांशी असतो असे प्रतिपादन केले आहे. बँकांचा पतपुरवठा व्याज दर व पैशाचा पुरवठा हे घटक व्यापार चक्रास कारणीभूत असतात. बँकांची अतिरिक्त पतनिर्मिती व व्याज दरात घट व्यापारचक्रे निर्माण करतात. नैसर्गिक व्याजदर व बाजारी व्याज दर समान असे पर्यंत अर्थव्यवस्थेत स्थिरता असते यांच्यातील असमानता व्यापारचक्राना जन्म देते.

केन्सच्या मते भांडवलाच्या सीमांत लाभ क्षमतेत बदल झाल्यामुळे, प्रेरित गुंतवणुकीच्या दरात बदल होते व त्यामुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक चढउतार घडून येतात. भांडवलाची सीमांत लाभक्षमता घटली तर आर्थिक मंदी उद्‌भवते किंवा याउलट भांडवलाची सीमांत लाभक्षमता वाढली तर आर्थिक तेजी येते.

Scanned by CamScanner

मिचेलच्या मते आधुनिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अंतर्गत अस्थिर प्रवृत्तीमुळे आर्थिक चढउतार निर्माण होतात त्याच्या मते तंत्रज्ञान सुधारणा, लोकसंख्या वाढ, युध्द पिके आणि स्वयंपूर्ण मौद्रिक घटक इत्यादी बाहय घटकातील बदलांमुळे आर्थिक चढउतार होत नाहीत. नफ्यातील चढ उतार व्यापारचक्रे अस्तित्वात येण्याचे मूलभूत घटक आहेत. किंमती, उत्पादन संस्थांचे उत्पन्न व खर्च विक्रीचे प्रमाण, चलनाची उपलब्धता, बँकांचा पतपुरवठा हे घटक चक्रांना कारणीभूत असतात.

हेन्री शुल्झ, जॉन टिनबरजेन व ऑर्थर हॅन्यु यांनी आपल्या -कोळयाचे जाळे- सिध्दांतात किंमत उत्पादन व मागणी व पुरवठा या घटकात बदल झाल्यामुळे केंद्राकडे येणारी व केंद्रापासून दूर जाणारी व्यापारचक्रे तयार होतात असे स्पष्ट केले आहे.

लाईड मेटझर या अर्थशास्त्रज्ञाने व्यापार चक्राबाबत वस्तू साठा सिध्दांत मांडला, कच्चा माल, अंतिम वस्तू, उत्पादन वाढीचा दर, वर्तमान व भविष्यकालीन विक्री, उपभोग्य वस्तूची व भांडवली वस्तूंची मागणी गुंतवणुक इत्यादी घटकातील बदल व्यापार चक्रे निर्माण करतात तर प्रा. आरच. सी. ओच. मॅथ्थुजने अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीचे निर्णय अस्तित्वात असलेल्या भांडवली साठयाशी संबंधीत असतात असे मत प्रगट केले आहे.

प्रा. जे. आर. हिक्स यांनी व्यापारचक्राचा आधुनिक सिध्दांत मांडला, ज्यात त्यांनी गुणक प्रवेग आंतरक्रियेमुळे व्यापार चक्रे निर्माण होतात असे म्हटले आहे. तांत्रिक प्रंगती व लोकसंख्या वृध्दि या घटकामुळे गुंतवणूक गुणक कार्यान्वित होऊन उत्पन्नात वाढ, तर उत्पन्न वाढीमुळे प्रवेगाद्वारे प्रेरित गुंतवणुकीत वाढ होते. यातुन आर्थिक तेजी येते. जेव्हा प्रेरित गुतवणुक व उत्पन्न यातील अंतर नाहीसे होते तेव्हा उत्पन्नात घट सुरु होवून आर्थिक मंदी येते. याचा अर्थ हिक्सने आपल्या सिध्दांतात गुंतवणूक, उत्पन्न, उपभोग व प्रेरित गुंतवणूक या घटकांमुळे आर्थिक तेजी व मंदी उद्भवते हे स्पष्ट केले, गुडविन ने देखील प्रत्यक्ष गुंतवणुक आवश्यक गुंतवणुक उपभोग उत्पादन या घटकात बदल झाल्यास गुणक प्रवेग प्रक्रिया निर्माण होऊन भांडवली साठयात बदल होतो व अर्थव्यवस्थेत आर्थिक तेजी व मंदी येते असे स्पष्ट केले.

रॅग्नर फ्रिश यांनी व्यापारचक्राबाबत बहिर्गत घटक सिध्दांत मांडला त्याच्या मते, बाहय घटकांच्या परिणामामुळे अर्थव्यवस्थेत कंपने निर्माण होऊन व्यापारचक्रे निर्माण होतात डयुसेनबरी व फेलनरने या सिध्दांताला दुजोरा दिला. याच्या मते अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक ताठरता व संस्थात्मक अडथळे यामुळे साधनसामुग्री योग्य वाटप होत नाही. त्यामुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होते. तंत्रज्ञानातील बदल, राजकीय घटक, कामगार तुटवडा, त्यांचे स्थलांतर, विदेशी व्यापार शेषावर प्रभाव टाकणारे घटक इत्यादीमुळे अर्थव्यवस्थेला धक्के बसतात व परिणामतः अर्थव्यवस्था अस्थिर होते. अर्थव्यवस्थेतील विकसित होत जाणारी क्षेत्रे, गुंतवणूक लोकसंख्या, भाग बाजार, तांत्रीक प्रगती, राजकीय परिस्थिती, कामगार संस्था व त्यांचे स्थलांतर, मौद्रिक यंत्रणा, साधन सामग्रीचे वाटप व उपलब्धता याच घटकामुळे व्यापारचक्रे निर्माण होतात असे रॅग्नर फ्रिशने स्पष्ट केले.

आर्थिक तेजी व मंदी चे विवेचन निरनिराळ्या अर्थतज्ञांनी निरनिराळ्या दृष्टिकोनातून केलेले आढळते, मागणी व पुरवठा, उपभोग व उत्पादन विषयक दृष्टिकोन मौद्रिक दृष्टिकोन समाजवादी आशा व निराशावादी दृष्टिकोन गुंतवणूक, बॅक पतपुरवठा, व्याज दर विषयक दृष्टिकोन आणि रॅग्नरने मांडलेला बाहयघटक दृष्टिकोन या सर्व सिध्दांताच्या स्पष्टीकरणानंतर आपण ज्या जागतिक मंदीविषयी चर्चा करीत आहोत. त्या २००६-०८ पासून उदभवलेल्या मंदीची कारण मीमांसा करु.

अमेरिकन बँकांनी अतिरिक्त लाभाच्या मोहापायी गृह बांधणी क्षेत्रात दुय्यम दर्जाचे कर्ज देण्यास सुरुवात केली. मॉर्ग्रेज बाँड्स हे नविन पत साधन अस्तित्वात आणले. यातून भरमसाठ गृहकर्जे वितरित झाली, (परतफेडीची क्षमता न पाहता) त्यातून बुडित कर्जे निर्माण झाली आणि बँका व वित्तीय संस्थांवर दिवाळखोरीची अवस्था ओढवली. रोखता समस्या कमी करण्यासाठी या संस्थांनी आपल्या बाहेरील देशात केलेली गुंतवणूक काढून घेण्यास सुरुवात केली. हळूहळू अमेरिकन आर्थिक मंदीचे जागतिक मंदीत रुपांतर झाले याची प्रमुख कारणे म्हणजे दुय्यम दर्जाची कर्जे, अनियंत्रित बँकींग पध्दती, चुकीचा आशावाद, जागतिकीकरण, अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक असमतोल, रोखता समस्या आणि चंगळवाद.

**जागतिक मंदीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम**

भारतीय अर्थव्यवस्था जागतिक मंदीमुळे त्याही पुर्वी पासून भारतीय अर्थव्यवस्थेत समस्यांना सुरुवात झालेलीच

Scanned by CamScanner

होती २००७-०८ च्या प्रथम तिमाहीत भारताच्या सकल घरगुती उत्पादनात घट होण्यास सुरुवात झाली होती. उद्योग क्षेत्राचा वृद्धी दर २००६-०७ पेक्षा २००७-०८ मध्ये ३.२ टक्क्यांनी घटला तर सकल घरगुती उत्पादनाचा वृद्धी दर ०.५ टक्क्यांनी कमी झाला यातही विशेष बाब ही की, याच काळात कृषीचा वृध्दीदर मात्र वाढला. तो २००६-०७ च्या ३.८ टक्क्यांवरुन २००७-०८ मध्ये ५.१ पर्यत वाढला. निर्माणी सेवा. उद्योग आणि निर्यात क्षेत्रामध्ये मात्र घट झालेली दिसते.

तक्ता क्रमांक - १

सकल उत्पादन वृध्दी दर

| वर्ष | कृषी क्षेत्र | निर्माणी क्षेत्र | सेवा क्षेत्र | उद्योग क्षेत्र | निर्यात वृध्दी दर |
|---|---|---|---|---|---|
| ०६-०७ | ३.८ | १०.६ | ११.२ | १०.८ | १८.९ |
| ०७-०८ | ५.१ | ७.५ | ११.१ | ७.६ | ७.५ |

कृषी क्षेत्राचे उत्पादन हे पुरवठा प्रधान तर औद्योगिक व सेवा क्षेत्राचे उत्पादन हे मागणी प्रधान असते. अर्थव्यवस्थेतील वृध्दी बाजारात कार्यरत असलेल्या मागणी या प्रेरक घटकांमुळेच प्रकट होत असते. २००७-०८ मध्ये कृषी उत्पन्नाच्या वाढीमुळे होणारा परिणाम धनात्मक स्वरुपाचा असूनही एकुण वृध्दी दरावर मात्र पुरेसा परिणाम झाला नाही, कारण औद्योगिक व सेवा क्षेत्रातील वृध्दी दर टिकविता आला नाही.

**जागतिक मंदीचा भारतीय उद्योगावर झालेला परिणाम**

भारतीय औद्योगिक क्षेत्रावर १९९१ पासून स्वीकारलेल्या नविन आर्थिक धोरणाचा अनुकूल परिणाम दिसत असतांनाच २००४-०५ पासूनच उत्पादन घट खेळत्या भांडवलाची कमतरता, तीव्र स्पर्धेमुळे लहान उद्योगाची पीछेहाट इत्यादी गंभीर समस्या दृष्टीक्षेत्रात येत होत्याच. अशावेळी २००७-०८ पासून आलेल्या वित्तीय संकटाने अधिकच गंभीर रुप धारण केले.

तक्ता क्रमांक २.

Index Number of Industrial Production (Base Year 1993-94= 100)

| Sector | Weight | २०१०-११ | ०९-१० | ०८-०९ | ०७-०८ | ०६-०७ | २००५-०६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Gen. Index | १०० | ३१३.२ (१४.०) | ३०४.१ १०.४) | २७५.४ (२.८) | २६८.६ (८.५) | २४७.० (११.६) | २२१.५ (८.२) |
| Mining | १०.४७ | ११८.५ (१०.२) | ११३.३ (९.८) | १०६.२ (२.६) | १०६.६ (५.१) | १६३.२ (५.४) | १५४.९ (१.०) |
| Manufacturing | ७९.३६ | ३३६.४ (१५.१) | ३२७.३ (१०.९) | २९५.१ (२.८) | २८७.२ (९.०) | २६३.५ १२.५) | २३४.२ (९.१) |
| Electricity | १०.१७ | २५०.६ (६.६) | २३७.१ (६.०) | २२३.७ (२.८) | २१७.७ (६.४) | २०४.७ (७.२) | १९०.९ (५.२) |

Sourre - economic & Politcal weekly (July 17-2010)

तक्ता क्रमांक २ मध्ये औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक खाणकाम निर्माणी व वीजनिर्मिती या तीन मूलभूत क्षेत्रातील परिणामांचे चित्र स्पष्ट करीत आहे. २००७-०९ या वर्षाकडे अधिक लक्ष दिल्यास असे स्पष्ट होते की या तीनही क्षेत्रात उत्पादन २.८ टक्क्यापर्यंत घसरलेले आहे. हा २००७ पासून सुरु झालेल्या जागतिक मंदीचाच परीणाम आहे. तर २०१०-११ या वर्षापर्यत याच तक्त्यानुसार उत्पादनाच्या निर्देशांकात बऱ्याच प्रमाणात सुधारणा झालेली देखील दिसून येत आहे.

**भांडवल निर्मितीवर जागतिक मंदीचा परिणाम**

भारताच्या भांडवल निर्मितीत १९९१ पासून वेगाने वृध्दी सुरु झालेली होती. जागतिकी करणाच्या व खाजगी करणाच्या धोरणामुळे अनेक विदेशी वित्तीय संस्था देखील भारतात भांडवली गुंतवणूक करण्यात पुढाकार घेऊ लागल्या होत्या. भारतीय विकास दराला चालना देण्याचे कार्य खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकदारांनी फार उत्कृष्ठ पध्दतीने केले.

परंतु २००७ ऑगस्टमध्ये अमेरिकेत लेहमन ब्रदर्स मेरिललिंच सारख्या मोठया व जुन्या वित्तीय संस्था दिवाळखोरीत निघाल्या आणि त्याचे पडसाद भारतीय भांडवल निर्मितवर फार मोठया प्रमाणावर उमटले विदेशी वित्तीय संस्थांनी त्यांचा तोटा कमी करण्यासाठी भारतातून आपली गुंतवणूक काढून घेण्यास सुरवात केली. त्यामुळे भारतात भांडवलाची विशेषतः खेळत्या भांडवलाची समस्या गंभीर झाली त्यातूनच उत्पादन घट आणि निर्यात घट असे परिणाम दिसून आले. निर्यात वृध्दीचा दर १८.९ वरुन ७.५ टक्क्यापर्यंत खाली आला.

**रोजगार समस्या**

जागतिक मंदीचा आणखी एक परिणाम म्हणजे बेरोजगारीत झालेली वाढ. रोजगार निर्मितीचा दर तर घटलाच पण त्याच बरोबर असलेला रोजगार जाण्याची समस्या निर्माण झाली. विदेशात असलेल्या भारतीय तरुणांचे रोजगार गेले. एका सर्वेक्षणानुसार सष्टेंबर २००८ ते डिसेंबर २००८ या काळात ५ लाख लोकांना आपल्या नोकरीला मुकावे लागले.

**भागबाजारातील घसरण**

खाजगी क्षेत्रातील भांडवली गुंतदणुकीचे प्रतिबिंब म्हणजे भागबाजाराचा निर्देशांक सेन्सॅक्स आणि निफ्टी या

Scanned by CamScanner

निर्देशांकावर अमेरिका, युरोप आणि आशियातीलइतर भाग बाजारात होणाऱ्या घडामोडीचाही परिणाम होतो. २००८ मध्ये भाग बाजारात झालेले चढउतार अविस्मरणीय ठरले. १९८२-ते २००० पर्यंत याच निर्देशांकात आठ पटीने वाढ झाली होती ती २००८ मध्ये इतक्या वेगाने खाली आली की निर्देशांक २०००० पासून ८००० पर्यंत घसरला छोटया गुंतवणुकदारांना फार मोठया प्रमाणात नुकसान सहन करावे लागले.

**उत्पन्नाचे विषम वितरण**

वित्तिय संकटाची सर्वात अधिक किंमत अशा लोकांना मोजावी लागते की ज्यांनी कधी वृध्दीचा फायदा उपभोगलाच नाही. काही प्रमाणात असलेली विषमता ही परिश्रमाचा मोबदला देण्यास, विशेष कौशल्याची कदर करण्यास, नविन उपक्रमांना प्रोत्साहन देण्यास उपयुक्त ठरु शकते. परंतु उत्पन्नातील विषमता अधिक तीव्र होवू लागली तर अर्थव्यवस्थेला हानीकारक ठरते. आर्थिक कार्यक्षमता व सामाजिक पर्यावरणांलाही ही असमानता घातक ठरते.

जागतिक मंदीमुळे असंघटीत क्षेत्रातील उत्पन्न आणि नव्याने उदयाला आलेल्या उद्योगांमध्ये निर्माण झालेले वित्तिय संकट अधिक तीव्र झाले त्यामुळे शहरी भागात राहणाऱ्या विशेषतः नोकरदार वर्गाला सहावा वेतन आयोग, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्तम संधी तर दुसऱ्या बाजुला ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या कष्टकरी, असंघटीत मजूरांच्या उत्पन्नात मात्र लक्षणीय घट झाली. सामाजिक आर्थिक असमानता या काळात अधिक वाढलेली आहे.

**फसवा विकास दर**

२००८-०९ या वर्षात शासनाने घोषित केलेला ६.७ टक्के विकास हा देखील एक सांख्यिकीय मृगजळ आहे. सहावा वेतन आयोग, पेन्शन वाढ, सामाजिक व व्यक्तीगत सेवा यांचा वाटा या वृध्दीदरावर अधिक प्रभाव टाकणारा आहे. या सर्वांचा विचार केला तर खरा विकास दर ४.८ टक्के एवढाच येतो. २००८-०९ या वर्षात सकल घरगुती उत्पादन वाढीचा दर फक्त २.२ टक्के एवढाच होता. एवढेच नव्हे तर कृषी उत्पादनाचा वृध्दी दर देखील कमी कमी होऊ लागला होता.

या जागतिक मंदीचा परिणाम सर्व राष्ट्रांवर कमी जास्त प्रमाणात झालेलाच आहे. अमेरिकन आणि युरोपीयन अर्थव्यवस्था सर्वाधिक प्रभावित आहेत अमेरिकेला या संकटातून बाहेर येण्यासाठी कित्येक वर्ष लागतील असा तज्ञांचा अंदाज आहे. त्यामानाने भारत व चीन सारखे देश या संकटातून लवकर बाहेर येतील. त्यादृष्टीने वाटचाल केल्याचे (२००८ ते २०१०पर्यंत) जाणवते.

**उपाय योजना**

२००८ या वर्षाचे नोबेल पारितोषिक विजेते पॉलक्रुगमन यांनी या मंदीची तूलना १९३० च्या मंदीशी करुन ही त्याही पेक्षा भयावह परिस्थिती असल्याचे म्हटले आहे २०१० मध्ये जागतिक अर्थव्यवस्था एक टक्यापेक्षा अधिक दराने संकुचित झाली व ती ९ टक्या पेक्षा अधिक होण्याचे भाकित अर्थतज्ञ वर्तवित आहेत.

जगातील नामवंत अर्थतज्ञ मंदीचे परिणाम कमी करण्यासाठी वेगवेगळे मार्ग सुचवितांना दिसतात.

कृषि व लघुउद्योगावर लक्ष केंद्रित करुन रोखतेचे प्रमाण बाजारपेठेत वाढविण्यावर सर्वाचा भर दिसतो. अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानासाठी अमेरिकेने राजकोषीय उत्तेजना चा मार्ग अवलंबला. वित्तीय संस्थांना आर्थिक पॅकेज देण्यास सुरुवात केली. २०१० च्या पहिल्या तिमाहीत ६.५ टक्के घसरलेला वृध्दी दर दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीत केवळ २.५ टक्के व १ टक्क्याने घटला. निर्माणी व गृहनिर्माण क्षेत्रातील घटक ही कमी झाले. या बदलाचे एकमेव कारण शासकिय हस्तक्षेप, शासनाच्या आर्थिक प्रोत्साहनामुळेच जागतिक स्तरावर मोठया प्रमाणात आर्थिक वृध्दी दर साध्य करण्यास मदत होऊ शकेल. भारत सरकारने देखील२२ ऑगस्ट २०१० रोजी उद्योगासाठी ११५६ कोटी रु. पॅकेज घोषित केले. शेतकऱ्याना कर्ज माफी योजना जाहीर करुन दिलासा दिला.

काही तज्ञांच्या मते मात्र हे प्रयत्न अल्पकालीन यश देणारे असू शकतात, कारण ही मंदी V आकाराची नसून W या अक्षरासारखी आहे. त्यामुळे ही मंदी पुन्हा परतून येऊ शकेल. यातही दिलासा हाच की भारत व चीन सारख्या देशात मंदीचा प्रभाव कमी आहे व असणार आहे.

**संदर्भ सूची**


१) Global Journal of Emerging Market Economics Vol. 1 Issue 2, May 2009

२) Economic & Political Weekly - July 17, 2010 May 7, 2010

३) अर्थसंवाद - जाने मार्च २०१०, एप्रिल- जून २०१०


Scanned by CamScanner

६५० करोड रूपये इतकी होती तर निर्यात ६४७ करोड रूपये इतकी दिसून येते. योजनेच्या शेवटी आयातीत वाढ होवून ती ७७३ करोड रूपये इतकी झाली तर निर्यातीचे प्रमाण ६४१ करोड रूपये इतके होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विदेशी व्यापारातील तूट ४६७ करोड रूपयापर्यन्त वाढली सहाव्या योजनेपर्यंत ही तूट ७७३० करोड रूपये इतकी झाली. आठव्या पंचवार्षिक योजनेत तूट ५६६२ दशलक्ष डॉलर इतकी वाढली. नवव्या पंचवार्षिक योजनेत ही तूट ३४५६ दशलक्ष डॉलर वाढली. दहाव्या पंचवार्षिक योजनेत, ही तूट वाढून ३३.२ बिलीयन डॉलर इतकी झाली. दहाव्या पंचवार्षिक योजनेत तुटीतील वाढ घडून आल्यामुळे त्याचा परिणाम रूपयाच्या मुल्यावर झाला. व वाढलेली तूट ही सर्वाकरीता चिंतेचा विषय ठरली.

११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत भारताच्या विदेशी व्यापाराच्या संदर्भात जी आकडेवारी प्रकाशीत झाली आहे. त्यावरून हे स्पष्ट होते की भारताच्या विदेशी व्यापारातील तूट हा आर्थिक विकासाच्या मार्गातील एक अडथळा होय. आयात आणि निर्यात तूट सुमारे १३.४ अब्ज डॉलर इतकी आहे. म्हणजे जागतीकरणाच्या कालावधीत भारतातील ही तूट वाढल्याचे दिसून येते. २०११ मध्ये या तुटीत वाढ होऊन ती १३ अब्ज डॉलर एवढी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०१० मध्ये भारताचा विदेशी चलनाचा २८० अब्ज डॉलर एवढा साठा होता तर विदेशी ऋणाचे प्रमाण २६० अब्ज डॉलर एवढे होते.

अमेरीकेत अधिकोषांच्या दिवाळ खोरी मुळे जगात वित्तीय संकट उभे राहिले अर्थातच ज्या राष्ट्रांची अर्थव्यवस्था मूलभूत दृष्टया मजबूत आहे त्यांना आर्थिक आरिष्टांचे परिणाम कमी जाणवेल परतूं जे राष्ट्र पूर्णताः अमेरीकेन अर्थव्यवस्थेच्या अवंलबून आहे व होते त्या राष्ट्रांना याचा सर्वात जास्त परिणाम सोसावा लागत आहे. चीनचे उदा. याबाबतीत द्यावयांचे झाल्यास अमेरिकन शासनाने आऊट सोर्सींग व्यापारावर प्रतिबंध घातल्यामुळे चीनच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर १३ टक्के वरून ९ टक्के खाली आला व जवळपास ३ लक्ष श्रमिका पेक्षा जास्त श्रमिकांना बेकार व्हावे लागले. भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध घटक यामुळेच प्रभावीत झाले उदा.आय.टी. क्षेत्रातील बेरोजगारी, यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास दर ९.२ टक्के वरून ७.६ टक्के घटा झाला. याचाच परिणाम म्हणून भारतीय चालू खात्यावरील आधिक्यात २०११ मध्ये ४.५ टक्के एवढी वाढ होण्याची संभाव्यता वर्तविण्यात आली आहे. १९९१ साली भारताची चालू खात्यावरील तूट ही केवळ ३ टक्के इतकी होती दोन्ही आकडेवारीची तूलना केल्यास भविष्यात भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे आरिष्ट निर्माण होईल का असा प्रश्न अर्थतज्ञांना चिंताग्रस्त करीत आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सतत वाढत जाणारी तूट यासंदर्भा आर्थिक उदारीकरण्याचा पुरस्कार करणारे व आर्थिक उदारीकरणाचे समर्थक व हे धोरण राबविण्यात ज्यांचा सहभाग होता असे श्री देसाई, भारतीय अर्थतज्ञ यांनी टेलिग्राफ मध्ये एक लेख लिहून भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल १९९१ पेक्षाही मोठया अनर्थाकडे सुरू असल्याचे प्रतिपादन केले आहे. भारताच्या आयात-निर्यात व्यापारातील तूट नजीकच्या काळात कमी होण्याची शक्यता आज दिसून येत नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय भांडवल बाजारात विदेशी संस्थागत संस्थानी केलेली गुंतवणूक होय.

या गुंतवणूकीमुळे भारतीय अर्थव्यस्थेत परकीय चलनातील साठयात वाढ झाल्यामुळे रूपयाचे मूल्य परिवर्तीत होत आहे. याचा परिणाम भारताच्या विदेशी व्यापारावर होत आहे. रूपयाचे मूल्य वाढल्यामुळे आयात स्वस्त होऊन त्यात वाढ होते व निर्यात महाग होते. व त्यामुळे निर्यातीत घट होण्यास आरंभ होतो. परिणामतः भविष्यात आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट ही वाढत जाईल. वर्तमान स्थितीत आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्याकरीता विदेशी संस्थागत गुंतवणूकीचा वापर होत आहे. परंतू विदेशी संस्थागत गुतवणूक दारानी भांडवली बाजारातील गुंतवणूक काढून घेण्यास सुरूवात केल्यावर भारतीय रिझर्व्ह बँकेकडे असलेला हा साठा कमी झाल्यास भारताला आर्थिक आव्हांनाना समोर जावे लागेल. याकरीता पक्के आर्थिक धोरण ठरविणे महत्वाचे आहे. हे आर्थिक धोरण वर्तमान स्थितीत ठरविताना देशातील मौद्रिक धोरण व राजकोषीय धोरण लक्षात घेणे महत्वाचे ठरेल.

शासनाने आर्थिक प्रक्रियेत हस्तक्षेप केल्यावर आयात कपात करून आणि निर्यातील चालना देऊन अधिक प्रयत्न केल्यास या प्रयत्नाला किती यश प्राप्त होईल हे सांगता येत नाही. कारण खनिज तेलाच्या आयातीत कपात करता येणार नाही. पेट्रो व पेट्रोपदार्थाच्या आयातीचा भार हा जास्त असतो. याला पर्याय म्हणून औष्णिक वीज निर्मिती करीता केलेला

Scanned by CamScanner

६५० करोड रूपये इतकी होती तर निर्यात ६४७ करोड रूपये इतकी दिसून येते. योजनेच्या शेवटी आयातीत वाढ होवून ती ७७३ करोड रूपये इतकी झाली तर निर्यातीचे प्रमाण ६४१ करोड रूपये इतके होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विदेशी व्यापारातील तूट ४६७ करोड रूपयापर्यन्त वाढली सहाव्या योजनेपर्यंत ही तूट ७७३० करोड रूपये इतकी झाली. आठव्या पंचवार्षिक योजनेत तूट ५६६२ दशलक्ष डॉलर इतकी वाढली. नवव्या पंचवार्षिक योजनेत ही तूट ३४५६ दशलक्ष डॉलर वाढली. दहाव्या पंचवार्षिक योजनेत, ही तूट वाढून ३३.२ बिलीयन डॉलर इतकी झाली. दहाव्या पंचवार्षिक योजनेत तुटीतील वाढ घडून आल्यामुळे त्याचा परिणाम रूपयाच्या मुल्यावर झाला. व वाढलेली तूट ही सर्वाकरीता चिंतेचा विषय ठरली.

११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत भारताच्या विदेशी व्यापाराच्या संदर्भात जी आकडेवारी प्रकाशीत झाली आहे. त्यावरून हे स्पष्ट होते की भारताच्या विदेशी व्यापारातील तूट हा आर्थिक विकासाच्या मार्गातील एक अडथळा होय. आयात आणि निर्यात तूट सुमारे १३.४ अब्ज डॉलर इतकी आहे. म्हणजे जागतीकरणाच्या कालावधीत भारतातील ही तूट वाढल्याचे दिसून येते. २०११ मध्ये या तुटीत वाढ होऊन ती १३ अब्ज डॉलर एवढी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०१० मध्ये भारताचा विदेशी चलनाचा २८० अब्ज डॉलर एवढा साठा होता तर विदेशी ऋणाचे प्रमाण २६० अब्ज डॉलर एवढे होते.

अमेरीकेत अधिकोषांच्या दिवाळ खोरी मुळे जगात वित्तीय संकट उभे राहिले अर्थातच ज्या राष्ट्रांची अर्थव्यवस्था मूलभूत दृष्टया मजबूत आहे त्यांना आर्थिक आरिष्टांचे परिणाम कमी जाणवेल परतूं जे राष्ट्र पूर्णतः अमेरीकेन अर्थव्यवस्थेच्या अवंलबून आहे व होते त्या राष्ट्रांना याचा सर्वात जास्त परिणाम सोसावा लागत आहे. चीनचे उदा. याबाबतीत द्यावयांचे झाल्यास अमेरिकन शासनाने आऊट सोर्सींग व्यापारावर प्रतिबंध घातल्यामुळे चीनच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर १३ टक्के वरून ९ टक्के खाली आला व जवळपास ३ लक्ष श्रमिका पेक्षा जास्त श्रमिकांना बेकार व्हावे लागले. भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध घटक यामुळेच प्रभावीत झाले उदा.आय.टी. क्षेत्रातील बेरोजगारी, यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास दर ९.२ टक्के वरून ७.६ टक्के ढा झाला. याचाच परिणाम म्हणून भारतीय चालू खात्यावरील आधिक्यात २०११ मध्ये ४.५ टक्के एवढी वाढ होण्याची संभाव्यता वर्तविण्यात आली आहे. १९९१ साली भारताची चालू खात्यावरील तूट ही केवळ ३ टक्के इतकी होती दोन्ही आकडेवारीची तूलना केल्यास भविष्यात भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे आरिष्ट निर्माण होईल का असा प्रश्न अर्थतज्ञांना चिंताग्रस्त करीत आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सतत वाढत जाणारी तूट यासंदर्भा आर्थिक उदारीकरण्याचा पुरस्कार करणारे व आर्थिक उदारीकरणाचे समर्थक व हे धोरण राबविण्यात ज्यांचा सहभाग होता असे श्री देसाई, भारतीय अर्थतज्ञ यांनी टेलिग्राफ मध्ये एक लेख लिहून भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल १९९१ पेक्षाही मोठया अनर्थाकडे सुरु असल्याचे प्रतिपादन केले आहे. भारताच्या आयात-निर्यात व्यापारातील तूट नजीकच्या काळात कमी होण्याची शक्यता आज दिसून येत नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय भांडवल बाजारात विदेशी संस्थागत संस्थानी केलेली गुंतवणूक होय.

या गुंतवणूकीमुळे भारतीय अर्थव्यस्थेत परकीय चलनातील साठयात वाढ झाल्यामुळे रूपयाचे मूल्य परिवर्तीत होत आहे. याचा परिणाम भारताच्या विदेशी व्यापारावर होत आहे. रूपयाचे मूल्य वाढल्यामुळे आयात स्वस्त होऊन त्यात वाढ होते व निर्यात महाग होते. व त्यामुळे निर्यातीत घट होण्यास आरंभ होतो. परिणामतः भविष्यात आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट ही वाढत जाईल. वर्तमान स्थितीत आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्याकरीता विदेशी संस्थागत गुंतवणूकीचा वापर होत आहे. परंतू विदेशी संस्थागत गुतवणूक दारानी भांडवली बाजारातील गुंतवणूक काढून घेण्यास सुरूवात केल्यावर भारतीय रिझर्व्ह बँकेकडे असलेला हा साठा कमी झाल्यास भारताला आर्थिक आव्हांनाना समोर जावे लागेल. याकरीता पक्के आर्थिक धोरण ठरविणे महत्वाचे आहे. हे आर्थिक धोरण वर्तमान स्थितीत ठरविताना देशातील मौद्रिक धोरण व राजकोषीय धोरण लक्षात घेणे महत्वाचे ठरेल.

शासनाने आर्थिक प्रक्रियेत हस्तक्षेप केल्यावर आयात कपात करून आणि निर्यातील चालना देऊन अधिक प्रयत्न केल्यास या प्रयत्नाला किती यश प्राप्त होईल हे सांगता येत नाही. कारण खनिज तेलाच्या आयातीत कपात करता येणार नाही. पेट्रो व पेट्रोपदार्थाच्या आयातीचा भार हा जास्त असतो. याला पर्याय म्हणून औष्णिक वीज निर्मिती करीता केलेला

Scanned by CamScanner

कोळशाचा वापरा होय. याकरीता विदेशी तंत्रज्ञानाची आयात भारताला करावीच लागेल. या शिवाय दूरसंचार क्षेत्रातील प्रगती साध्य करण्याकरीता नव्या तंत्रज्ञानासाठी आणि क्षेत्राच्या वाढीकरीता आवश्यक असणारी यंत्रसामुग्री भारताला भविष्यात आयात करावीच लागेल. शेतीक्षेत्रात उत्पादनाची पातळी कायम राखण्याकरीता व त्यात वाढ घडून आणण्या करीता भारताला नत्र युक्त रासायनिक खताची ही आयात करावी लागेल यातील कोणतीही आयात कमी करता येणार नाही व जर या आयातीत कपात केल्यास त्याचा परिणाम आर्थिक विकासाच्या गतीवर झाल्याशिवाय राहणार नाही. आज भारतीय अर्थव्यवस्था औद्यौगिक उत्पादने, यंत्रसामुग्री व उर्जा स्त्रोत याकरीता विदेशी बाजारपेठेवर अवलंबून आहे. याशिवाय खाद्यतेल, कडधान्य, इत्यादीची सतत आपण आयात करीत असतो. याशिवाय देशी नागरिक पर्यटक म्हणून विदेशात जाऊन येतात याचाही परिणाम विदेशी चलनातील साठयावर होईल. भारताने निर्यात वाढविण्याकरीता प्रयत्न करावयाचे ठरविले तर ते सहजासहजी शक्य होइल असेही नाही. कारण कृषीमालातून काही उत्पादने वगळल्यास आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमतीपेक्षा भारतीय बाजारपेठेतील अशा वस्तूच्या किंमती जास्त आहेत. भारतातील शेतकऱ्याची शेती उत्पादकता लक्षणीय प्रमाणात कमी असल्यामुळे भारतीय कृषी उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करू शकत नाही. हे दिल्ली येथील इक्रिअर संशोधन संस्थेने स्पष्ट केले आहे. औद्योगिक उत्पादनाच्या संदर्भातील स्थिती यापेक्षा वेगळी नाही कारण औद्यौगिक उत्पादनाकरीता लागणारी वीज भारतामध्ये चीनपेक्षा उलट महाग आहे, त्यामुळे कापड आणि कपडे यासारख्या आपल्या पारंपारिक निर्यातीमध्येही आपण चीन बरोबरच नव्हे तर बंगलादेश, व्हिएतनाम, सिलोन यासारख्या नवीन स्पर्धकाशाही स्पर्धा करू शकत नाही. या देशाची वस्त्र उद्योगाची निर्यात भारतापेक्षा जास्त आहे.

भारतीय अर्थव्यवस्था २.५ ट्रीलीयन डॉलर एवढी सशक्त झाली आहे. कधीही नव्हे एवढी वाढ सकल राष्ट्रीय उत्पादनात झाली आहे. अर्थातच यात तिन्ही क्षेत्राचा वाटा महत्वाचा आहे. भारताने जागतिक पातळीवर अनेक विक्रम नव्याने स्थापन केले आहेत. भारताने मागील १५ वर्षात सुक्ष्म तंत्रज्ञानाची निर्यात करण्यात भरघोस यश प्राप्त केले आहे. याशिवाय देशातील उच्चशिक्षण शिक्षण घेतलेले अभियंते व्यवस्थापन शास्त्रातील विद्याविभूषीत आणि विविध संशोधक, मोठया संख्येने भारताबाहेर कार्यरत आले. यातूनच भारतात विदेशी भांडवल मोठया प्रमाणात प्राप्त होत आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भातील स्थिती चिंताजनक आहे. परकीय भांडवलाच्या अनियंत्रीत आगमन व निर्गमनामुळे आर्थिक व्यवहारातील जोखमीचे प्रमाण वाढत आहे. रूपयाचे मूल्य वाढत असल्यामुळे विदेशी व्यापारातील तूट सातत्याने वाढते आहे. म्हणून भांडवलाची आयात कमी करून रूपयाचे मूल्य स्थीर ठेवल्यास आयात निर्यातीतील संतुलन आर्थिक आरिष्टाच्या काळातही टिकवून ठेवता येईल ही आजची गरज आहे.

संदर्भ -

१) Indian Economy - Rudder Dutt K.P.M.Sundaram
२) लोकसत्ता दिनांक २-१०-१० लेख-रमेश पाध्ये
३) विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ वाणिज्य शिक्षक मंडळ चर्चा सत्र २००० - लेख - डॉ.एच.ए.हुद्दा

रावसाहेब ठवरे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
नविन बाभूळखेडा, नागपूर.
तर्फे
विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ.वाणिज्य शिक्षक मंडळाच्या
द्वैवार्षिक अधिवेशनाला
हार्दिक शुभेच्छा !
सौ.व्ही.डी. जाधव
मुख्याध्यापिका / प्राचार्या
रा.ठ. हाय. व क. महा.ना.
डॉ.टी.व्ही.गेडाम
व्यवस्थापक
रा.ठ. हाय. व क. महा.ना.

Scanned by CamScanner

# Impact of World Recession on Indian Foreign Trade



**MRS. VARSHA A. KHANDAGALE**
**Faculty of Commerce**
**Hislop College, Nagpur**

**FOREIGN TRADE, An Introduction:**

Foreign Trade refers to exchange of Goods and Services between countries for meeting the requirements of the demography and economic development. Required Goods & Services are imported, while excessively available goods or services are exported to other countries. This leads to the attainment of two major objectives: Achieving the targets of non available goods & services and marching towards prosperity and modernization.

Indian Foreign Trade contributes to only _0.6_% to the total world trade. However still India is a major exporter and importer for goods & services across the world.

India's major export market is Asia with more than 50% share in the exports, however the single largest country for exports is the USA with a share of more than 20%. The major countries from which India imports are China, USA & Saudi Arabia.

**ECONOMIC RECESSION, An Introduction:**

**Recession is a stage in the economic cycle, wherein the faces of businessmen are dull, Pockets: empty, Nights: sleepless, Mind: stressful and Future: uncertain.**

**IMPACT OF RECESSION ON INDIAN FOREIGN TRADE:**

**Import- Export Imbalance:** Recession created a hard hit imbalance between import & export of goods & services. Recession caused reduction in the exports of products which are excessively produced in the country. Also the importers were conscious about the volumes of imports of regular items.

**Forced Correction in Prices of Exports:**

Due to imbalance in the import-export scenario the exporters were forced to either hold their consignments for a longer term or if they were in a financial leveraged position the only option left to them was **"panic selling"**. Overall the prices of exported items diminished in the foreign markets by **10-12%.**

**Reduced inflow of FDI:**

The Foreign Direct Investment (FDI) which was flowing smoothly in the country after the year 2000 was hard hit by the recession. This not only caused reduction of fresh inflows of FDI but also lead to the reimbursements of the FDIs which were invested in the country recently.

**Slowdown in Growth Rate:**

Recession has not only affected the exports of the country, but in turn the growth rate of the economic growth has tumbled down by around 2%. One of the responsible factors for this is the reduced foreign trade.

**Reduction in Currency Reserves:**

The impact of recession was so hard that the Currency reserves of the country was affected. The reduction in exports with the sustainment of necessary imports (Oil) forced the currency reserves of the country to diminish.

Scanned by CamScanner

**Devaluation of Indian Currency:**

During the recession period the valuation of the rupee was reduced to record lows. The conversion rate of rupee with dollar hit the highest level of approx. Rs. 50 per USD.

**Financial Crunch for export oriented sectors:**

All of the sudden changes in Indian and US market created a point of thinking for the export oriented homogeneous industries. The worldwide recession has hardly hit these sectors adding to their existing problems. The Balance Sheets of these industries were taken a step back with reduced EPS.

**IT & BPO Sector:**

The glory of the IT sector of the country was the most effected during the recession period. MNCs were facing substantial reduction in their order books. Not only the software sector was the victim, but even the subsidiary BPO industry was not insulated by the effects of the world recession.

**Loss of Jobs & Reduced pay packets:**

The youth of the country were directly affected by the reduction in foreign trade as jobs related to international trade vanished suddenly. Not only this the employees of international trade industry faced reduced salaries.

**The Impact on the Foreign Trade is like a disaster which may take some years to recover fully.**

**MEASURES TO OVERCOME "THE DULL DAYS":**

**Reduction of Interest Rates:**

**Reduction in Indirect Taxes, specifically Customs Duty:**

**Encouraging Development of Indigenous Industry:**

**Government Subsidy & SEZs:**

**Special schemes for international trade industries:**

**Encouragement to export oriented industries:**

**Simplicity in the process of Imports and exports:**

**More Bi-lateral & multi-lateral agreements with new countries for increasing world trade.**

The Impact of recession has not only left the exporters in an uncertain stage, but has raised a question mark in the minds of the experts of the international business. The foreign investors are also left in the stage of uncertainty and therefore this imbalance.

**The only statement which suits these exporters, investors & traders is "Wait and Watch, God is Great."**


चर्चा सत्र-२०१० ला आमच्या शुभेच्छा

सौजन्य



श्री.हरेश छ.गांधी

गांधी मोटर्स

चामोर्शी, जि.गडचिरोली.

हिरो होंडाचे वितरक



चर्चा सत्र-२०१० ला आमच्या शुभेच्छा



श्री.मनेस छबिलदास गांधी

• सौजन्य •

किराणा व बिल्डींग मटेरियल सप्लायर्स

चामोर्शी, जि.गड.

मनेस गांधी पेट्रो सर्वो

(पेट्रोल, डिझेलसाठी २४ तास सेवा)

फोन नं. ०७१३५-२३५८६१


Scanned by CamScanner



VIJAY BALPANDE
Dayaram Wade Jr. College, Lalganj, Ngp.

# INDIA'S FOREIGN TRADE 2010-2011

This paper reviews India's merchandise trade performance during 2009-10

**Highlights -**

1) India's merchandise exports during June 2010 at US$ 17.7 billion recorded a growth of 30.4 percent as compared with a decline of 29.1% registered in June 2009. For the ninth successive month the exports have registered a positive growth.
2) During April-June 2010 exports stood at US$ 50.8 billion, posting an increase of 32.3 percent as against a decline of 31.8 percent during April-June 2009.
3) India's merchandise imports during June 2010 at US$ 28.3 billion showed a growth of 23% as against a decline of 20.5 percent recorded in June 2009. This was due to growth in both petroleum oil and lubricants and non Oil imports.
4) During April-June 2010 imports at US $ 83.0 billion registered a rise of 34.4%.
5) Petroleum oil and lubricants imports at US $ 25.3 billion during April-June 2010 showed a high growth of 51.8% as against decline of 43.7% a year ago. Primarily due to increase in international crude oil prices over the period. The average price of Indian basket of crude oil during April-June 2010 stood at US $ 78.2 per barrel.
6) Non-pol imports during April-June 2010 at US $ 57.8 billion recorded a growth of 28 % as against a decline of 23.7 percent in April-June 2009.
7) Trade deficit during April-June 2010 amounted to US $ 32.3 billion which was higher by US $ 8.9 billion than US $ 23.9 billion during April-June 2009 due to relatively large increase in imports than exports during the period.
